शनिवार १ एप्रिल १९७८
७५ पैसे

# माणूस

## कर्नाटकातील निवडणुका : राजकारणी मंडळींनी योग्य तो निष्कर्ष काढावा. जें ऐकले तें लिहिले आहे..

– एक वाचक, धारवाड
१३।३।७८

□ कामानिमित्त सहज धारवाड जिल्ह्याचा फेरफटका झाला. निवडणूकीचे 'निकाल' नुकतेच जाहीर झालेले होते. त्यात दोन विजयी उमेदवार जनताचे पी. बी. पाटील (कित्तूर), काँग्रेस (इं.) चे सोमलिंगप्पा व पराजित उमेदवार काँग्रेस (रे.) चे कोळीवाड यांच्याशी निकालाबद्दल चर्चाही करता आली.

जनतेचा पराजय तसा खरोखर भयानक नाही. काँग्रेस (इं) [ ४४% ] मागोमाग जनतेला ३९% मते मिळाली आहेत; परंतु निकाल ऐकून मात्र सुशिक्षितांची खूपच निराशा झाली. त्यातल्या त्यात धारवाडकरांना एकच समाधान होते. आमच्या आयुष्यात प्रथमच मत दिलेला उमेदवार निवडून आला ! पण त्याचे श्रेय जाते पराजित उमेदवाराला. त्याने (नायकर–माजी मंत्री) जर विद्यार्थी–जनतेचा रोष ओढवून घेतला नसता व विद्यार्थ्यांनी निकराचा प्रयत्न केला नसता तर तेही भाग्य आम्हाला मिळाले नसते.

उमेदवारांबरोबर झालेल्या चर्चेतून पुढील गोष्टी निष्पन्न होतात.

१ : राज्यशाखेने पाठविलेल्या यादीत दिल्लीत ४०% बदल झाल्यामुळे जनतेला काही ठिकाणी विनाकारण पराभव स्वीकारावा लागला. हे बदल ज्या लोकांनी केले त्यांना कर्नाटकातल्या गावांची व त्यांच्या राजकीय रचनेची थोडीसुद्धा कल्पना नव्हती.

श्री. पी. बी. पाटील यांचे नाव बदलत बदलत अखेरीस कित्तूरला आले; परंतु त्यांना बैलहोंगलला सहज निवडून येता आले असते. कित्तूरला जनतेचा 'दगड' ही निवडून आला असता. त्यामुळे एक जागा नाहक वाया गेली.

२ : कोठलाही उमेदवार कोठेही उभा केला गेला. त्यामुळे त्याला स्थानिक जनतेचे पुरेसे पाठबळ मिळाले नाही. अपवाद फक्त धारवाडला झाला. त्याचे कारण आधीच दिले आहे.

३ : वीरेंद्र पाटील व निजलिंगप्पा यांना उगीचच दुखविले गेले. त्यामुळे निदान '१५ तरी जागा गेल्या व शिमोग्यासारख्या खात्रीच्या जागा गमविल्या गेल्या.

४ : मिळालेली जमीन, कर्जसूट यामुळे इंदिरा गांधींची पकड मागासलेल्या जमातीवर कायम बसली गेली आहे.

५ : शहरात प्रचार कशासाठी ? जनतेचे स्वयंसेवक खेड्यात का गेले नाहीत ? राज्यरस्त्यांवर किती खेडूत येतात ?

६ : बंगलोरच्या 'Deccan Herald' मध्ये नुकतेच एक पत्र छापले गेले आहे. पत्रलेखक म्हणतो : एका मंत्र्याने (अरस मंत्रिमंडळातल्या) एका सबइन्स्पेक्टरच्या जागेकरिता ४०,००० रुपये घेतले तर कोठे बिघडते ? निदान तो नोकरी तरी देतो ना ?'' एवढी सूज्ञता सध्या वाढली आहे !

मी जे जे ऐकले ते ते लिहिले आहे. राजकारणी मंडळींनी योग्य तो निष्कर्ष काढावा.

# एक देश, एक जनता

एकत्र काम करण्याचा आनंद





## विज्ञान प्रयोगशाळेत एकत्र

प्रो. कपूर, हे नेहमीच संशोधन कर्मचारी आणि विद्यार्थी याच्यांत मग्न असतात. पुण्याला व्याख्याता म्हणून आल्यापासूनच ते लोकप्रिय झाले आहेत. त्यांना पुणे एकदम आवडले. त्यांची मूलं तर मराठी छान बोलतात. त्यांचे सहकारी आणि विद्यार्थी घरी निरनिराळ्या भाषा बोलतात, निरनिराळे पोशाख घालतात आणि त्यांच्या खानपान सवयी भिन्न आहेत. पण प्रयोगशाळेत ते सर्व एकच भाषा बोलतात. ती म्हणजे विज्ञानाची भाषा.
ज्ञानाला कोणतेहि प्रतिबंध नसतात.

davp 77/51

3

प्रतिबंधाच्या पना आळशी लोकांच्या मनात जन्म घेतात.) त्यांना दूर करण्यास मदद करा.

# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे-अंक चव्वेचाळीस

१ एप्रिल १९७८

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४४३४५९

¤


# महाराष्ट्र : 'जनता'ला अपेक्षित यश का मिळाले नाही ?

स. न.

¤ १९७७ मार्च लोकसभा निवडणुकीच्या वेळी नवनिर्मित 'जनता पक्षाला' जनतेने स्वयंस्फूर्त बहुमत दिले. महाराष्ट्रात ४८ पैकी २८ जनता उमेदवार निवडून आले. त्या वेळी साधन, पैसा, प्रचारयंत्रणा व कार्यकर्ते अतिशय कमी प्रमाणांत होते व भूतपूर्व पंतप्रधान इंदिरा गांधी सत्तास्थानी सर्वशक्तिमान होत्या, त्यामुळे तर सत्तेचा आधार तर मुळीच नव्हता. त्या तुलनेत १९७८ मार्च विधानसभा निवडणुकीत ह्या वेळी सर्वच मुबलक प्रमाणात असताना, केंद्रस्थानी सत्ता व श्रीमती इंदिरा गांधी सत्ताविरहित व पक्षविरहित एकाकी असताना नागरिकांनी जनता पक्षाच्या विरोधात कौल का दिला ? इंदिरा लाटही आम्ही कुचकामी केली असती.

यापूर्वी लोकसभा निवडणुकीत 'जनता-पक्ष' हे नाव जरी नवीन होते, त्यातील घटकपक्ष जनसंघ, समाजवादी पक्ष, संघटना काँग्रेस व भारतीय लोकदल या विरोधी पक्षांच्या कार्यकर्त्यांची जागरूक कर्तव्यबुद्धी व निःस्वार्थ सेवा यामुळे आणि काँग्रेसमधील त्यागी तरुणतुर्क सर्वश्री चंद्रशेखर, मोहन धारिया, रामधन प्रभृतींच्या सत्तात्यागामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या मनात त्यांचेसाठी आदरभावनेतून जनता पक्षासाठी विश्वास निर्माण झाला होता. जनता पक्षाच्या लोकांनीही त्या वेळी आपला संपूर्ण विश्वास सर्वसामान्य नागरिकांचे ठिकाणी प्रकट केला होता. त्या वेळी नागरिकांनी त्याची परतफेडही केली होती.

परंतु विधानसभा निवडणुकीच्या अगदी सुरुवातीपासून त्याच जनता पुढाऱ्यांनी सत्तेच्या धुंदीत आमजनतेवर सर्वप्रथम अविश्वास प्रकट केला. त्यांनी कदाचित आत्मविश्वास गमावला व जनतेला आवाहन करण्याऐवजी, ज्या 'काँग्रेसच्या नेत्यांना जाहीरपणे भ्रष्टाचारी, सत्तालोलुप इत्यादि प्रखर विशेषणांनी वर्णन करून, नागरिकांचे मनात त्यांचेविषयी द्वेष निर्माण केला होता, त्याच 'पुढाऱ्यांना' जनता पक्षात येण्यास आमंत्रित केले गेले. मित्र पक्षांशी समझौता करताना सुद्धा बऱ्यावाइटाचा विचार न करता, प्रत्येक बाबतीत प्रसिद्धीची हाव ठेवून, ऊठसूठ आपली लक्तरे वेशीवर टांगली. त्यांचा अनादर केला. त्यामुळे नागरिकांना स्वाभाविकपणे बोध झाला की, ह्यांना नागरिकांची मते नकोत, त्यांना काँग्रेसमधील 'वजनदार खुर्चीचिकटू पुढारी' पाहिजेत! वर्तमानपत्रात रुसवारुसवीच्या प्रचाराची वक्तव्ये-प्रसिद्धी पाहिजे. त्यामुळे आमजनतेवर अविश्वास प्रकट करणाऱ्या व आत्मविश्वासहीन नेत्यांच्या जनता पक्षाला त्यांनी बहुमताचा कौल दिला नाही.

जनता पक्षामध्ये घटक पक्षाचे विसर्जन झाल्यावरही 'भूतपूर्व घटकपक्षांचा कोटा' हे प्रमाण ठरवून उमेदवारांची निवड केली गेली. योग्यतेचा विचार केला नाही. लोकशाहीमधील 'विचाराचे स्वातंत्र्य' या गोंडस अधिकाराचा मन मानेल तसा उपयोग करून पक्षातील नेत्यांनी आपसातील लाथाळीसुद्धा वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली व आपल्यामधील सत्तालोलुपतेचे चित्र जनमानसात प्रदर्शित केले. त्यातल्या त्यात भू. पू. जनसंघाच्या कार्यकर्त्यांचे व रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांचे तर अपमानास्पद अवमूल्यन करण्याचा जागोजागी प्रयत्न झाला. तरी पण जनता पक्षात बहुसंख्येत असलेल्या या कार्यकर्त्यांनी मनात द्वेष न ठेवता ज्या हिरीरीने, धाडसाने व उत्साहाने या हिंसक वादळी वातावरणात प्रामाणिकपणे काम केले, त्याची अजूनही किंमत केली जात नाही. यासलट, 'जनता पक्षाने भू. पू. जनसंघाचे उत्तमराव पाटील यांचेऐवजी श्री......साहेब यांना मुख्य नेतेपद दिले असते तर जनता पक्षाचे सरकार झाले असते!' अशा प्रकारे हेटाळणीपूर्ण बोलले जाते तेव्हा सर्वसाधारण कार्यकर्त्यांना यातना होतात. त्याची चिंता कोण करतो ? भू. पू. जनसंघाचे लोकांत दुर्गुण दिसतात तर जनता पक्षातून त्या सर्वांना काढून टाकणे हिताचे होईल! पदोपदी अपमान सहून

करून सतत हिणवणाऱ्यांमध्ये भू पू जनसंघीयांनी यापुढे राहावे काय, असा प्रश्न अनेकांच्या मनांत निर्माण झाला आहे. म्हणूनच जनता पक्षामध्ये असलेल्या कॉंग्रेसच्या 'नकली' नेत्यांपेक्षा अजूनही कॉंग्रेसमध्ये असलेल्या 'असली' नेत्यांनाच मतदान करण्याचा ७०% अडाणी, अज्ञानी व गरीब नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने निर्णय घेणे योग्य नव्हते काय ?

जनता पक्षाच्या उच्च, उच्चतर व उच्चत्तम नेत्यांनी अमानती जप्त झालेल्या कॉंग्रेस-मंत्र्यांनी या उमेदवारांची गत पाहून, केवळ पुढाऱ्यांचा पक्ष न बनविता, सर्वसाधारण नागरिकांची किंमत ओळखून, त्यांच्या सदसद्विवेक बुद्धीवर विश्वास टाकून, आपल्या कार्यकर्त्यांचा आदर राखल्यास यापुढे भविष्य काळात यश मिळविणे शक्य होईल. अन्यथा जनता पक्षाची रेड्डी कॉंग्रेस होण्यास उशीर लागणार नाही. त्यांच्या धोती व चड्डीला काही किंमत तरी येईल, जनतेची लंगोटी कुठेही खपणार नाही.

— **पद्माकर जोशी,** धामणगाव रेल्वे

[ महाराष्ट्र जनता पक्षाचे मुखपत्र असलेल्या 'जनवाणी' दि. २१ मार्च १९७८ च्या अंकावरून साभार पुनर्मुद्रित. ]

१४ एप्रिल : डॉ. आंबेडकर यांच्या जन्मदिनानिमित्त लेख

# मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी आश्रम

प्रा. झुंबरलाल कांबळे

सोळा मार्च १९७८. सकाळची आल्हाददायक हवा सुखद वाटते आहे. कृषि विद्यापीठाची अत्याधुनिक इमारत 'किसानभुवन'...शेवटच्या मजल्यावरचे सुसज्ज रेस्ट हाउस तिथे रात्री मुक्काम पडला आहे. सर्व थकवा आता पार नाहीसा झाला आहे. विद्यापीठाचा निसर्गरम्य परिसर हळूहळू उजळू लागला आहे... डोंगरउतारावर काजूंची झाडे शांतपणे उभी आहेत. लाललाल काजू अस्पष्टपणे लक्ष वेधून घेत आहेत. दूरवरची गर्द झाडी, उंचच उंच साग. त्यांच्याशी स्पर्धा करणाऱ्या नारळी—सुपारी—आंब्यांच्या बागा, कळकीची बेटे आपल्या डोक्यावर धुक्याची झिरझिरीत निळी शाल पांघरून नुकतीच झोपेतून जागी झाली आहेत. धुके व धुराचा एक जाड निळा पट्टा... निळ्या रंगाचे इंद्रधनुष्यच जणू...आपल्या डोक्यावर, कमरेवर, बुंध्यावर परिधान करून ती गर्द राई निद्रासुखाचा अनुभव उपभोगीत अजूनही स्वप्नात दंग आहे. रात्रीच्या तारकांची स्वप्नसृष्टी अजूनही त्यांच्या मनात रेंगाळत असावी !

'किसानभुवन' आता चैतन्यमय झाले आहे. चहापानानंतर आरामदायी डायनिंग-टेबलावरच आमची बैठक जमली आहे. घन:श्याम तळवटकर, प्रा. अनंत काणेकर, प्रा. रा. भि. जोशी, इंजिनिअर रमेश कुलकर्णी, प्राचार्य शि. ना. रामटेके, डॉ. टी. डी. अंबाडे, प्रा. के. रु. नगराळे बैठकीत सहभागी झाले आहेत. मी तळवटकरसाहेबांना मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी आश्रमाबद्दल वेगवेगळे प्रश्न विचारीत आहे. तेही प्रसन्न चित्ताने उत्तरे देत आहेत. दापोलीच्या या आश्रमाच्या संदर्भातच हे सर्वजण इथे आलेले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दापोलीबद्दल विशेष आकर्षण होते. त्यांनी आपल्या शिक्षणाचा श्रीगणेशा इथेच गिरविला म्हणून असेल... रमाबाईंचे माहेर वणंद इथून जवळच असल्यामुळेही असेल कदाचित. कोकणातील दलितांसाठी इथे एक चांगले शैक्षणिक केंद्र सुरू करावे, एक सुसज्ज वसतिगृह चालवावे, एखादे टेक्निकल हायस्कूल स्थापन करावे... या परिसरातील लोकांची शैक्षणिक व्यवस्था करावी म्हणून त्या वेळच्या 'दापोली महार सेवा संघा'तर्फे बाबासाहेबांनी 'रमाबाई स्मारक फंड' सुरू केला.

१९३५ साली रमाबाई आंबेडकरांचे निधन झाले. बाबासाहेब परदेशात शिकत असताना या साध्वीने अनंत यातना सहन केल्या. बाबासाहेबांचे कर्तृत्व नुकतेच बहराला येत होते. मातोश्रींना हे कर्तृत्व दीर्घकाळ पाहायला मिळाले नाही याची खंत बाबासाहेबांच्या मनात अखेरपर्यंत होती.

१९३७ साली त्यांनी 'देवी रमाबाई आंबेडकर विद्यार्थी आश्रम' वरील 'सेवासंघा'च्या सहकार्याने सुरू केला तो 'कलकायीचे कोंड' या पूर्वीच्या सैनिक महार—पेन्शरांच्या वस्तीतील एका घरात होता. हे कोंड दापोलीचाच एक भाग आहे. सध्या तिथे तुरळक वस्ती आहे.

### एक लाखाचा निधी

१९४३—४४ च्या दरम्यान बाबासाहेबांनी या वसतिगृहासाठी मुंबई सरकारकडून सारामाफीची ५ एकर जागा मिळविली. मागासवर्गीयांच्या विकासासाठी त्यांच्याच सूचनेनुसार एक खाते मुंबई सरकारने निर्माण केले होते. त्या खात्याचा बॅकवर्ड क्लास ऑफिसर त्या वेळी पुण्याला असे. अशा एका आय्. सी. एस्. अधिकाऱ्याच्या सहीने वसतिगृहासाठी ५ एकर जागा मिळाल्याचा हुकूम मंजूर झाला होता.

नवीन जागा ताब्यात आल्यावर बाबासाहेबांनी स्थानिक कार्यकर्त्यांपुढे एक योजना मांडली होती. त्यांनी ५० हजार रुपयांचा निधी जमवावा. मुंबईच्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीने ५० हजार रुपये द्यावेत. अशा प्रकारे जमलेल्या एक लाख रुपयांतून सुसज्ज शैक्षणिक केंद्र स्थापन करावे. कोकणवासियांना त्याचा लाभ घ्यायला मिळावा, असे त्यांनी उरी बाळगलेले स्वप्न होते. दापोलीचा विषय निघाला की ते हे स्वप्न बोलून दाखवीत. संस्थेचे रजिस्ट्रार म्हणून नियुक्त झाल्यावर १९५३ साली बाबासाहेबांच्या सल्ल्यानुसार आपण या आश्रमास भेट कशी दिली, ते सांगताना तळवटकरसाहेब म्हणाले—

'मी वसतिगृहाची पाहणी केली. तिचा एक अहवाल तयार केला व साहेबांना तो सादर केला.'

'महार सेवा संघा' ने इमारत फंड म्हणून १५,००० रुपये जमविले. ते आश्रमाच्या दैनंदिन गरजेसाठीच खर्च केले. त्यामुळे बाबासाहेब स्थानिक कार्यकर्त्यांवर खूपच रागावले आणि हे त्यांचे स्वप्न रेंगाळतच राहिले.

*त्यांचे हे स्वप्न आपण प्रत्यक्षात उतरवावे* अशी भावना १९५३ सालापासूनच माझ्या मनात होती. त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर ती अधिक तीव्र झाली.

योग्य संधीची वाट पहात मी जुळवाजुळव करीत होतो. साहेबांच्या हयातीत हे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. आपल्या हयातीत ते पूर्ण करावे अशी जिद्द मनात बाळगून आहे. पीपल्स एज्युकेशन सोसायटीने या कामासाठी दीडलाख रुपयांचे बजेट मंजूर केले आहे. आजपर्यंत वसतिगृहाच्या नवीन इमारतीवर एक लाख रुपये खर्ची पडले आहेत. बाबा-

साहेबांनी ४१ वर्षांपूर्वी उरी बाळगलेलें स्वप्न साकार होत असल्याचे पाहून मन समाधानाने व कृतज्ञतेच्या भावनेने उचंबळून येत आहे. आपल्या हयातीत एवढे काम आपणाला करता आले ही भावना खूपच सुखदायी वाटते आहे.

महाडला बाबासाहेबांचे शैक्षणिक कार्य उभारले. क्रांतिस्तंभाचे भव्य काम आता पूर्ण होण्याच्या मार्गावरच आहे. ते आता शेवटच्या टप्प्यात वेगाने सुरू आहे. मातोश्री रमाबाई हे आपले आणखी एक दैवत. त्यांच्या योग्यतेला साजेसे स्मारक सोसायटीच्या आधिपत्याखाली तयार होत आहे. मला माझे जीवन धन्य झाल्यासारखे वाटत आहे.' असे सांगताना तळवटकरसाहेब भारावून गेले होते.

## निसर्गरम्य परिसर

१९४७ सालापासून आश्रम नवीन प्रशस्त जागेत आला आहे. तिथे जुन्या इमारतीत सध्या ४० विद्यार्थ्यांची सोय आहे. आणखी ६० विद्यार्थी राहू शकतील अशी १९ खोल्यांची सुसज्ज व भक्कम दगडी इमारत झपाट्याने साकार होत आहे. १९६३ साली पी. ए. सोसायटीने मूळ संस्थेकडून हा आश्रम आपल्या ताब्यात घेतला. 'मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी आश्रम' असे त्यांचे नामांतर केले. तेव्हापासून आश्रमाचा परिसर निसर्गरम्य करण्यास सुरुवात केली आहे.

मुळातच हा परिसर निसर्गरम्य आहे. भोवताली काजूची गच्च झाडी आहे. त्याच्या जोडीला नारळी-सुपारीची काही झाडे आहेत. अननसाची बाग आहे. हिरव्यागार केळी वाऱ्यावर डोलत असतात. वेगवेगळा भाजीपाला नेत्रसुखाचा आनंद देत असतो आणि अशा या हिरव्यागार-पोपटी परिसरात विहीर, तिच्यावर बसविलेला पंप हरवून गेला आहे. जांभा दगड-लाल माती-हिरवा परिसर आणि त्यात काळ्या दगडाचा साकार होत असलेला आश्रम! लवकरच हापूस आंब्याची बाग इथे आकार घेणार आहे. नारळीची झाडे, सिडलेस लिंबूची झाडे पानापानातून घुमारताना दिसताहेत. कृषि विद्यापीठाचा सुंदर परिसर या परिसराला लागूनच सुरू होतो. विद्यापीठाच्या सहकार्याने आश्रमाच्या आवारात एक बहारदार बागही साकार होणार आहे.

'कोकणातील महार जमात ही अत्यंत शूर व लढवय्यी आहे. मला त्यांच्यासाठी फारसे काही करता आले नाही. दारिद्र्यामुळे त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता येत नाही. आपल्या मुलांना चांगले शिक्षण देता येत नाही. त्यांच्यासाठी एखादा खास शिक्षणफंड असावा. प्रत्येक वर्षी हुशार व होतकरू तरुण शिक्षणासाठी परदेशांत पाठवावेत' अशी बाबासाहेबांची इच्छा होती. याच त्यांच्या सद्भावनेतूनच दापोलीचा आधुनिक आश्रम झपाट्याने पूर्णत्वाकडे जात आहे.

## बाल भिवा

बाबासाहेबांची ही इच्छा मनात रेंगाळत असतानाच आम्ही महाडला परत यायला निघालो. आमची गाडी 'किसानभुवन' पुढील लाल धूळ उडवीत धावू लागली. जांभ्या दगडात बांधलेल्या लाल टुमदार इमारती ओलांडून ती आता दापोलीच्या बाहेर आली. महाडच्या रस्त्याला लागली. वस्ती कमी होऊन गर्द झाडी लागली. गाडीचा वेग मंदावला. थोडा वेळ ती तिथे थांबली. घनःश्याम तळवटकरांनी बाल भीमाच्या घराचा चौथरा कुठे आहे तो दाखविला.

मन भूतकाळाचा वेध घेत होते...... पेन्शनर रामजी बाल भिवाला घेऊन दापोली कॅम्पमध्ये राहायला आले आहेत. दापोली हे कोकणातील महाबळेश्वर. थंड हवेमुळे व चवदार आणि निरोगी पाण्यामुळे गोऱ्या-साहेबाचे तिच्यावर खास प्रेम! त्यामुळे इंग्रज सरकारने इथे सैनिकांचे खास कॅम्प ठेवले आहेत...भिवाचे वय चार-पाच वर्षांचेच आहे. त्याचा थोरला भाऊ आनंद मराठी शाळेत जायला निघाला आहे. बाल भिवा त्याचे बोट हातात धरून शाळेत निघाला आहे. रामजीपंत-भीमाबाई दारात उभे राहून अत्यंत स्वाभिमानाने बाल भिवाकडे पहात आहेत. जाता जाता तो मागे वळून आईवडिलांकडे पहात होता...एका प्रचंड गंगोत्रीचा उगम होता तो. लहानसाच! पण पुढे प्रचंड होत जाणारा. दलितांच्या जीवनाचा मळा शिंपीत जाणारा. भारतीयांचे जीवन सुजलाम् सुफलाम् करणारा! गाडी सुरू झाली आणि मी भानावर आलो.

## महारसैनिकांच्या समाधी

बाल भिवाचे राजबिंडे रूप अजूनही माझ्या मनात रेंगाळत होते. गाडी थोडासा वेग घेते न घेते एवढ्यात तिचा वेग परत मंदावला. काही वेळ सडकेच्या बाजूला ती थांबवली. सडकेच्या अगदी कडेलाच बांधलेल्या विविध समाधींकडे बोट दाखवून तळवटकरसाहेब म्हणाले याच त्या आपल्या महार पेन्शनर सैनिकांच्या समाधी, त्यातील अनेक पेन्शनर नंतर साधूंसारख्या धर्मचर्चा करीत. समाधीकडे बघून त्या काळच्या महार-सैनिकांप्रमाणेच शिस्तीने उभ्या असलेल्या सैनिकांचे वैभव डोळ्यांत भरत होते. त्या समाधी... लाल जांभ्या दगडाने बांधलेल्या. घडीव चिऱ्यांतून साकार झालेल्या... ऊन, पाऊस, वारा यांना टक्कर देत आपले गतवैभव सांभाळीत उभ्या असलेल्या आपापल्या अंगावर मार्बलच्या प्लेटस्... त्यावर समाधिस्थांची माहिती. देशासाठी जिद्दीने लढणारे हे महार सैनिक इथेही कसे शिस्तीने चिरनिद्रा घेत पहुडलेले आहेत! सुभेदार, हवालदार, सुभेदार मेजर, लेफ्टनंट, कॅप्टन ऑर्डर ऑफ ब्रिटिश एम्पायर, हा राणीचा किताब मिळविणारे आणि धार्मिक चर्चा करणारे धार्मिक शास्त्रात गती असणारे साधू, संन्याशी... त्यांची धार्मिक बैठक जमली आहे. चर्चा बहराला आली आहे. कबीरपंथ श्रेष्ठ की नानकपंथ श्रेष्ठ असा चर्चेचा विषय आहे. रामानंदपंथ श्रेष्ठ की नाथपंथ श्रेष्ठ असा वादविवाद रंगतदारपणे चालला आहे.... त्यातील काही 'वेदशास्त्र वेदसंपन्न आहेत. महार वेदशास्त्री वेदसंपन्न होऊ शकतो या धार्मिक मतावर त्यांचा जबरदस्त विश्वास आहे... हे गोपाळ बाबा वलंगकर. अंगात पांढरीशुभ्र बाराबंदी, डोक्यावर पगडी, गळ्यात उपरणे आशा थाटात बैठकीत बसले आहेत. "विटाळविध्वंसन" हा आपला ग्रंथ जमलेल्या साधूंना वाचून दाखवीत आहेत... १८८५ सालची गोष्ट. महाडजवळील दासगावचा म्हारवाडा. हाटे मास्तराने दुमजली घर बांधले आहे. त्याची वास्तुशांती महाडातील एका ब्राह्मणाने केली आहे. महाडातील ब्राह्मणवर्ग चिडला आहे. त्या ब्राह्मणाला वाळीत टाकले आहे... ही घटना सांगता सांगता गोपाळबुवा खूप संतापले आहेत. इंग्रज सरकारला या घटनेची माहिती देऊन झालेल्या अपमानाबद्दल दाद मागत आहेत. सरकारला प्रश्न विचारीत आहेत. महाराच्या घरची वास्तुशांती केल्याने बाटले कोण? वेद, देव की ब्राह्मण? जमलेल्या साधूंनाही गोपाळबुवाच्या बुद्धीची चमक पटली आहे. माना हलवून त्यांना दाद देत आहेत... समोरून येणाऱ्या गाडीने कर्कश्य हॉर्न दिला आणि मी भानावर आलो. गाडी आता महाडच्या दिशेने धावू लागली. प्रा. अनंत काणेकर, प्रा. रा. भि. जोशी, नानासाहेब टिपणीस, मोहिते गुरुजी, बाबूजी कवळी आणि गाडीतील इतर सर्वजण महारांच्या या वैभवाने भारावून गेल्यासारखे वाटत होते. गाडी धावत होती... माझ्या मनःचक्षूपुढील त्या समाधींचा फेर सुरूच होता. महाड कधी आले ते कळलेंच नाही. □

# कम्युनिस्ट चळवळ

## स्टालिननंतरचे पाव शतक

वा. दा. रानडे

भारतातील विधानसभा निवडणुकांच्या धामधुमीत आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीच्या दृष्टीने एक महत्त्वाची घटना दुर्लक्षिली गेली. स्टालिन यांच्या निधनाला ६ मार्चला पंचवीस वर्षे पुरी झाली. या पाव शतकात रशियातील आणि जगातील कम्युनिस्ट चळवळ किती बदलली ? हा बदल योग्य दिशेने होत आहे का ? कम्युनिस्ट चळवळीतील उणीवा व दोष कितपत दूर झाले ? प्रामाणिक आत्मनिरीक्षण करून ते दूर करण्याचा प्रयत्न होत आहे का ? कम्युनिस्ट चळवळीची भावी दिशा काय राहील ? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. त्यासंबंधी बरेच सविस्तर लिहायला हवे. येथे फक्त या प्रश्नांच्या अनुषंगाने मनात येणारे काही विचार मांडीत आहे.

पहिला प्रश्न स्टालिनवाद आणि स्टालिनवादी प्रवृत्तीचा. स्टालिनवादाची फारशी मूलगामी चिकित्सा कम्युनिस्ट चळवळीत झालेली नाही. स्टालिनने एवढी दहशत निर्माण केली होती की, त्याविरुद्ध आवाज उठविण्याचे धैर्य त्यांच्या निधनाला तीन वर्षे होईपर्यंत क्रुश्चेव्हनाही झाले नाही आणि त्यांनी हल्ला चढविला तो मुख्यत: स्टालिनच्या दहशतीविरुद्ध आणि व्यक्तिमहात्म्याविरुद्ध. ही अपप्रवृत्ती टाळण्यासाठी सामुदायिक नेतृत्वाचा मार्ग त्यांनी सुचविला. एका व्यक्तीच्या हाती सारी सत्ता केंद्रित केल्याने स्टालिन-राजवटीतील सारे दोष निर्माण झाले होते. कामगारवर्गाच्या सर्वाधिकारशाहीचे रूपांतर कम्युनिस्ट पक्षाच्या सर्वाधिकारशाहीत आणि त्याचे रूपांतर पुढे एका व्यक्तीच्या म्हणजे स्टालिनच्या सर्वाधिकारशाहीत झाले होते. लोकशाही मध्यवर्तित्व आणि टीका व आत्मटीका ही कम्युनिस्ट पक्ष कार्यपद्धतीची दोन तत्त्वे लेनिनने पुरस्कारिली होती; पण स्टालिनच्या काळात ही तत्त्वे खऱ्या अर्थाने अनुसरलीच गेली नाहीत. पक्षाचे निर्णय वरपासून खालपर्यंत खुली चर्चा होऊन ठरत नसत. टीका व आत्मटीका होत नसे. स्टॅलिनच सर्व निर्णय घेई आणि सर्वजण ते निमूटपणे मान्य करीत. त्याला एका शब्दानेही विरोध करण्याचे धैर्य कोणाला होत नसे. उलट त्याची मर्जी आपणावर नेहमी रहावी यासाठी त्याची वारेमाप स्तुती गाइली जाऊ लागली.

क्रुश्चेव्हच्या काळात स्टालिनची दहशत कमी झाली; पण अंतर्गत लोकशाही कार्यपद्धती काही अस्तित्वात आली नाही. ब्रेझनेव्हच्या काळातही या परिस्थितीत सुधारणा झाली नाही. उलट काही बाबतीत क्रुश्चेव्हच्या काळातील उदारपणा थोडा कमीच झालेला दिसला.

रशिया व इतर कम्युनिस्ट राष्ट्रांतून लोकशाही कधीच येणार नाही का ? असा प्रश्न यातून उपस्थित होतो. कम्युनिस्ट नेत्यांचे यावर ठरीव उत्तर असे की, कम्युनिस्ट राष्ट्रांत भांडवलाही लोकशदाही नाही पण तेथे खरी समाजवादी लोकशाही आहे. भांडवलदारी लोकशाहीत लोकशाहीचा केवळ देखावा असतो खरी सत्ता भांडवलदार वर्गाच्याच हाती असते. आर्थिक विषमता नष्ट होऊन सर्वांना विकासाची समान संधी मिळणे हा लोकशाहीचा गाभा भांडवलशाही नष्ट झाल्याने कम्युनिस्ट राष्ट्रातच आहे. कम्युनिस्टांनी दाखविलेले भांडवलदारी लोकशाहीतील हे दोष मान्य केले तरी त्यामुळे कम्युनिस्ट राजवटीतील समाजवादी लोकशाही निर्दोष ठरत नाही. ही लोकशाही म्हणजे कम्युनिस्टपक्षाची सत्ता टिकविण्यासाठी निर्माण केलेले हत्यार आहे. कम्युनिस्ट पक्षाशिवाय इतर पक्षांना तेथे स्थान का नाही ? कम्युनिस्ट पक्षाच्या अधिकृत भूमिकेशिवाय दुसरे विचार तेथे का मांडू दिले जात नाहीत ? रशियातील वृत्तपत्रांतून टीका असते ती सरकारी कारभारातील उणीवा आणि अंमलबजावणीतील दोषांवर, पण धोरणांवर आणि निर्णयांवर टीका करण्याची मोकळीक त्यांना नसते. रशियन क्रांतीला साठ वर्षे झाल्यानंतरही विरोधी मताची एवढी भीती राज्यकर्त्यांना का वाटावी ? विरोधी मत उडवून टाकूनच कम्युनिस्टांनी आपली सत्ता टिकविली आहे. असे विरोधकांनी मग म्हटले तर त्यात काय चुकले ? देशात अनेक पक्षांना मोकळीक हवी. तसेच कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यपद्धतीत लोकशाही यायला हवी, कम्युनिस्टांचे यावर उत्तर असे की, विरोधक प्रतिगामी, प्रतिक्रांतिकारक आणि भांडवलशाहीचे हस्तक आहेत. कम्युनिस्ट क्रांती नष्ट करून भांडवलशाही पुन: आणण्यासाठी कारवाया त्यांना आम्ही करू देणार नाही. काही विरोधक कम्युनिस्ट म्हणतात तसे असतील, पण सरसकट साऱ्याच विरोधकांवर तसा शिक्का मारणे योग्य नाही. कम्युनिस्ट चळवळीच्या वाढीच्याच दृष्टीने अधिकारासह नेत्यांनी स्वीकारलेल्या धोरणापेक्षा निराळे धोरण स्वीकारणे हिताचे आहे असे काही कार्यकर्त्यांना प्रामाणिकपणे वाटत असेल तर ते मत मांडण्याची त्यांना मोकळीक हवी. त्यासाठी पक्षांतर्गत आणि पक्षाबाहेर लोकशाही खऱ्या अर्थाने रूढ व्हावयास हवी. तुम्ही सत्ताधारी असला म्हणून साऱ्या विरोधकांना प्रतिगामी ठरविण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला ? खुल्या निवडणुकांच्या मार्गाने लोकांना ते ठरवू द्या.

कम्युनिस्ट देशात ही मागणी हळूहळू वाढत जाईल आणि जुन्या पठडीत वाढलेल्या आजच्या सत्ताधाऱ्यांनी तिला विरोध केला तरी भावी पिढीचे नेते तशीच भूमिका घेतील असे मानण्याचे कारण नाही. स्टालिनची दहशत जाईल असे तरी कोणाला वाटले होते ? एक स्टालिन गेला तर त्या जागी दुसरा स्टालिन येईल व त्याच पद्धतीने कारभार चालू राहील, असे अनेकांना वाटत होते. क्रुश्चेव्हच्या हातून इतर कितीही चुका झाल्या असल्या तरी त्यांनी स्टालिनची दशहत नष्ट केली ही त्यांची मोठी कामगिरी मान्य करायलाच हवी. ब्रेझनेव्ह यांनी पुन: दोन पावले मावार घेतली तरी स्टालिनच्या पद्धतीने कारभार आता करता येणार नाही हे त्यांनी ओळखले. एवढयावर न थांबता कम्युनिस्ट राष्ट्रांनी लोकशाहीच्या मार्गावर आणखी पावले टाकायला हवीत.

हा मार्ग लांबचा असला तरी कम्युनिस्ट राष्ट्रे आता अधिकाधिक स्वतंत्रतेच्या मार्गाने वाटचाल करीत आहेत. रशियाचे एकमुखी नेतृत्व आता कोणी मानीत नाही. या नेतृत्वाविरुद्ध पहिले बंड टिटोंनी केले. त्यांना नेस्तानाबूत करण्याचे क्रुश्चेव्ह व ब्रेझनेव्ह यांचे प्रयत्न फसले आणि टिटोंशी जमवून घेणे त्यांना अखेर भाग पडले. पूर्वयुरोपातील इतर राष्ट्रेही रशियापासून अधिक स्वायत्तता मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत; पण आपला प्रभाव न मानणाऱ्या आणि आपल्या धोरणांना विरोधी असलेल्या राजवटी तेथे अधिकारावर येऊ द्यावयाच्या नाहीत यासाठी लष्करी हस्तक्षेप करायला सुद्धा रशियाने कमी केले नाही. क्रुश्चेव्हच्या कारकीर्दीत हंगेरीत आणि ब्रेझनेव्ह यांच्या कारकीर्दीत चेकोस्लोव्हाकियामध्ये असे हस्तक्षेप झाले. पूर्वेकडे चीनने रशियाचे नेतृत्व झुगारले. व्हिएटनामही स्वतंत्र मार्गाने जात आहे.

पृष्ठ २४ वर

# निदर्शनांचा हलकल्लोळ हेच इंदिरा-आव्हानाचे मूळ स्वरूप

सदाशिव पेठकर

आमची गाडी दिल्ली स्टेशनात शिरली तेव्हा पावसाची झिमझिम सुरू झालेली होती. सर तशी लहानशीच होती; पण तेवढयाने हवेत एकदम गारठा आला. पुढच्या दोन-चार दिवसांतही जलदेवतेने राजधानीला अनेकदा स्नान घातले. एके दिवशी तर पावसाबरोबर वादळाचेही आगमन झाले आणि निसर्गाच्या संहारक कर्तृत्वाचा नव्या दिल्लीतील काही भागांना जोरदार आघात सहन करावा लागला. अवघ्या दोनशे सेकंदांमध्ये मॉरिसनगर–कमलानगर भागातील जन-जीवन पार उद्ध्वस्त झाले.

निसर्ग लहरी असतो तर माणूस खुनशी असतो !

इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस बुटासिंग यांच्याशी बोलतांना, त्या पक्षाची जनता पक्ष आणि रेड्डी काँग्रेस यांच्यासंबंधीची खुनशी वृत्ती सतत प्रतीत होत होती.

जानेवारीच्या प्रारंभी इंदिरा गांधींनी काँग्रेसचे दुसऱ्यांदा विभाजन करून आपल्या आक्रमक स्वभावाचा प्रत्यय आणून दिला. वेगळा पक्ष काढण्याच्या टोकापर्यंत जायला त्या सुरुवातीला तयार झाल्या नव्हत्या. काँग्रेसचे त्या वेळचे अध्यक्ष ब्रह्मानंद रेड्डी आणि संसदेतील विरोधी पक्षनेते यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबर नेतृत्वामध्ये आपल्यालाही सहभागी करून घेतले पाहिजे एवढयावर त्यांचे समाधान होण्यासारखे होते; परंतु देवराज अरस आणि डॉ. चेन्ना रेड्डी यांनी, 'तुम्ही वेगळा पक्ष काढीत नसाल तर कर्नाटक–आंध्र–प्रदेशापुरता आम्हाला स्वतंत्र प्रादेशिक पक्ष स्थापन करावा लागेल', असे निर्वाणीचे सांगितल्यानंतर, दक्षिणेकडील लढाई या दोघांच्या सहाय्याशिवाय जिंकता येणार नाही, हे कळून आलेले असल्यामुळे इंदिरा गांधींनी पक्षाध्यक्षपद स्वतःकडे घ्यायची तयारी दर्शविली.

सुरुवातीला कमलापती त्रिपाठी यांच्या निवासस्थानीच इंदिरा काँग्रेसची कचेरी होती. नंतर २४ अकबर मार्ग येथे ती हलविण्यात आली. त्या वेळी 'अ. भा. काँग्रेस कमिटी' अशी तेथे लहानशी पाटी होती. कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या दोन राज्यांतील विधानसभांमध्ये घवघवीत बहुमत मिळताच, त्या छोटया पाटीची जागा एका मोठया फलकाने घेतली आहे.

या कचेरीत बसूनच सरचिटणीस बुटासिंग इंदिरा गांधी यांच्या सूचनेनुसार आपले डावपेच आखीत असतात.

इंदिरा गांधी आणि बुटासिंग यांच्या स्वभावात साम्य आहे. खऱ्या-खोटयाचा किंचितही विधिनिषेध न बाळगता प्रतिपक्षावर बेलगाम आरोप करण्यात बुटासिंग इंदिरा गांधींची सहज बरोबरी करू शकतात, हे आपल्याला पहिल्या पाच-दहा मिनिटांतच जाणवते. शीख असल्यामुळे ते हेल काढून हिंदी बोलतात आणि त्या बोलण्याला साजेसे त्यांचे हातवारेही होत असतात.

बुटासिंग सध्या विशेष खुषीत आहेत. कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या दोन दाक्षिणात्य राज्यांमध्ये इंदिरा काँग्रेसची सरकारे अधिकारावर आली हे या खुषीचे एक कारण झाले; पण त्यांच्या मते हा विजय अपेक्षित होता.

खुषीचे दुसरे कारण अधिक महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणावर यशवंतराव चव्हाणांची पकड असल्यामुळे इंदिरा काँग्रेसला तेथे फारसे स्थान मिळणार नाही असे सांगितले जात होते; परंतु महाराष्ट्रातही इंदिरा काँग्रेसला जवळ-जवळ रेड्डी काँग्रेस इतक्याच जागा मिळाल्यामुळे, प्रतिस्पर्धी काँग्रेसचा आणखी एक बालेकिल्ला आपल्याला जमीनदोस्त करता आला याचा बुटासिंग यांना आनंद वाटतो.

त्यामुळे ते महाराष्ट्राच्या राजकारणासंबंधीच अधिक वेळा बोलतात.

दोन्ही काँग्रेस पक्षांना साठ ते सत्तरच्या दरम्यान जागा मिळाल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा फायदा आपल्याला मिळू शकेल याचा अंदाज इंदिरा गांधींना आलेला होता; परंतु त्या बाबतीत आपण कोणताही पुढाकार घ्यायचा नाही असेही त्यांनी ठरविले होते. त्यामुळेच, निवडणुकीचे जाहीर झाल्यानंतर, 'आपल्याला सत्तेची हाव नाही. विरोधी पक्ष म्हणून काम करण्याची आपली तयारी आहे,' असे इंदिरा काँग्रेसचे महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष नाशिकराव तिरपुडे यांनी जाहीर केले.

## नाईक यांचा पुढाकार

जनता पक्षाला अपेक्षेपेक्षा कमी जागा मिळाल्यामुळे, सर्वाधिक जागा मिळवूनही तो पक्ष मंत्रिमंडळ बनवू शकत नव्हता. त्यातच विधिमंडळ पक्षनेतृत्वासंबंधी वाद निर्माण झाल्यामुळे, अपक्ष सदस्यांशी पाठिंब्याबाबत वाटाघाटी करायला वेळ लागला. अशा परिस्थितीत दोन्ही काँग्रेस पक्षांचे संमिश्र सरकार बनविण्याची सूचना घेऊन वसंत-

राव नाईक इंदिरा गांधींना भेटले, तेव्हा त्यांनी नाईकांना कमलापती त्रिपाठी, बुटासिंग, ए. आर. अंतुले, नाशिकराव तिरपुडे प्रभृतींशी बोलणी करण्याबद्दल सुचविले.

इंदिरा गांधींनी काँग्रेसबाहेर जाऊ नये यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न करीत होते ते वसंतराव नाईकच. पक्ष फुटल्यानंतर ते रेड्डी काँग्रेसच्या बाजूने उभे राहिले आणि विदर्भ आपल्या पाठीमागे आहे हे सिद्ध करण्यासाठी. त्यांनी इंदिरा गांधींच्या पाठोपाठ विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात प्रचारसभा घेतल्या. इंदिरा गांधींनी जेथे जेथे भाषणे केली त्या त्या ठिकाणी नाईकांनी जाऊन. इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीविरुद्ध कौल देण्याचे मतदारांना आवाहन केले; परंतु नाईकांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत दुखावला गेलेला विदर्भातील काँग्रेस कार्यकर्त्यांचा गट इदिरा काँग्रेसमध्ये दाखल झालेला असल्यामुळे तेथे रेड्डी काँग्रेसचा पार धुव्वा उडाला !

लगेच नाईक यांची भाषा बदलली. बुटासिंग स्पष्टपणे असे सांगतात की, महाराष्ट्रात संमिश्र मंत्रिमंडळ बनविण्याची कल्पना प्रथम वसंतराव नाईक यांच्यामार्फतच आमच्याकडे आली आणि ती वसंतदादा पाटील यांना मंजूर असेल तर आम्ही तिचा विचार करू असे आम्ही त्यांना सांगितले.

वसंतदादा पाटील दिल्लीला आले ते या कल्पनेचा पाठपुरावा करण्याचा निर्धार करूनच. दोन-तीन वेळा ते इंदिरा गांधींना भेटण्यासाठी त्यांच्या १२, विलिंग्डन क्रिसेंट या निवासस्थानी येऊन गेले. ते यशवंतराव चव्हाण यांनाही भेटले; परंतु त्यांचा सल्ला घेण्यासाठी नव्हे तर इंदिरा गांधींशी झालेली बोलणी त्यांच्या कानावर घालण्याकरिता.

वसंतराव नाईक आणि वसंतदादा पाटील, यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्व झुगारून द्यायला तयार आहेत याची खात्री पटल्यानंतर संमिश्र मंत्रिमंडळाची कल्पना आम्ही स्वीकारली असे बुटासिंग सांगतात. त्यांचे हे म्हणणे खरे वाटते. कारण मुख्य मंत्री होण्यासाठी वसंतदादा आतुर नसते तर इंदिरा काँग्रेसच्या वतीने घालण्यात आलेल्या अटी त्यांनी स्वीकारल्या नसत्या. नाशिकराव तिरपुडे यांना उपमुख्यमंत्रिपद, दोन्ही पक्षांना मंत्रिमंडळात समान जागा आणि मतभेदाच्या प्रसंगी अंतिम लवाद इंदिरा गांधी यांचा या तीन अटींवरच महाराष्ट्रात रेड्डी काँग्रेस आणि इंदिरा काँग्रेस यांचा समझोता झालेला आहे. हे सगळे तपशीलवार विवरण केल्यानंतर बुटासिंग कबुली देतात – ' महाराष्ट्र इतना जल्दी हाथमें आयेगा ऐसी पहले उम्मीद नहीं थी ! '

एवढे होऊनही बुटासिंग यांची म्हणजेच पर्यायाने इंदिरा गांधींची रुखरुख वेगळीच आहे.

ती सी. एम. स्टीफन यांनीही बोलून दाखविली.

आपणच राष्ट्रीय पातळीवरील एकमेव विरोधी पक्षनेत्या आहोत, असे इंदिरा गांधी सांगू लागल्या आहेत. दोन राज्यांतील संपूर्ण मंत्रिमंडळाच्या आणि एका राज्यातील अर्ध्या मंत्रिमंडळाच्या आधारावर हा दावा करता येत नाही हे त्यांनाही ठाऊक आहे. त्यासाठी लोकसभेतील प्रमुख विरोधी पक्ष म्हणून इंदिरा काँग्रेसला मान्यता मिळाली पाहिजे हे त्या जाणून आहेत. त्यासाठी रेड्डी काँग्रेसमधील आणखी पंधरा-वीस सदस्य तरी इंदिरा काँग्रेसमध्ये येणे आवश्यक आहे. आंध्रप्रदेश–कर्नाटकामधील निवडणुकीचे निकाल जाहीर होताच हे घडून येईल अशी बुटासिंग यांची अपेक्षा होती; परंतु अजून तरी त्यांची ही महत्त्वाकांक्षा सिद्धीला गेलेली नाही. संसदेचे अर्थसंकल्पी अधिवेशन मेच्या मध्यापर्यंत चालणार आहे. ते आटोपायच्या आत हा बदल घडून येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ते काम बुटासिंग यांच्यापेक्षा स्टीफन अधिक चांगल्या तऱ्हेने करू शकतात.

बुटासिंगांची भाषा बढाईखोर आहे तर स्टीफन यांच्या बोलण्यात आर्जव आणि ऋजुता आढळते. उत्कृष्ट संसदीप इंग्रजी वाकपाटव त्यांना लाभलेले आहे. लोकउभेमध्ये त्यांच्या शेजारी बसणारे वसंतराव साठे आवाज करण्यात पटाईत आहेत. त्यामुळे त्यांना अधिक प्रसिद्धी मिळते; परंतु स्टीफन यांच्यासंबंधी इतर पक्षीय सदस्यही जो आदर व्यक्त करतात त्याचा शतांश भागही साठे यांच्या वाट्याला येत नाही. साठे यांचे भाषण निव्वळ आकांडतांडव वाटते. बुटासिंग यांना मात्र तेच अभिप्रेत आहे. संसद गाजवून सोडली पाहिजे असे ते म्हणत असतात.

## चौकडीला विरोध

स्टीफन आणि बुटासिंग यांच्यामध्ये आणखीही एक फरक आहे. इंदिरा काँग्रेसचा कारभार आपल्या तंत्राने चालला पाहिजे असे संजय गांधी, महंमद युनुस आणि यशपाल कपूर यांना वाटते. इंदिरा गांधींचे हे ' कॉकस ' स्टीफन यांना मान्य नाही. आपण फक्त इंदिरा गांधींचे नेतृत्व मानतो अशी ते ग्वाही देतात. शिवाय देवराज अरस आणि चेन्ना रेड्डी यांचीही तीच 'लाईन' आहे. याउलट बुटासिंग काय, उत्तरप्रदेशातील नारायणदत्त तिवारी काय किंवा बिहारमधील जगन्नाथ मिश्रा काय, या सगळ्यांना इंदिरा गांधी त्यांच्या परिवारासह मान्य आहेत. काँग्रेसच्या विभाजनाच्या वेळी स्टीफन द्विधा मनःस्थितीत होते. इंदिरा काँग्रेसच्या मेळाव्याला ते हजर राहिले नाहीत. रेड्डी काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या सुरुवातीच्या बैठकींमध्ये ते भाग घेत असत. केरळमधल्या राजकारणाने स्टीफन यांना इंदिरा काँग्रेसमध्ये आणले. केरळचे मुख्यमंत्री ए. के. अँटनी आणि सी. एम. स्टीफन हे दोघेजण एकमेकांच्या विरोधी गटातील. अँटनी यांचे कट्टर विरोधक करुणाकरन हे स्टीफन यांचे त्या राजकारणातील दोस्त. करुणाकरन राजन खूनखटल्यामध्ये गुंतले गेलेले असल्यामुळे, त्यांच्या महत्त्वाकांक्षेला आपोआपच मर्यादा पडली आहे. ती कामगिरी स्टीफन पार पाडू शकत असल्यामुळे लोकसभेचे अधिवेशन सुरू होताच त्यांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि केरळचा एक महत्त्वाचा मोहरा आपल्या गोटात आल्यामुळे इंदिरा काँग्रेसने स्टीफन यांना लोकसभेतील पक्षनेतेपद बहाल केले. तेव्हापासून स्टीफन दक्षिणेकडील काँग्रेस खासदारांशी संपर्क साधून आहेत. आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्र या राज्यांतील काही खासदार लवकरच इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश करतील असे स्टीफन सांगतात; परंतु त्यांच्या अपेक्षेइतक्या वेगाने पक्षांतराला चालना मिळालेली नाही. राज्यसभेची द्विवार्षिक निवडणूक झाल्यानंतर ही प्रक्रिया निश्चित सुरू होईल, अशी आशा ते बाळगून आहेत.

इंदिरा गांधींनी लोकसभेची पोटनिवडणूक लढवावी असे बुटासिंग

यांना वाटते; परंतु त्यासाठी योग्य ते वातावरण निर्माण झालेले आहे अशी जोपर्यंत इंदिरा गांधींना खात्री वाटत नाही तोपर्यंत त्या निवडणुकीच्या भानगडीत पडणार नाहीत हेही बुटासिंग यांना ठाऊक आहे. आंध्रप्रदेश किंवा कर्नाटक राज्यातील सुरक्षित मतदारसंघां-मधून इंदिरा गांधी निवडून येऊ शकतात. इंदिरा गांधींना मात्र उत्तरप्रदेशातून निवडून यायला हवे आहे. कारण उत्तरप्रदेश सोडून इतर ठिकाणाहून निवडून येणे म्हणजे उत्तरप्रदेश या आपल्या 'खास' राज्यामध्ये अद्याप आपल्या पक्षाला स्थान मिळालेले नाही, याची कबुली देण्यासारखेच आहे, असे इंदिरा गांधी मानतात. म्हणूनच, लोकसभेची पोटनिवडणूक लढविण्याचा आपला विचार नाही, असे त्या सांगत असतात. त्यावरून त्या १९८२ पर्यंत थांबतील असा निष्कर्ष काढणे धोक्याचे ठरेल. निवडणूक लढविण्याची वेळ आलेली आहे याची त्यांच्या मनाची खात्री झाल्यानंतर 'सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव' त्या उभ्याही राहतील. निवडूक हरण्याची एक टक्का देखील शक्यता जोवर आहे तोपर्यंत त्या मतपेटीच्या कौलापासून स्वतःला दूरच ठेवतील.

दुसरे असे आहे की, जोपर्यंत इंदिरा काँग्रेसला प्रमुख विरोधी पक्ष हे स्थान मिळत नाही तोपर्यंत लोकसभेत जाणे इंदिरा गांधींच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीनेही सोयीचे नाही. यशवंतराव चव्हाण प्रमुख विरोधी पक्षनेते आणि आपण दुसऱ्या क्रमांकाच्या विरोधी गटाचे प्रमुख असे चित्र त्यांच्या अहंकारी स्वभावाला मान्य होण्यासारखे नाही. आज जे पद यशवंतराव चव्हाण भूषवीत आहेत त्या पदावर स्टीफन विराजमान झाल्यानंतरच लोकसभेत जायचे किंवा नाही याचा इंदिरा गांधी विचार करतील.

हे शक्य तितक्या लवकर घडून यावे असे इंदिरा गांधींना तीव्रतेने वाटते याचे कारण शहा आयोगाचा अहवाल त्यांच्या साऱ्या मनोविश्वाला व्यापून टाकीत आहे. शहा आयोगाने आपला अंतरिम अहवाल केंद्र सरकारला सादर केला असून त्यात अधिकाऱ्यांच्या गैरवापराबद्दल इंदिरा गांधींना दोषी धरले आहे. त्या अहवालाच्या आधारे इंदिरा गांधी आणि संजय गांधी यांच्यावर कोणती कारवाई करता येण्यासारखी आहे याचा केंद्रीय गृहखाते विचार करीत आहे. इंदिरा गांधींना गेल्या ऑक्टोबरमध्ये अटक करताना ज्या चुका आणि हलगर्जीपणा झाला तसा तो ह्या वेळी होता कामा नये हे चरणसिंगांना पाहिलेच पाहिजे. केंद्रीय गृहखाते याबाबतीत तातडी का करीत नाही असा अनेकांना प्रश्न पडतो. इंदिरा गांधी यांच्या आज्ञा शिरसावंद्य मानल्यामुळे ज्यांची भरभराट झाली असे अनेक वरिष्ठ अधिकारी, मध्यंतरीच्या 'शुद्धीकरणा'नंतरही मोक्याच्या जागांवर बसून आहेत. मंत्रिमंडळाचे गुप्त निर्णय त्यांच्याकडून इंदिरा गांधींना कळत नसतीलच असे नाही. त्यामुळे इंदिरा गांधींसंबंधी प्रत्येक पाऊल टाकताना कमालीची सावधानता बाळगायला हवी ह्या मागच्या अनुभवामुळे चरणसिंग धडा शिकले आहेत.

### मुख्य रणक्षेत्र

शहा आयोगाच्या अहवालानुसार कायदेशीर उपाययोजना सुरू होण्यापूर्वी या अहवालाविरुद्ध वातावरण निर्माण करणे हा इंदिरा काँग्रेसचा तातडीचा कार्यक्रम झालेला आहे. त्यासाठी हरिजनांचे आणि अन्य मागासवर्गीयांचे हितरक्षण करण्यासाठी निदर्शनांचे पर्व सुरू करण्याचा मनसुबा बुटासिंग यांनी रचला आहे. इंदिरा काँग्रेसला जनता पक्षाशी खरी लढाई खेळायची आहे ती उत्तरप्रदेश आणि बिहार येथे. गेल्या वर्षीच्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसला या दोन राज्यांत एकही जागा मिळालेली नाही. गंगेच्या खोऱ्यातल्या या दोन राज्यांमध्ये देशातील एकचतुर्थांश लोकसंख्या राहते. साहजिकच ही दोन राज्ये ज्यांच्या ताब्यात असतात त्यांचाच संसदेवर आणि केंद्रीय प्रशासनावर प्रभाव पडतो. पूर्वीच्या निवडणुकीमध्ये या राज्यातील हरिजनांची आणि मुसलमानांची मते काँग्रेसला पडत असत आणि त्या आधारावर केंद्रीय प्रशासन काँग्रेसच्या नियंत्रणाखाली येत असे. संजय गांधीच्या नसबंदी मोहिमेचा तडाखा जाणवला तो या दोन राज्यांनाच. त्यामुळेच काँग्रेसचे हे परंपरागत आधार गेल्या वर्षीच्या निवडणुकीच्या वेळी संपुष्टात आले. पुन्हा हे प्रदेश आपल्या कह्यात आणावयाचे असतील तर जनता पक्षाच्या राजवटीत हरिजनांवर अत्याचार वाढत चालले आहेत आणि मुसलमानांची उर्दू भाषेच्या बाबतीत उपेक्षा होत आहे, असा आभास निर्माण करणे इंदिरा काँग्रेसच्या दृष्टीने क्रमप्राप्तच ठरते.'

गेल्या सतरा मार्चला लखनौ येथे विधानसभेवर गेलेला मोर्चा आणि एकोणीस मार्चला पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या निवासस्थानामध्ये झालेला घुसण्याचा प्रयत्न हे इंदिरा काँग्रेसच्या नव्या डावपेचांचे अविष्कार आहेत. उत्तरप्रदेशातील ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे असे कारण पुढे करून लखनौ येथे विधानसभेवर मोर्चा नेण्यात आला, त्या वेळी सहसा निदर्शनामध्ये भाग न घेणारी कमलापती त्रिपाठी, उमाशंकर दीक्षित यांसारखी वृद्ध मंडळी आघाडीवर होती. उत्तरप्रदेशात ज्यांच्या नावांचा दबदबा आहे अशा व्यक्तींना पोलिसांनी मारहाण केली असा गहजब केला की वातावरण तापवायला मदत होईल, या हिशोबातूनच उत्तरप्रदेशातील वयोवृद्ध मंडळींना त्या मोर्चाचे नेतृत्व करायला सांगण्यात आले होते,

सिक्कीमच्या विलिनीकरणासंबंधी मोरारजी देसाई यांनी एका परदेशी पत्रकाराला मुलाखतीचे निमित्त करून त्यांच्या बंगल्यासमोर निदर्शने करण्यात आली. इतकेच नव्हे तर पोलिसांचे कडे मोडून आत प्रवेश करण्याचाही प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे साहजिकच पोलिसांना निदर्शकांना पांगविण्यासाठी लाठीहल्ला करणे भाग पडले. झाले, लागलीच वसंतराव साठे यांनी हा प्रश्न लोकसभेत उपस्थित केला. एक राजकीय पक्ष रस्त्यावरचे राजकारण खेळून अशांतता निर्माण करीत आहे असे चरणसिंग यांनी अगोदर म्हटलेच होते. उत्तरप्रदेशातील लाठीहल्ल्यावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी सरळच त्या पक्षाचे नाव घेतले. इंदिरा गांधी यांच्या चिथावणीमुळे हा निदर्शनांचा हलकल्लोळ सुरू झालेला आहे, या चरणसिंगांच्या विधानात सत्याचा किंचितही अपलाप नाही.

जनता पक्षाला नीट राज्यकारभार करता येत नाही, त्या पक्षाचे प्रशासन अगदीच भोंगळट आहे असे लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठी हा सारा खटाटोप सुरू झाला आहे. त्याकरिता कोणतेही निमित्त यापुढे शोधले जाणार आहे. सुरक्षितता आणि शांतता यावरचा लोकांचा विश्वास उडाला की ते सत्ताधारी पक्षाकडे अविश्वासाच्या आणि संशयाच्या भूमिकेतून पाहू लागतील असा

विचार करूनच बुटासिंगांसारखे कावेबाज गृहस्थ 'वरून' येणाऱ्या आदेशांची अंमलबजावणी करू लागले आहेत.

'इंदिरा गांधींच्या राजवटीतही हरिजनांवर अत्याचार होतच होते की' असा प्रतिप्रश्न केला की बुटासिंग ती जबाबदारी राज्यसरकारांवर टाकून मोकळे होतात. इंदिरा गांधींच्या कारकीर्दीमध्ये राज्यसरकारांना कोणतेही स्वातंत्र्य उरलेले नव्हते. ती केवळ हुकमाची ताबेदार झालेली होती, असे सांगितले की, बुटासिंग तसे काहीही झाले नव्हते असा निर्वाळा देतात. इंदिरा गांधी याच हरिजनांच्या आणि अन्य मागासवर्गीयांच्या खऱ्याखुऱ्या रक्षणकर्त्या आहेत, ही गोष्ट ते पुन्हापुन्हा सांगतात. जनता पक्ष हा उच्च वर्णीयांचा प्रतिनिधी असल्यामुळे आम्हाला त्याच्याविरुद्ध लढावे लागत आहे आणि सर्वत्र निदर्शने करणे हा त्या रणनीतीचा एक अपरिहार्य भाग आहे हे आपल्या मनावर बिंबविण्यासाठी बुटासिंग अनेक उदाहरणे सांगत असतात.

जनता पक्षाने आपल्या वर्षभराच्या कारकीर्दीमध्ये आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने कोणते उपाय योजले यासंबंधी मतभेद होऊ शकतात, परंतु नागरिकांची, वृत्तपत्रांची आणि न्यायालयांची आणीबाणीच्या नावाखाली हिरावून घेतलेली स्वातंत्र्ये त्या पक्षाने पुनश्च प्राप्त करून दिली याबद्दल कोणालाही संदेह नाही. कोटयवधी उपाशी नागरिकांच्या भाकरीचा प्रश्न निश्चितच महत्त्वाचा आहे, परंतु त्याबरोबर लोकशाहीचे संरक्षण हे कार्यही विकसनशील देशाच्या सुस्थिर प्रगतीच्या दृष्टीने नितांत आवश्यक आहे. तेवढे एक कार्य पार पाडले ही देखील जनता पक्षाची फार मोठी जमेची बाजू आहे. आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या राज्यांमध्ये इंदिरा काँग्रेसला बहुमत मिळालेले असले तरी तेथील नागरी भागातील जनतेने त्या पक्षाला झिडकारले आहे ही गोष्ट इंदिरा गांधींना आणि बुटासिंगासारख्या त्यांच्या समर्थकांना नाकारता येत नाही.

लोकशाहीमध्ये सत्याग्रहाला स्थान नसते असे सांगून इंदिरा गांधींनी अराजकाच्या उद्भवाचा बागुलबोवा उभा करून आणीबाणी पुकारली. त्या स्वतः राज्यकर्त्या असतांना त्यांनी इतर पक्षांना निदर्शनांचा मार्ग नाकारला होता. सत्ता हातातून गेल्यानंतर त्यांना त्याच मार्गाचा अवलंब करावा लागत आहे. वेळप्रसंगी लोकांचे अधिकार हिरावून घेतल्याशिवाय लोकशाहीला निर्माण झालेला धोका टाळता येत नाही हे आणीबाणीबाबतचे समर्थन आता वेगळ्या मार्गाने खरे करून दाखविण्याचा त्यांनी चंग बांधला आहे. आणीबाणी पुकारण्याजोगी अशांत आणि प्रक्षोभक परिस्थिती आपण निर्माण केली आणि त्या परिस्थितीला आवर घालण्यासाठी जनता पक्षीय सरकारने नागरिकांच्या अधिकारांचा संकोच केला तरच आणीबाणीतील अतिरेकांच्या आरोपातून आपली स्वतःची सुटका करून घेता येईल या विचारधारेतून इंदिरा गांधींनी दलितहितरक्षणाच्या आवरणाखाली मोर्चे, घेराओ यांसारख्या तंत्रांचा अवलंब करण्याचा आपल्या अनुयायांना इषारा केला आहे. रस्त्यावरचे राजकारण हे दुधारी शस्त्र असते. भाडोत्री वाहनातून भाडोत्री माणसे आणून आणि त्यांच्यामार्फत गोंधळ निर्माण करून आपल्यासंबंधी दहशत निर्माण करण्याचा इंदिरा गांधींचा हा ठरीव पवित्रा उत्तरप्रदेश आणि बिहार येथील राज्य सरकारे केवढ्या खंबीरपने हाताळतात यावर केंद्र सरकारचे या झुंडशाहीविरुद्ध निर्धारपूर्वक उभे राहण्याचे कार्य सुकर होणार आहे.

राजधानीतील आणि त्याचबरोबर गंगेच्या खोऱ्यातील उन्हाळा आता वाढत जाणार आहे. कडक उन्हाच्या काहिलीने त्रस्त झालेल्या गरीबगुरिबांना हाताशी धरून जनता पक्षाच्या लोकशाहीनिष्ठेची हिंसक मार्गाने कसोटी पाहण्याचा इंदिरा गांधींचा खटाटोपही तापत जाणार आहे. या मनोरथाची पहिली चुणुक लखनौने अनुभवली आहे. तेथल्या निदर्शनांना मिळालेल्या प्रसिद्धीमुळे आपले पहिले पाऊल तरी अचूक पडले असे समाधान बुटासिंग व्यक्त करीत आहेत. म्हणूनच भेटायला आलेल्यांचा निरोप घेताना ते म्हणतात, "अगले एक-दो महीनोंमें क्या क्या होता है यह देखते जाईये !"

[ क्रमशः ]

---

**पुढील अंकी**

# रेड्डी काँग्रेसची गलितगात्र अवस्था

---

# अवती - भवती

शरद कृष्णन्

## ▢ आकाशभारती : योग्य दिशेने वाटचाल

आकाशवाणी काय किंवा दूरदर्शन काय आणीबाणीच्या काळात माहिती आणि नभोवाणीखात्याच्या अखत्यारीतील ही यंत्रणा पूर्णपणे हास्यास्पद झाली होती. तशी ही यंत्रणा परिपूर्णरीत्या सरकारी यंत्रणा म्हणूनच राबविली गेली असल्याने सत्तास्थानी असलेल्यांचे हितसंबंध नेहमीच जोपासले गेले; पण आणीबाणीपर्वात इंदिरा–संजयचा जो निर्लज्ज उदोउदो झाला त्यामुळे उन्मत्त सत्ताधिकारी ही यंत्रणा मनात आले तर कशा प्रकारे राबवू शकतात याचे दर्शन घडले. पुढे निवडणूककाळामध्ये जनता पक्षाच्या विविध नेत्यांनी जी आश्वासने दिली त्यामध्ये आकाशवाणी आणि दूरदर्शन यांना स्वायत्तता देण्याबाबतचेही एक आश्वासन होते. केंद्रामध्ये जनता सरकार सत्तास्थानी आल्यावर या आश्वासनपूर्तीच्या दृष्टीने हालचाल करण्यात आली आणि सरकारने प्रसिद्ध पत्रकार श्री. बी. जी. वर्गिस यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. श्री. पु. ल. देशपांडे या समितीचे सदस्य होते. समितीने भरपूर मेहनत घेऊन एक प्रदीर्घ अहवाल तयार केला असून आकाशभारती ही एक स्वायत्त विश्वस्त संस्था स्थापण्याची एकमुखी शिफारस केली आहे. या अहवालावर भरपूर चर्चा व्हावी अशी इच्छा खुद्द माहिती आणि नभोवाणीमंत्री एल्. के. अडवानी यांनी व्यक्त केली आहे. आकाशवाणी व दूरदर्शन यांवर काही चर्चासत्रे झाली खरी; परंतु या महत्त्वपूर्ण अहवालावर जेवढी तीव्र प्रतिक्रिया अपेक्षित होती तेवढी ती उमटलेली दिसत नाही. एक गोष्ट निश्चित की, अहवाल स्वीकारून त्याची अंमलबजावणी करण्याचे ठरल्यास एका नवीन पर्वास प्रारंभ होईल.

आकाशवाणी आणि दूरदर्शन याबाबत आणीबाणीच्या काळात इतके कडवट लोकमत असले तरी या मंडळाची नेमणूक झाल्यावर त्याला सहकार्य देण्याबाबत जी विलक्षण उदासीन वृत्ती दिसून आली त्याला खरोखरच तोड नाही ! बरं, ही उदासीनता दाखविणारेही कोणी सोमेगोमे नव्हेत तर विलक्षण जागरूक असल्याची ज्यांची ख्याती अशी ही सारी मंडळी समितीला सहकार्य देण्याबाबत किती उदासीन असावीत हे पाहिले म्हणजे खेद होतो. याबाबतची काही आकडेवारी पहाण्यासारखी आहे.

आकाशवाणी आणि दूरदर्शनबाबतची एक प्रश्नावली समितीने तयार केली आणि एकूण ४२०० मंडळींना ही प्रश्नावली पाठविण्यात आली. जास्तीत जास्त लोकांचा प्रतिसाद मिळता तर समितीला काम करणे सोपे जाणार होते; परंतु याबाबत सर्वच व्यक्तींकडून खेदजनक प्रतिसाद मिळाला. ज्यांना ही पत्रिका पाठविण्यात आली त्यामध्ये विविध राज्यांचे राज्यपाल, मंत्री, विद्यापीठांचे उपकुलगुरू, संसदसदस्य, पत्रकार, सामाजिक कार्य करणारी मंडळी अशा विविध क्षेत्रांमधील मंडळींचा समावेश होता. आकाशवाणी आणि दूरदर्शन यावर जास्तीत जास्त टीका करणाऱ्या या विविध क्षेत्रांमधील मंडळींना जेव्हा प्रत्यक्ष काही विधायक काम करण्याची संधी मिळाली त्या वेळी त्यांपैकी बहुसंख्यकांनी या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. या संदर्भातील ही बोलकी आकडेवारी पहा :– राज्यपाल, मुख्यमंत्री, संसदसदस्य आणि मंत्री यांना एकूण ८०६ प्रश्नावली पाठविण्यात आल्या. त्यांपैकी केवळ १७ जणांकडून उत्तरे आली. २४७ जाहिरातदार आणि जाहिरातकंपन्यांना प्रश्नावली पाठवली. त्यांपैकी केवळ ९ जणांच्या प्रतिक्रिया आल्या. प्राध्यापक, उपकुलगुरू व विद्यापीठांशी संबंधित असलेल्या ४१४ जणांपैकी केवळ १९ मंडळींनी उत्तरे पाठविण्याची आवश्यक जबाबदारी पार पाडली. पत्रकारांची उदासीनता जास्त झोंबरी आहे. समितीने आपल्या प्रश्नावलीच्या रूपाने ६४४ जणांशी संपर्क साधला आणि अतिकार्यमग्न असल्यामुळे असेल कदाचित; पण ६४४ जणांपैकी फक्त २४ मंडळींनी विचारलेल्या प्रश्नांबाबत आपले मत नोंदविले. बाहेरच्यांचे एक सोडा; पण या समितीच्या कामकाजाचा ज्यांच्यावर प्रत्यक्ष परिणाम होणार आहे अशा आकाशवाणी आणि दूरदर्शनाच्या अधिकाऱ्यांनी तरी पुरेशी जागरूकता दाखवावी की नाही ? पण नाही ! तिथेही असाच कडवट अनुभव आला. ९४ अधिकाऱ्यांपैकी केवळ १३ मंडळींनी आपले मत नोंदविले ! ज्यांच्याकडून या संदर्भात जास्तीत जास्त सहकार्याची अपेक्षा होती अशा विविध गटांमधील सगळ्या मंडळींनी समितीची निराशा केली. तरी समितीने आपल्या कामात कुचराई केलेली नाही. तिने आपले काम चोख बजावले आणि एक परिपूर्ण अहवाल सादर केला. अहवालावर नजर टाकली असता समितीच्या सदस्यांनी भरपूर मेहनत घेऊन आणि त्वरेने काम करून आपला अभ्यासपूर्ण अहवाल सादर केला आहे हे प्रथम नमूद केलेच पाहिजे.

आकाशवाणी व दूरदर्शन यावर शासनाचे जे परिपूर्ण नियंत्रण आहे ते कसे नाहीसे करता येईल आणि आकाशवाणी आणि दूरदर्शन या दोन्ही यंत्रणा स्वायत्तपणे कशा काम करू शकतील या दृष्टीने समितीने सर्व प्रश्नांची पहाणी केली असून आकाशवाणी व दूरदर्शन यांना माहिती आणि नभोवाणीखात्यापासून पूर्ण वेगळे काढून या दोन्हींसाठी एकत्र असे विश्वस्तमंडळ नेमण्याची शिफारस केली आहे. या मंडळाचे कामकाज कसे चालावे ? त्याच्या आर्थिक प्रश्नांचा विचार कशा प्रकारे करावा ? नोकरभरतीचे–बढतीचे स्वरूप कसे असावे ? या विविध प्रश्नांची उत्तरे अहवालामध्ये पहावयास मिळतात. लोकांना अचूक व खरी माहिती व वृत्त पुरविणे, त्यांना शिक्षण देणे, महत्त्वाच्या प्रश्नांवर लोकमत तयार करणे आणि जनतेची चांगली करमणूक करणे यासाठी या माध्यमांचा वापर व्हावा अशी

शिफारस समितीने केली आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शन यांच्या कामाबाबत श्रोत्यांच्या व प्रेक्षकांच्या काय प्रतिक्रिया आहेत याची दखल घेऊन या माध्यमाबाबतच्या अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या असत्या तर ते जास्त सयुक्तिक ठरले असते; परंतु तसे झालेले दिसत नाही. अर्थात आकाशवाणी काय – किंवा दूरदर्शन काय यांनी कशा प्रकारे काम करावे याबाबत समितीने जे विचार व्यक्त केले आहेत त्याबाबत दुमत असण्याचे प्रयोजन नाही. आकाशवाणी आणि दूरदर्शन यांच्या एकत्रीकरणाची समितीची शिफारस स्वागतार्ह आहे. ज्या प्रदेशामध्ये अशा स्वतंत्र संस्था आहेत त्या देशातही–कार्यक्रमांचा दर्जा अथवा व्यवस्थापकीय यंत्रणा या दृष्टीने काही विशेष यश मिळालेले दिसत नाही. आकाशवाणी व दूरदर्शन यामधील अधिकाऱ्यांचा केवळ परस्पर संपर्क असणे हितावह नाही तर त्यांचा खातेबदल कार्यक्षमतेच्या दृष्टीने उपकारक ठरतो. इंजिनिअर्ससाठी वेगळी यंत्रणा नाकारण्याचा निर्णय स्वागतार्ह असून आकाशवाणी व दूरदर्शन या दोन्ही यंत्रणा परिपूर्णपणे आकाशभारतीच्या छत्राखाली आणण्यात आल्या आहेत.

आकाशभारतीचे नियंत्रण विश्वस्तमंडळाकडून होईल. त्यांची संख्या किमान १२ व जास्तीत जास्त २१ असेल. त्यापैकीच एकाची विश्वस्तमंडळाच्या अध्यक्षपदी नेमणूक करण्यात येईल. विश्वस्तमंडळाचे तीन सदस्य पूर्ण वेळ काम करणारे असतील व त्या प्रत्येकाला वेगळे कार्यक्षेत्र असेल. त्या तिघांपैकी एक जण वृत्तविभाग व प्रचलित घडामोडी याबाबतचे काम पाहील, तर दुसरा शिक्षण व सांस्कृतिक विभागाचे व तिसरा करमणूकविभागाचे काम पाहील. त्याखेरीज आठ सदस्य अर्धवेळ काम करणारे असतील. त्यामध्ये एक जण प्रसरणविभागाच्या शास्त्रीय तांत्रिक बाबींचा जाणकार असेल, तर दुसरा व्यवस्थापन व आर्थिक क्षेत्रामधील अधिकारी व्यक्ती असेल. वास्तविक शास्त्रीय व तांत्रिक विभागासाठी तसेच आर्थिक व व्यवस्थापकीय जबाबदाऱ्यांच्या संदर्भात पूर्ण वेळ विश्वस्ताची शिफारस समितीने का केली नाही ते समजू शकत नाही. त्यामुळे तुलनेने या विभागांना नवीन यंत्रणेमध्ये महत्त्व कमी आहे असा समज राहून त्यांना नेहमीच दुय्यम स्थान दिले जाण्याचा धोका नजरेआड करता येणार नाही. या विश्वस्तांची नेमणूक कशी होणार? हा महत्त्वाचा प्रश्न असून या संदर्भातील समितीच्या शिफारसीबाबत अनेक मतभेद संभवतात. विश्वस्तमंडळाचा अध्यक्ष आणि अन्य विश्वस्त यांची नेमणूक राष्ट्रपतींनी पंतप्रधानांच्या सल्ल्याने करावी अशी शिफारस समितीने केली आहे. पंतप्रधानांनी याबाबतीत लोकसभेमधील विरोधी पक्षाच्या नेत्याचा विचार घ्यावा अशीही समितीची अपेक्षा आहे. पंतप्रधानांना विश्वस्त निवडण्याबाबत पूर्ण स्वातंत्र्य समितीने दिलेले नाही, ही त्यातल्या त्यात महत्त्वाची बाब आहे. पंतप्रधानांना निवडसमिती एक यादी सादर करील. ही निवडसमिती कायम स्वरूपाची असून निवडसमितीचे सदस्यत्व हे अधिकारपदाशी निगडित आहे. समितीच्या शिफारसीप्रमाणे भारताचे मुख्य न्यायाधीश, केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष आणि लोकपाल हे या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतील. या निवडसमितीला शास्त्रीय, सांस्कृतिक किंवा कलाक्षेत्राशी संबंधित अशा मान्यताप्राप्त दोन व्यक्तींना समितीमध्ये सहभागी करून घेण्याचा अधिकार आहे. तसेच आवश्यकता वाटल्यास ही निवडसमिती विश्वस्तसमितीच्या नावांची शिफारस करण्यापूर्वी काही मान्यवर व्यक्ती अथवा संस्था यांच्याशी विचारविनिमय करू शकेल. त्यानंतर ही निवडसमिती ज्या नावांची शिफारस करील त्यातून राष्ट्रपती पंतप्रधानांच्या सल्ल्याने अंतिम निवड करतील. म्हणजे तशा अर्थाने निवडीचा अंतिम अधिकार पंतप्रधानांच्या हाती जाणार आहे. आकाशभारती ही राष्ट्रीय संस्था असताना आणि देशामधील अनेक राज्यांत अन्य पक्षांची सत्ता असताना पंतप्रधानांना याबाबत इतके व्यापक अधिकार देणे कितपत योग्य आहे याचा पुनर्विचार होणे जरूर आहे. शासकीय नियंत्रण किमान पातळीवर नेऊन ठेवणे हा जर *आकाशभारतीच्या निर्मितीमागील मुख्य उद्देश* आहे तर जे मंडळ आकाशभारतीचे नियंत्रण करणार त्याच्या नेमणुकीबाबतचा अखेरचा शब्द पंतप्रधानांचा असावा ही सूचना विचित्र वाटते. आकाशभारतीला स्वायत्तता मिळावी म्हणून ज्या १८ उद्दिष्टांचा उल्लेख करण्यात आला आहे त्याच्या परिपूर्ततेसाठी घटनेमार्फत ग्वाही मिळावी असेही समितीला वाटते. स्वायत्ततेबाबत जास्तीत जास्त दक्षता घेण्यात आली असली तरीही आकाशभारतीचे व संसदेचे संबंध आणि आकाशभारतीचे आर्थिक परावलंबित्व या दोन गोष्टी पुन्हा पाय मागे खेचणाऱ्या आहेत. आर्थिक परावलंबित्व हे केवळ यंत्रणेचे आधुनिकीकरण किंवा विस्तार या संदर्भात असते तर समजण्यासारखे होते; परंतु हे परावलंबित्व तर चालू खर्चाबाबतही दिसून येत असल्याने ती एक चिंतेची बाब झाली आहे.

आकाशभारती आणि संसद यांचे संबंध कसे असावेत याबाबत समितीच्या मनात गोंधळ उडालेला दिसतो. समितीच्या अहवालाच्या पहिल्या भागातील ४४ व्या पानावर असे नमूद करण्यात आले आहे की, आकाशभारतीच्या संदर्भात प्रश्न विचारण्याचा संसदसदस्यांना पूर्ण अधिकार आहे. एका बाजूने असा अधिकार दिल्यावर त्यापुढील वाक्यातच समिती लगेच तो अधिकार मर्यादित करू पहाते. कारण पुढील वाक्य असे आहे–असे असले तरी आमची अशी अपेक्षा आहे की, संसदसदस्य आकाशभारतीच्या दैनंदिन कारभाराबाबत प्रश्नांची वावटळ उठविणार नाहीत. संसदसदस्य जर वृत्तपत्रीय बातमीचा किंवा संपादकीयाचा आधार घेऊन हरकतीचा मुद्दा उपस्थित करू शकतात तर आकाशभारतीबाबत त्यांनी संयमी असावे असे सुचविणे कितपत संयुक्तिक आहे ? समितीने आर्थिक बाजूंचा आणि स्वायत्ततेचा पूर्ण विचार केलेला दिसत नाही. आकाशभारती आर्थिक सहकार्यासाठी सरकारवर जर फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहणार असेल तर समितीची कितीही इच्छा असली तरी स्वायत्ततेला मर्यादा पडतात हे नाकारता येणार नाही. समितीच्या शिफारसी जशाच्या तशा स्वीकारल्या तरीही आकाशभारती आर्थिक बाबतीत कधीच स्वयंपूर्ण होऊ शकत नाही ही एक विलक्षण खेदजनक बाब आहे. आर्थिक बाबतीत समितीच्या शिफारशी चांगल्याच अघळ-पघळ आहेत. आकाशवाणी आणि दूरदर्शन यांची सर्व मालमत्ता आकाशभारतीला कायमची देऊन टाकण्यात यावी. त्याखेरीज वार्षिक अंदाजपत्रकामधील ज्या भांडवली रकमा खर्च न झाल्यास बुडत नाहीत अशा रकमाही आकाशभारतीला देऊन टाकाव्यात. एवढ्यानेही आकाशभारती मार्गी लागत नाही. आकाशवाणी व दूरदर्शनच्या पुनर्रचनेसाठी

शासनाने वार्षिक खर्चासाठी राखून ठेवलेली सर्व रक्कम आकाशभारतीला १९८२ पर्यंत देण्यात यावी. याखेरीज विस्तारयोजनांसाठी प्रचंड भांडवलाबाबतचे जे प्रतिपादन समितीने केले आहे त्यामध्ये शासनाचा उल्लेख नसला तरीही हे विस्तारयोजनांसाठी लागणारे भांडवलही शासनाने उपलब्ध करून द्यावे अशीच समितीची अपेक्षा दिसते. आकाशवाणीच्या विस्तारयोजनांसाठी ७५ ते ७९ या काळासाठी ७१५ कोटी व दूरदर्शनसाठी १९८५ पर्यंत ३७१ कोटी रुपयांचा भांडवली खर्च अपेक्षित आहे.

आकाशभारतीच्या उत्पन्नाच्या बाजूला परवाना–फी, व्यापारविभागाचे उत्पन्न आणि रेकॉर्ड, टेप्स यांची विक्री, तसेच स्टुडिओ आणि यंत्रसामुग्री भाड्याने देऊन मिळणारे उत्पन्न यांचा समावेश आहे. या उत्पन्नातून वाढता तुटीचा भरणा भरून काढणे खरोखरच कठीण आहे. १९७८–७९ साली असलेली १८·१६ कोटी रुपयांची तूट १९८२–८३ पर्यंत ५०·०४ कोटींवर जाईल असा अंदाज आहे. आकाशभारतीच्या तत्त्वांना मान्यता देऊन जर काही शैक्षणिक संस्था आकाशवाणीकेंद्रे स्थापण्यासाठी पुढे आल्या तर त्यांना सहकार्य द्यावे अशी समितीची शिफारस आहे. त्यामुळे आकाशभारतीच्या स्वायत्ततेला विशेष अर्थ प्राप्त होईल असा जो समितीचा दावा आहे तो कागदोपत्री ठीक असला तरी प्रत्यक्षामध्ये खाजगी क्षेत्रामधून आकाशवाणीकेंद्र सुरू करण्यासाठी भांडवल उपलब्ध होईलसे दिसत नाही आणि दुसरे म्हणजे खाजगी क्षेत्रामधील ही केंद्रे शासकीय दबाव मानणार नाहीत असे ठामपणे कसे म्हणता येईल? आकाशभारतीच्या बहुविध उद्देशांमध्ये करमणूक हे एक प्रमुख उद्दिष्ट असले तरी खाजगी क्षेत्रामधील केंद्रे चित्रपटांवर आधारित लोकप्रिय कार्यक्रमांचाच पाठपुरावा करू लागली तर काय करणार? असे असले तरी या एकाधिकारी क्षेत्रामध्ये स्पर्धेचे पर्व सुरू झाले तर त्याचे काही लाभ मिळतील असे वाटते. खेरीज खाजगी क्षेत्रातील ही केंद्रे आकाशभारतीच्या विश्वस्तमंडळाला जबाबदार असतील ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब आहे.

आकाशभारतीच्या व्यवस्थापनाबाबत ज्या सूचना करण्यात आल्या आहेत त्यांमध्ये एक केंद्रीय मंडळ सुचविण्यात आले आहे. हे केंद्रीय मंडळ धोरण, व्यवस्थापन, कार्यक्रमांची ठळक रूपरेखा याबाबत मार्गदर्शन करील. या मंडळाच्या मार्गदर्शनाप्रमाणे पाच विभागीय संचालक काम करतील. या विभागीय संचालकांना सहाय्य करण्यासाठी विभागीय मंडळ असेल आणि प्रत्येक विभागाच्या नियंत्रणाखाली १० ते १५ केंद्रे येतील. प्रत्येक केंद्र हे तळाचा टप्पा असेल आणि कार्यक्रम संयोजनाबाबत केंद्राधिकाऱ्यांना व्यापक अधिकार असतील. अधिकारांचे मोठ्या प्रमाणात विकेंद्रीकरण व्हावे ही समितीची अपेक्षा असून तसे ते खरोखरच झाले तर या चार-स्तरीय यंत्रणेचा भरपूर फायदा मिळू शकेल. तथापि अधिकाराचे हे विकेंद्रीकरण कसे व्हावे याचा तपशील अहवालामध्ये पहावयास मिळत नाही. त्यामुळे पुष्कळ गोंधळ उडण्याची शक्यता असून विशेषतः केंद्रप्रमुखाच्या पातळीवर निर्णय घेतले जाण्यास विलंब लागेल.

## कर्मचारी–भरती–अधिकारी–कार्यक्षमता

कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर आकाशभारतीचे भवितव्य अवलंबून आहे अशी समितीची रास्त धारणा असून या संदर्भात समितीने काही चांगल्या सूचना केल्या आहेत. आकाशभारतीची नोकरभरतीची एक स्वतंत्र यंत्रणा असावी व या निवडसमितीने नवीन नोकर-भरती, प्रशिक्षण, योग्य उमेदवारांची बढती याबाबतचे काम करावे अशी अपेक्षा आहे. व्यक्तीचे गुणावगुण पाहून योग्य मंडळींना संधी देणे आकाशभारतीला शक्य होणार असले तरी वशिलेबाजीचा प्रकार येथेही होणारच. लोकसेवा-आयोगामार्फत होणाऱ्या भरतीपेक्षा ही आकाशभारतीमार्फत होणारी भरती व बढती अधिक योग्य उमेदवारांच्या वाट्याला येईल असे वाटते. खेरीज कर्मचाऱ्यांची गटवारी नाहीशी करून एकसूत्री यंत्रणा निर्माण करण्याचा प्रयत्न स्तुत्य आहे. खेरीज वेतनसुधारणा, कलाकारांच्या कायम नेमणुका याबाबतच्या सूचनाही स्वागतार्ह असून कॉंट्रॅक्ट पद्धतीने काम करणारे कर्मचारी त्यांना कायम करून घेतल्यास जास्त आस्थेवाईकपणे काम करतील असे वाटते. नोकरभरतीचे काम अंतर्गत यंत्रणेमार्फत करण्याचे ठरल्यावर तक्रारींचा निचरा करण्यासाठीही यंत्रणा उभारणे आलेच. समितीने एक केंद्रीय तक्रार-निवारण मंडळ नेमण्यात यावे असे सुचविले आहे. या मंडळावर चार सदस्य असतील. भारताचे मुख्य न्यायाधीश त्यांच्या नेमणुका करतील आणि त्यांना काही न्यायालयीन अधिकारही असतील. आकाशभारतीबाबत जनतेकडून केल्या जाणाऱ्या तक्रारींचे निराकरणही हेच मंडळ करील. कर्मचाऱ्यांच्या महत्त्वपूर्ण तक्रारींचीही दखल याच मंडळामार्फत घेतली जाईल. आकाशभारतीच्या श्रोत्यांच्या व प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया लक्षात आणून देण्यासाठी एक वेगळे मंडळ असेल. कार्यक्रम, लोकांची आवड-निवड यांची सांगड घालण्याच्या दृष्टीने या मंडळाचा उपयोग होईल.

एका अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर केंद्रसरकारने नेमलेल्या समितीने तयार केलेल्या अहवालाचा हा धावता आढावा. जागेच्या हिशेबात या अहवालाला जरा जास्त जागा मिळाली आहे हे खरे; तथापी अहवालाबाबत एकंदर उदासीनता दिसून आल्याने मुद्दामच त्याची विस्ताराने दखल घेतली आहे. अहवाल आता सरकारच्या हाती आहे आणि आकाशवाणी व दूरदर्शन यांना स्वायत्तता देण्यास सरकार वचनबद्ध आहे हे मान्य केल्यावर सरकार अहवालातील महत्त्वाचा भाग स्वीकारणार ही दिसती गोष्ट आहे. तथापी सरकार आकाशभारतीचे हे प्रकरण प्रत्यक्ष कसे मार्गी लावते हे आता पहायचे. ◻

## ◻ मंत्रीणबाईंची फटफजिती

विरोधी पक्ष जागरूक असला की मंत्र्यांना जास्तच जागरूक असावे लागते. त्यांच्या एखाद्या गलथानपणाचेही भरपूर भांडवल करून विरोधी पक्ष एखाद्या मंत्र्याची कशी फटफजिती उडवून देऊ शकतो याचे दर्शन तामिळनाडू विधानसभेमध्ये झाले. एके काळी मुख्यमंत्री

पृष्ठ १४ वर

परराष्ट्रीय घडामोडी

# ॲम्नेस्टी इंटरनॅशनलचा अहवाल

चन्द्रशेखर पुरन्दरे

## बांगलादेश आणि इराण

बांगलादेश : अत्यंत अस्थिर राजकीय परिस्थिती मुजीबच्या हत्येनंतर बांगला देशात निर्माण झाली. खोंडकार मुस्ताक अहमद, सायेम आणि आता मिलिटरीचा जनरल झियाउल रहमान यांच्या अल्पकालीन राजवटीमध्ये देशाचे कल्याण होणे अशक्यच होते. त्या कारकीर्दीत झाले ते एवढेच की, आपल्या राजकीय विरोधकांचे काटे काढण्यात आले. या दरम्यान मोठ्या प्रमाणावर बुद्धिवंतांची हत्या झाली तरीही नंतरच्या नियंत्रणामुळे खरा आकडा बाहेरच्या जगालाच काय, बांगलावासियांनाही कळणे कठीण जावे. जनरल झियाची राजवट बऱ्यापैकी सुरळीतपणे चालल्याचा भास होत होता; पण अपरिहार्यपणे मिलिटरीच्या सर्वेसर्वाला मिलिटरीतूनच विरोधाची सुरुवात होते. बहुधा त्या विरोधाची सुरुवात अधिक महत्त्वाकांक्षी माणसामुळे न होता जो शासनकर्ता आहे त्याची राजकीय महत्त्वाकांक्षा वाढल्याने होते.

जनरल झियाचेही तसेच झाले. एकदा सत्तेच्या खुर्चीचा मऊपणा कळल्यावर परत लष्कराच्या हुडेलहप्पीकडे त्याचे मन ओढ घेईना, याला तो तरी काय करणार ? पण याच कारणामुळे लष्करातले त्याचे समर्थक बिथरले. बंदुकीच्या नळीच्या जोरावर सत्तेवर आलेल्या झियाला हे खपले नाही. लष्करातून ज्यांनी विरोधाचा आवाज उठवणे सुरू केले, त्यांना तर मारण्यात आले. आधीच्या राजवटीतले विशेषत: मुजीबच्या अवामी लीगचे जे राजकैदी तुरुंगात डांबण्यात आले होते, त्यांचे हाल तर अवर्णनीयच होते. यांचेही लष्करात काही लागेबांधे होतेच. त्यांनीही तिथेच आवाज उठविला.

याचा परिणाम म्हणून सप्टेंबर १९७७ ला बांगला देशात बोग्रा या ठिकाणी एक उठाव झाला. हा लष्करी होता हे महत्त्वाचे. तो पसरण्याच्या आतच चिरडण्यात आला. नंतर ज्यांनी त्यामध्ये भाग घेतला होता, त्यांना कोर्ट मार्शलला तोंड द्यावे लागले.

ॲम्नेस्टी इंटरनॅशनल या संघटनेने २७ फेब्रुवारीला एक अहवाल प्रसिद्ध केला. त्यामध्ये बांगलादेशातील या राजकीय दडपशाहीची विस्तृत माहिती देण्यात आली आहे. सप्टेंबर आणि ऑक्टोबर १९७७ च्या उपरिनिर्दिष्ट अयशस्वी उठावानंतर कमीत कमी १३० लष्करी अधिकाऱ्यांना गोळ्या घालून ठार मारण्यात आले. ही संख्या वास्तवात काही शेकड्यांत जाण्याचीही शक्यता आहे. लष्करी चौकशीचे हे सत्र डिसेंबर १९७७ पर्यंत चालू होते. या चौकशीमध्ये अर्थातच आरोपीला स्वत:च्या समर्थनाची अथवा बाजू मांडण्याची संधी देण्यात आली नाही. बांगलादेशामध्ये आपल्याकडच्या मिसासारखे स्पेशल पॉवर्स ॲक्ट आणि इमर्जन्सी पॉवर रूल्स असे दोन कायदे अस्तित्वात आहेत. त्याअन्वये कुणालाही अटक करणे व न्यायालयीन कामकाजाशिवाय नुसतेच तुरुंगात डांबून ठेवणे या गोष्टींना मान्यता मिळाली आहे. या दोन कायद्यांच्या आधारे बांगलादेशात आज दहा ते पंधरा हजार राजकीय कैदी असावेत असा अंदाज या अहवालात वर्तविण्यात आला आहे.

सरकारने अधिकृतरीत्या फक्त ३७ जणांनाच ठार मारण्यात आल्याचे जाहीर केले आहे; पण ढाक्यामध्ये २ ऑक्टोबरला आणि बोग्रामध्ये ३० सप्टेंबरला जे उठाव झाले, त्यासंबंधात ९२ जणांना फाशी फर्माविण्यात आली होती. ॲम्नेस्टी इंटरनॅशनलकडे ज्यांना फाशी देण्यात आले अशा १३० जणांची आणि ज्यांची नावे वेटिंग लिस्टवर आहेत अशा २७ जणांची यादी आहे आणि ती त्यांनी प्रसिद्धही केलेली आहे.

ॲम्नेस्ट इंटरनॅशनलने बांगलादेश सरकारला नागरी कायद्यांचा अंमल पुन्हा सुरू करण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या बाकी विनंत्या अशा– (१) मार्शल लॉ कोर्टसची कक्षा कमी करावी. (२) सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ ज्यांना विना चौकशी तुरुंगात डांबण्यात आले आहे, अशांच्या सुटकेची लवकरात लवकर व्यवस्था करावी. (३) राजकीय कैदी ज्या अवस्थेत ठेवण्यात येतात ती ताबडतोब सुधारावी आणि युनायटेड नेशन्स स्टॅंडर्ड मिनिमम रूल्स फॉर द ट्रीटमेंट ऑफ प्रिझनर्स अन्वये ज्या किमान व्यवस्थांची जरुरी आहे त्या कराव्यात.

बांगलादेश सरकारतर्फे ५ ऑक्टोबर १९७७ ला ॲम्नेस्टी इंटरनॅशनलला वरील पत्राची पोच पाठविण्यात आली. त्यात त्यांनी ॲम्नेस्टी इंटरनॅशनलने जाहीर केलेल्या राजकीय कैद्यांच्या संख्येला आव्हान दिले आहे; पण अहवालाच्या इतर भागाबद्दल निषेध नोंदविलेला नाही.

इराण : इराणचा शहा हे एक बडे प्रस्थ आहे. सोज्ज्वळ मुखवट्याने वावरणारा हा हुकुमशहा आहे. कोणत्याही प्रकारचा विरोध दडपणे एवढेच तो जाणतो. त्यामुळेच मध्यंतरी तो अमेरिकेत कार्टरच्या भेटीसाठी गेला असता इराणी विद्यार्थ्यांनी प्रचंड निदर्शने केली होती.

राजकीय विरोधकांना लष्करी कोर्टापुढे उभे करून खतम करायचे हा मार्ग शहाने अवलंबिला आहे. कोर्टातर्फे जी चौकशी होते ती पूर्णत: एकतर्फी असते. तिचे प्रमुख काही पैलू पाहिले तरी ही गोष्ट स्पष्ट होईल.

१) कैद झाल्यानंतर आरोपीला कोणताही कायदेविषयक सल्ला घेण्याची परवानगी नसते.

२) चौकशी सुरू होण्याआधी दीर्घकाळपर्यंत तुरुंगात ठेवण्यात येते आणि या कालावधीतही कायदेविषयक सल्ला घेता येत नाही आणि अमानुष हाल सहन करावे लागतात.

३) नॅशनल इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी ऑर्गनायझेशन ही आपल्याकडच्या CBI सारखी इराण सरकारची संस्था. या संस्थेतर्फे

सर्व चौकशी होते. ती गुप्त असते. आरोपीचे वकील सरकारवर उलटणार नाहीत याची खात्री असलेले लष्करी अधिकारी देण्यात येतात. ते चौकशीआधी आरोपीला भेटू शकत नाहीत.

४) आरोपीला त्याच्यावरच्या आरोपांची फाइल पंधरा दिवसांसाठी अभ्यासायला मंजुरी असते; पण ती कोर्टाच्या ऑफिसातच पहावी लागते आणि स्वतःसाठी प्रत काढता येत नाही.

५) चौकशी चालू असताना साक्षीदारांना बोलावण्याची सक्ती नसते. म्हणजेच, आरोपी साक्षीदारांची उलटतपासणी घेऊ शकत नाही. या साक्षीदारांच्या साक्षींवरच सगळा मामला चालू असतो आणि त्यासाठी पुरावा काहीही नसतो. यावरून या बिनबुडाच्या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात यावे.

इराणची राजधानी तेहरान येथे चाललेल्या एका अशा फार्सिकल चौकशीला ब्रायन रॉबेल हा ब्रिटिश बॅरिस्टर हजर होता. त्याने दिलेल्या माहितीवरून ॲम्नेस्टीने हा अहवाल प्रसिद्ध केलेला आहे.

८ फेब्रुवारी १९७८ ला इराण सरकारने युनोला युनायटेड नेशन्स डिक्लरेशनप्रमाणे राजकीय कैद्यांशी वागण्याचे वचन दिले; पण जोपर्यंत आरोपी सरकारने गोळा केलेले पुरावे तपासू शकत नाही, साक्षीदारांची उलटतपासणी करू शकत नाही किंवा स्वतःचे साक्षीदारही आणू शकत नाही, तोपर्यंत या वचनाला किंमत शून्य रहाते.

वरील अहवाल अमेरिकेच्या एका सबकमिटीला हव्या असलेल्या माहितीच्या संदर्भात २८ फेब्रुवारीला प्रसिद्ध करण्यात आला. ही सबकमिटी अमेरिकन काँग्रेसची आहे आणि विशेष म्हणजे याच शहाला अमेरिकेची जबरदस्त लष्करी मदत चालू आहे. त्यामुळे अमेरिकेच्या विरुद्धही मोठ्या प्रमाणात लोकमत जागृत करण्यासाठी शहाचे विरोधक खटपट करीत आहेत. ◻

## इटलीच्या माजी पंतप्रधानाचे अपहरण

१६ मार्चला सकाळी सव्वानऊ वाजता रोममध्ये इटलीच्या सध्याच्या अराजकावर कळस चढवील अशी घटना घडली. इटलीच्या माजी पंतप्रधानाला चक्क पळवून नेण्यात आले! आल्दो मोरो हा तो पंतप्रधान. तो सकाळी चर्चमध्ये जाऊन परत येताना मोन्त मारिओ या रोममधल्या पॉश विभागात हा प्रकार घडला. मोरोला सरळ त्याच्या मोटारीतून खेचून बाहेर काढण्यात आले आणि दुसऱ्या मोटारीत कोंबून पळवण्यात आले. मोरो ज्या मोटारीतून चालला होता, तिच्या पुढे–मागे संरक्षकदलाच्या मोटारी होत्याच; पण दहशतवाद्यांनी चौकामध्ये आपली मोटार त्याच्या मोटारीपुढे घातली. त्यामुळे मोरोची मोटार कचकन् ब्रेक लावून थांबली त्याबरोबर मागची संरक्षक मोटार त्याच्या मोटारीवर आदळली. एवढ्यात दोन दहशतवाद्यांनी बाहेर येऊन गोळीबार सुरू केला होता. तोही इतक्या कौशल्याने केला की, मोरो शाबूत राहिला आणि बरोबरचे दोन बॉडी-गार्डस् मेले! तोपर्यंत फुटपाथवरच्या झाडांच्या कुंड्यांच्या मागे लपून बसलेले आणखी चार गनीम अकस्मात अवतीर्ण झाले आणि त्यांनी मागच्या गाडीतल्या लोकांचा निकाल लावला. विद्युत्वेगाने मोरोला गाडीत घालून पळवण्यात आले. त्याचा अजून ठावठिकाणा नाही!

रेड ब्रिगेड : हे कृत्य इटलीचे नागरी जीवन उद्ध्वस्त करू पहाणाऱ्या रेड ब्रिगेडचे. रेड ब्रिगेड ही अति डावी दहशतवादी संघटना. आपण करतो आहोत ती क्रांती आहे आणि करत असलेल्या विध्वंसनात जर आपला बळी गेला तर ते हौतात्म्यच होय अशा विकृत गंडाने पछाडलेल्या या बहुतांशी मध्यमवर्गीय तरुण पिढीने इटलीची अलीकडे फार हानी केलेली आहे. आजवर उद्योगपती हे त्यांचे लक्ष्य असे. आता आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी राजकीय क्षेत्रातील बडे लोक उचलले जातात. ३ मार्च १९७२ला मिलानमधल्या सीट-सोमेन्स फॅक्टरीचा डायरेक्टर इदालगो मॅशिरिनी हा या तेव्हापासून अव्याहत चालू असणाऱ्या हत्याकांडाचा पहिला बळी! नंतर दुसरा मोठा बळी म्हणजे जेनामधला डेप्युटी पब्लिक प्रॉसिक्युटर मारिओ सोसी. हा या दहशतवाद्यांचा परामर्श त्यांच्याच भाषेत घेतला पाहिजे अशा मताचा होता. त्याला पळवण्यात आले आणि ८ गनिमांवर चालू असणाऱ्या चौकशीचे कामकाज ताबडतोब बंद करून त्यांना मुक्त करावे या अटीवर सोडून देण्यात आले. तो महिनाभर त्यांच्या ताब्यात होता; पण फ्रान्सेस्को कोको ह्या चीफ पब्लिक प्रॉसिक्युटरने चौकशी बंद करण्यास नामंजुरी दिली आणि त्याबद्दल त्याचा खून करण्यात आला.

आजवर या रेड ब्रिगेडवाल्यांनी २,००० राजकीय दहशतीचे प्रकार घडवून आणले आहेत. जवळजवळ ३०० लोकांना पळवण्यात आले. त्यांच्या मोबदल्यात वसूल केलेली खंडणीच साडेसहा कोटी पौंड आहे. आज असे एकही धनिक इटालियन कुटुंब नाही की, ज्यांना यांचा तडाखा बसला नाही. जवळजवळ १,००० लोक आज मोरोसारखेच पूर्ण संरक्षित अवस्थेत हिंडतात. ज्युडो, कराटेचे क्लासेस भरभरून चालतात, स्पेशल बुलेटप्रूफ मोटर्ससाठी प्रचंड वेटिंगलिस्ट आहे आणि १९७५ सालीच ३६,००० कुत्रे घराच्या राखणीसाठी विकले गेले. तरीही हिंसाचार थैमान घालतोच आहे. समाज बदलणाच्या नावाखाली हा गोंधळ चालू आहे.

रेनाटो कुर्सिओ हा यांच्या प्रमुखांपैकी एक. त्याच्यावर आणि त्याच्या १४ साथीदारांवर तुरीनमध्ये सध्या खटला चालू आहे. त्यांच्यावरही असेच हिंसाचाराचे अनेक आरोप आहेत. हा खटला काढून घेऊन त्याला सोडून द्यावे या मागणीसाठी आल्दो मोरो याला पळवण्यात आले आहे. हा रेनातो कुर्सिओ पूर्वी तुरुंगातून पळून गेला होता; पण त्याला त्याच्या मैत्रिणीबरोबर परत पकडण्यात आले. आल्दो मोरोला पळवून नेण्यात आल्यानंतर सगळ्या रोममध्ये भोंगे वाजवत पोलिसांच्या गाड्या पळू लागल्या. प्रत्येक घराची झडती घ्यायला सुरुवात झाली; पण अजून त्यांच्या प्रयत्नांना यश आलेले नाही. दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी गनिमांतर्फे मोरोचा फोटो आणि एक पत्र प्रसिद्ध करण्यात आले. त्यात तो खटला बंद करण्याची मागणी आहे. नाही तर मोरोला ठार मारण्याची धमकीही देण्यात आली आहे.

आल्दो मोरो : आल्दो मोरो हा एकसष्ट वर्षांचा सध्याच्या सत्तारूढ ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पार्टीचा अध्यक्ष, आजपर्यन्त पाच वेळा इटलीचा पंतप्रधान झालेला आहे. इटलीच्या आगामी अध्यक्षीय निवडणुकीतला तो एक

उमेदवार असणार होता आणि तोच अध्यक्ष होण्याचीही शक्यता होती. आजवरचे इटलीचे युद्धानंतरचे सर्वांत दीर्घकाळ टिकलेले ( ८२९ दिवस ) सरकार त्याच्याच पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत होते. आग्नेय इटलीत २३ सप्टेंबर १९१६ मध्ये जन्मलेला आल्दो मोरो १९४८ ला बारी मतदारसंघातून पार्लमेंटवर निवडला गेला, १९५५त कायदेमंत्री झाला आणि १९६३ ला पंतप्रधान ( पहिल्यांदा ) झाला. त्याचे महत्त्वाचे किंवा इटलीचा क्रमांक एकचा इसम असे आज असलेले स्थान त्याच्या डाव्या पक्षांना सत्तेचे दरवाजे उघडण्याच्या भूमिकेने त्याला प्राप्त झाले आहे. सध्या इटलीत राजकीय अस्थैर्य एवढे आहे की, कम्युनिस्ट आणि ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पार्टी यांनी एकत्र आल्याखेरीज राज्यच चालू शकणार नाही असे मोरोचे मत. कम्युनिस्टांना ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षातून अन्तस्थ विरोध आहे तसाच ख्रिश्चन डेमोक्रॅट्सना कम्युनिस्ट पक्षातूनही आहे; पण आल्दो मोरोचे प्रयत्न कायम इटलीच्या हितासाठी होत आलेले आहेत.

ज्या दिवशी त्याला पळविण्यात आले, त्या वेळीही तो इटलीचे सरकार बनविण्यातल्या सगळ्यात महत्त्वाच्या वाटाघाटींना चाललेला होता. त्याच्या अपहरणाची बातमी कम्युनिस्ट व ख्रि. डेमोक्रॅट्सच्या अधिवेशनात पोचताच एकच गोंधळ उडाला; पण कम्युनिस्टांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून ख्रि. डेमोक्रॅट्सना सरकारमध्ये पाठिंबा दिला. त्यामुळे परवाच कोसळलेले (१६ जानेवारी) म्युएले आन्द्रेतीचे सरकार स्थिर झाले; पण हे स्थैर्य चिरस्थायी नाही. कम्युनिस्ट अत्यंत ताकदवान अशा ट्रेड युनियन्सवर नखे रोवून उभे आहेत. ख्रिश्चन डेमोक्रॅट्समधल्या पुराणमतवाद्यांना ही युती मंजूर नाही आणि दुर्दैवाने अशांची संख्या कमी नाही. तरीही एकूण या आणीबाणीच्या परिस्थितीत सगळे एकत्र आले आहेत तसेच इटलीतील भयग्रस्त सामान्य माणूसही सरकारच्या बाजूने उभा आहे. आल्दो मोरो ज्याच्यासाठी धडपडत होता, तीच गोष्ट दैवदुर्विलासाने तो पळविला गेल्यानंतर घडत आहे.

गनिमांचे त्याला पळविण्यातले तीन प्रमुख उद्देश दिसतात : (१) आजवर चालत आलेली राजकीय प्रणाली उलथून टाकणे व लोकांना आणखी एकदा घाबरविणे. ( २ ) मोरो जे बेरजेचे राजकारण करीत आहे, त्याला खीळ घालणे किंवा ( ३ ) वर सांगितल्याप्रमाणे तेच बेरजेचे राजकारण गतिमान करणे; पण ही शक्यता फार कमी दिसते.

पोलिसतपासानंतर असे आढळले की, हल्ल्यात वापरला गेलेला दारुगोळा रशियन होता ! यामुळे उगाचच रशिया गुंतला. अर्थात् प्रावदाने ताबडतोब आपला शून्य संबंध असल्याचे जाहीर केलेच. बरेच राजकारणी आधीपासूनच रेडब्रिगेडच्यामागे परकीय शक्ती असल्याचा आरोप करीतच होत्या. त्यात ज्यांनी ही घटना प्रत्यक्ष पाहिली त्या साक्षीदारांच्या म्हणण्यानुसार सर्व आज्ञा हल्लेखोर जर्मनमधून देत होते. पश्चिम जर्मनीत नुकत्याच घडलेल्या हान्स-मार्टिन श्लायर प्रकरणाचीच ही मोठी आवृत्ती होती; परंतु दुर्दैवाने इटालियन पोलिस जर्मन पोलिसांपेक्षा फारच खचलेल्या आणि विस्कळित अवस्थेत आहेत.

एकूण सगळाच प्रकार भयचकित करणारा आहे. मात्र इटालियन सरकारने तुरीनमधील रेनातो कुर्सिओवरील खटला चालूच राहील असे जाहीर केले आहे. ( हा खटलाही सरकारला पुरेसा त्रात देत आहे. ज्युरी म्हणून काम करायला भीतीपोटी १४० जणांनी नकार दिला. ) आणि आल्दो मोरोच्या पत्नीनेही या भूमिकेला पाठिंबा दिलेला आहे. त्यामुळे आता दहशतवादी काय चाल करतील ते पहायचे.

□

## अवती–भवती : पृष्ठ ११ वरून

असलेले करुणानिधी आज तामिळनाडू विधानसभेमध्ये विरोधी पक्षनेते म्हणून बसले आहेत. विधानसभेमध्ये त्यांनी आरोप केला की, रामचंद्रन यांच्या मंत्रिमंडळामधील एकमेव महिलामंत्री पी. टी. सरस्वती यांच्या मातोश्रींनी तामिळनाडू शासनाच्या समाजकल्याण विभागाची गाडी खाजगी कामासाठी वापरली आणि हे खाजगी काम तरी कोणते ? तर रेसकोर्सच्या मैदानावर जाऊन रेस खेळण्याचे ! करुणानिधी नुसता आरोप करून थांबले नाहीत तर केलेला आरोप सिद्ध करण्यासाठी त्यांनी काही छायाचित्रेही सादर केली ! या छायाचित्रांमुळे वातावरण जास्त तापले. तसेच ते नाट्यपूर्णही झाले. कारण बिनतोड पुरावा पुढे आल्याने सरकारला काही तरी खुलासा करून वेळ मारून नेणे अवघड होऊन बसले. आपण कैचीत सापडलो आहोत असे वाटल्याने अर्थमंत्री उसळून उठले आणि त्यांनी झाल्या प्रकाराचे चक्क समर्थन करण्यास प्रारंभ केला. ते म्हणाले, मंत्र्यांची गाडी त्यांच्या आईने वापरू नये असा काही नियम तर नाही ना ? त्यावर त्यांना सांगण्यात आले की, गाडी मंत्र्यांची नव्हती तर समाजकल्याणखात्याची होती. त्यावर ते म्हणाले, असे ना का, पूर्वी नाही का मंत्री आपल्या खात्याच्या गाड्या घेऊन सिनेमाला किंवा मार्केटिंगला जात असत ? सभागृहामध्ये गोंधळ होऊन मंत्रीणबाईंची फटफजिती होण्याची लक्षणे दिसू लागताच मुख्यमंत्री रामचंद्रन म्हणाले, मी सरस्वतीबाईंकडे या प्रकरणी खुलासा मागितला आहे आणि तो खुलासा दिल्यावरच मंत्रीणबाई गृहाच्या कामकाजात भाग घेऊ शकतील.

आता मातोश्री गाडी घेऊन जर खरोखरच आपला रेसचा षौक पूर्ण करण्यास गेल्या होत्या तर मंत्रीणबाई तरी काय खुलासा करणार ? नाराज मंत्रीणबाई तीन दिवसपर्यंत विधानसभेकडे परतल्याच नाहीत ! त्यानंतर त्यांनी खुलासा पाठवला, ‘ आपली सरकारी गाडी नादुरुस्त झाल्यामुळे आपण गाडी मागविली. आपल्या आईने आपल्याला न विचारता आपली गाडी वापरली आणि आई वृद्ध असल्याने त्यांना सरकारी रक्षकाने सहाय्य केले. मी कबूल करते की, मला आवडत नसलेल्या जागी माझ्या आईने सरकारी गाडी व सरकारी रक्षक नेला. झाल्या चुकीबद्दल मला खेद वाटतो.

तात्पर्य : सत्तास्थानी असलेल्या माणसाने केवळ स्वतःच जागरूक राहून चालत नाही, तर आपल्या घरातील मंडळीही जागरूक राहतील असे पहावे लागते.

या तात्पर्यापासून बोध घेऊन सदरहू मंत्रीणबाई सरस्वतीबाई यांनी आपल्या आईची आणि तिला संरक्षण देऊन रेसकोर्ससारख्या ‘ पवित्र ठिकाणी ’ नेणाऱ्या सरकारी रक्षकाची हजेरी घेतली आणि मंत्रीणबाईंच्या फटफजितीवर अखेरचा पडदा पडला. □

कथा

# वावटळ

सुशीला गोखले

प्रिय शोभा,

काल संध्याकाळी तुझा निरोप घेऊन गाडीत बसले आणि आज आत्ताशी कुठे सकाळ उलटते आहे तोवरच मला कंटाळवाणं वाटायला लागलं आहे. अजून किती तरी पल्ला गाठायचा आहे. उद्या सकाळी पठाणकोट आणि पुढे बसचे सहा तास ! सिमेंटच्या जंगलातून पाइन जंगलात शिरायला मधलं वाहतुकीचं जाळं पार करायला हवयं. बाप रे ! केवढा मोठा पल्ला गाठायचाय ! कसा तरी वेळ घालवणं भागच आहे म्हणून रतलामच्या स्टेशनवर सकाळी पेपर विकत घेतला. मुंबई-जम्मू तावी सुपरफास्ट ट्रेन २८ तासांतच जम्मूला पोचणार म्हणे ! तांत्रिक आर्थिक बाबतीत झपाट्याने पुढे चाललोय आपण, पण मी थोडी आधीच निघाले म्हणायची. का होईना पण येताना झटकन् परतेन.

माझ्या शेजारी ते सिंधी कुटुंब बसलं होतं ना ते म्हणे वैष्णोदेवीची उत्सवाला चाललं आहे. मजेत चाललाय त्यांचं हसणं, खेळणं, झोपणं. ती पलीकडची बाई मात्र झोपलेलीच आहे सारखी बहुतेक एकेकटे प्रवासी झोपूनच रहातात गाडीत नाही ? पण मला मात्र वाटतं असं लोळत राहून का वेळ लवकर जाणार आहे ? म्हणून तर गाडीतच तुला पत्र लिहायला घेतलं आहे. नाही तरी पोचल्याचं पत्र लगेच टाक म्हणून तू बजावलं होतंसच. पलीकडे एक लहानशी मुलगी बसलीय सातआठ वर्षांची. तिच्याबरोबर एक माणूस आहे. पोरगी तशी आहे चुणचुणीत, पण केविलवाणी वाटतीय. तो कोण आहे बरोबरचा कोण जाणे ! कशाला नसत्या चौकशा मला ? पण पोरीचा केविलवाणा चेहरा पाहून हे विचार डोकावताहेत. आता थोड्या वेळात येईलच दिल्ली, मनोरमा येईल बहुतेक स्टेशनवर !

ता. २८

काल स्टेशनवर मनोरमा आली होती. आलोकच तिला घेऊन आला होता. मटार पोहे करून आणले होते तिने. नांवाप्रमाणेंच माझं आळसावलेलं मन रमविण्यात तिच्या नकळत ती रमली होती. ते पोहे त्या मुलीला खायाला द्यावे असं वाटत होतं पण ती आणि तो माणूस गेले कुठे ? डब्यात परतलेच नाहीत. दिल्लीलाच उतरायचं होतं की काय त्यांना कुणास ठाऊक ! तसं सगळं ठीक असलं तर बरंच होईल बाई; पण का कोण जाणे ! त्या दोघांच्या चेहऱ्यामोहऱ्यावरून नॉर्मल वाटत नव्हतं. हुरहूर लागून राहिलीय आणि त्यात ह्या शेजारच्या बाईनं माझी क्रॉस एक्झॅमिनेशन सुरू केलीय. 'तुम्हांला मुलं किती ?'

'मुलं नाहीत.'

'अरेरे ! ' (मी त्या मुलीचा विचार करते आहे आणि ही बाई माझ्या नसलेल्या मुलांचा).

'तसं नव्हे हो; मी लग्न केलेलं नाहीय. '

'असं कसं ? बाईमाणसानं एकटं राहूं नाही ' असा फुकटचा सल्ला आणि त्याचबरोबर तिच्या दृष्टीतून माझं स्पेशल स्टेटसही खाली आलं. जुना स्पेशल इंपॅक्ट कायम आहे अजून. रात्र पडायला लागली. आता पथारी पसरते.

ता. २९

पठाणकोट स्टेशनवर उतरले. अखेरीला जाणाऱ्या बसमध्ये जाऊन बसले. नोव्हेंबरची थंडी, सफरचंदाचा आस्वाद घेत घेत सुखावह वाटत होती. सभोताली बघत होते, ती छोकरी अजून मनात रेंगाळतच होती आणि काय आश्चर्य; अग, ती आणि तो माणूस दुसऱ्या बसमध्ये शिरताना पाहिले मी आणि ती बस सुरूही झाली. त्या मुलीचा चेहरा तेवढ्यात मला दिसला होता. बिचारी रडवेली झाली होती आणि तो माणूस—तिच्या बखोट्याला धरून घाईघाईने बसमध्ये तिला ओढून घेतले होते त्याने. आमचीही बस जरा वेळानं सुरू झाली. बाहेरचं अनोखं जग बघायचं सोडून मी तिचाच विचार करीत बसलें. ती दिल्लीला परत डब्यात कशी नाही दिसली मग ? गाडी सुटायच्या वेळी अशीच धांदलीत समोर आलेल्या डब्यात चढून आली का ? दिल्लीच्या 'बाटाघाटी' फिसकटल्या ? मला ध्रस्स झालं. डोकं भणभणलं. आपण तिची चौकशी करायलाच हवी होती. पुन्हा वाटलं आपले निव्वळ कल्पनेचेच खेळ नसतील कशावरून ? आणि आता पश्चात बुद्धि काय कामाची ? Forget-it. मी बाहेर भाताची सोनेरी शेतं, चहाचे मळे, डोंगरावरचा चमकणारा बर्फ पाहू लागले.

वाटत एका जागी बस फेल झाली. दोन तास घाटात बसून रहावं लागलं. इथे म्हणे असंच चालतं. कधी बस बिघडते तर कधी रस्ता बिघडतो. हिमालयाच्या कुशीत जाणं सोपं नाही ! शेवटी संध्याकाळी अरवेलीला पोचले.

संजीवनी घरी माझी वाट पाहून पाहून कंटाळून दारात उभी होती. तिला पाहिल्यावर माझाही शीण कमी झाला. दुपारच्या जेवणासाठी तयार ठेवलेले बटाट्याचे परांठे आम्ही आता रात्रीच्या जेवणात गरम करून खाल्ले. खूप गप्पा केल्या. शेवटी रात्र बरीच झाली म्हणून संजीवनीने बळेच मला झोपायला लावलं.

आडवी झाले; पण भांड्यांची खुडबुड कानांवर आल्यासारखं वाटलं म्हणून उठून बघितलं तर संजीवनी भांडी घाशीत होती !

'का ग, अजून तुला कोणी बाई मिळाली नाही ?'

'मिळाली आहे ग मावशी; पण घरच्या माणसांचा छळ असह्य झाला म्हणजे ती येऊ शकत नाही. तिचा नवरा नुकताच वारलाय अंगावर वीज पडून. तिचं लहानसं घर आहे ते दीर त्याच्या नावावर करून मागतोय. ती कुठे कामाला गेली की तिचा नसता संशय घ्यायचा, असं चाललाय. येईल जरा वातावरण निवळलं म्हणजे. झोप तू आता. झालंच माझं !'

'सोशलवर्करची एम्. ए. तू. इथे या छोट्या गावीही तुला ही एक केसच मिळाल्यासारखं आहे!'

'हो ना!' ती भांडी लावीत असताना म्हणाली.

दुसऱ्या दिवशी मोलकरीण आली. एक पहाडी मध्यमवयीन बाई. आल्याबरोबर संजीवनीने तिला जेवण दिले. मग ती कामाला लागली. तिच्यावर घर सोपवून आम्ही घराबाहेर पडलो. पूर्वीच्या कोण्या राजाचा राजवाडा, पण आता हॉटेलमध्ये रूपांतर झालेला 'हिमालयन व्ह्यू' पहायला गेलो. आता राजवाड्याचं वैभव हॉटेलात पहायचं– जरासं शहारतं अंग या कल्पनेनं, नाही का?

पण दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून आम्हाला लामामंदीर आणि वैजनाथमंदीर पहायचं होतं. त्यामुळे पहिले विचार झटकून रात्री लवकरच झोपलो. सकाळी जाग थोडी उशीराच आली. गडबडीने उठले आणि संजीवनीला म्हटलं, 'अग, मला उठवलं का नाहीस? आपल्याला लवकर निघायचं आहे ना?'

'बेत रद्द करावा लागला आपला मावशी.' ती म्हणाली. आनंदला आज ऑफिसमधे जावं लागलं.

'आज सुट्टीचं?' 'हो, एका केसची चौकशी करायची आहे.'

'वा! मग तुझी छानच मदत आहे आनंदला केस सोडवायला.'

'काय ग भानगड आहे?' मी पृच्छा केली.

एका धोब्याची बायको म्हणे एका शिप्याने पळवून आणली आणि त्या धोब्याने त्याबद्दल तक्रार केली आहे; पण शिंपी म्हणतो की त्याने धोब्याला सहा हजार रुपये देऊन या बाईशी लग्न केले आहे. बाईचं म्हणणं की, ती शिप्याचीच बायको असून तिला एक तीन वर्षांचा मुलगाही आहे. म्हणून ती धोब्यापासून धोका वाटतो म्हणून वरिष्ठांकडे संरक्षण मागते आहे. तिला संरक्षण म्हणून तात्पुरते शिप्यालाही वेगळे रहाण्यास सांगण्यात आले आहे.

धोबी, शिंपी दोघेही आनंदच्या युनिटमधलेच म्हणून शक्यतोवर डिपार्टमेंटमधेच हा प्रश्न सोडवायचा प्रयत्न चाललाय. संजीवनीला चांगलेच खाद्य मिळाल्याने ती पण त्यात गुंतली आहे. मला मात्र त्या गाडीतल्या मुलीची सारखी आठवण होते आहे.

दोन-चार दिवस असेच गेले. दुसरा रविवारही उजाडला. त्या दिवशी मात्र आम्ही बुद्धाचे पागोडा धर्तीचे सुरेख मंदीर पाहिले आणि मग वैजनाथाला गेलो. हे म्हणे खरं तर बारा ज्योतिर्लिंगातलं देऊळ. दारावर सोन्याचा पत्रा– पिंडीवर सोन्याचा मुकुट– पूर्वीचं फारच वैभवशाली देऊळ असावं. सध्या मात्र बिचारं एकाकी पडल्यासारखं वाटत होतं. त्या मोठ्या आवारात मी मजेत फिरत होते आणि एकदम अवाक् झाले. अग शोभा, तीच गाडीतली मुलगी सुंदर पोशाख करून एका परदेशी जोडप्याबरोबर तिथे दिसली!

आता माझ्या इतके दिवस मनात जागृत असलेल्या कुतूहलाला गप्प बसवेना. तिच्याबरोबर गाडीत असलेला माणूसही होता. त्याच्याजवळ जाऊन शेवटी मी विचारलेच.

तो म्हणे तिचा मामा. जातीचा धोबी. त्या मुलीची आई एक दिवस मुलीला टाकून कुठे पळून गेली. कुठून तरी या मामाला बातमी लागली की पोरीची आई या भागात आलीय. म्हणून तो मुलीला बरोबर घेऊन तिच्या शोधाला निघाला. त्याला ती सापडली सुद्धा! पण आईने मुलीला संभाळायचे साफ नाकारले! कर्मधर्मसंयोगाने या स्वीडिश जोडप्याची गाठ पडून त्यांनी तिला दत्तक घेतले. या जोडप्याला भारताची–हिमालयाची इतकी ओढ की त्यांनी म्हणे हिमाचल प्रदेशात येऊन लग्न केलेले आहे– परतीच्या वाटेवर आता या भारतीय मुलीला घेऊन चाललेत. त्या मुलीला आई मिळाली आहे आणि तिची जन्मदात्री आई धोब्याची बायको की शिप्याची हे अजून ठरायचंय!

गेले होते हिमालयातलं सौंदर्य टिपायला आणि घेऊन आले आहे बरोबर– शांत मनात माणसांनी उठविलेली ही वावटळ.

तुझी
मंदा

□

# टॉलस्टॉय पुस्तक योजना : ग्राहकांसाठी सूचना

टॉलस्टॉय पुस्तकयोजनेतील एकूण पाच पुस्तकांपैकी चौथे, रवींद्र पिंगे–लिखित 'पश्चिमेचे पुत्र' हे पुस्तक तयार झाले असून योजनेतील ग्राहकांनी ते कार्यालयातून घेऊन जाण्याची व्यवस्था करावी

ज्यांना या योजनेतील पहिली तीन पुस्तके ( १ : आर्. डॉक्युमेंट, ले. अशोक जैन, २ : महाडचा मुक्तिसंग्राम, ले. प्रा. बिवलकर + कांबळे, ३ : टच्, ले. अशोक प्रभाकर डांगे ) पोस्टाने रवाना झालेली असतील त्यांना हे चौथे पुस्तकही पोस्ट + पाठवणीखर्चाची व्ही. पी. करून पूर्वीप्रमाणेच रवाना होईल. फक्त पोस्टखर्च आणखीनच वाढलेला असल्यामुळे ज्या ग्राहकांना पुस्तक कार्यालयातून नेण्याची अन्य काही व्यवस्था करावयाची असेल किंवा पाचवे व चौथे पुस्तक एकदम मागवून पोस्टखर्चात थोडी बचत करावयाची असेल तर तसे त्यांनी लगेच कळवावे.

पाचवे पुस्तक सुमती देवस्थळेकृत 'टॉलस्टॉय एक माणूस' हे आहे. हे पुस्तक खूप मोठे असल्याने त्याची छपाई इत्यादि पूर्ण व्हायला २–३ महिन्यांचा तरी कालावधी लागणार आहे, याची मात्र ग्राहकांनी कृपया नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

# महाराष्ट्राचे सर्वांगीण दर्शन घडविण्याचा एक भरीव प्रयत्न

नरहर कुरुंदकर

कै. विष्णु सखाराम खांडेकर तथा भाऊसाहेब खांडेकर हे मराठी वाङ्‌मयातले एक अतिशय प्रभावी व्यक्तिमत्त्व होऊन गेले. सामान्यपणे व्यक्तिशः खांडेकर यांच्याविषयी अतिशय आदर, ममत्व आणि जिव्हाळा सर्वांना वाटत आला. त्यांच्या वाङ्‌मयाला लोकप्रियता आणि लोकमान्यता भरपूर लाभली. चिकित्सक समीक्षकांची मात्र त्यांच्याबाबत नेहमीच द्विधा मनोवृत्ती राहिली. एकीकडे खांडेकरांचे कादंबरी वाङ्‌मय अतिशय कृत्रिम, नकली आणि उथळ आहे याविषयी सातत्याने मराठी समीक्षक त्यांच्याविरुद्ध लिहीत आले आणि दुसरीकडे निरनिराळे लेखक त्यांना ज्येष्ठत्वाचा मान देत आले. खांडेकर साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष झाले. अनेक ठिकाणी त्यांना अनेक प्रकारचे सन्मान देण्यात आले. साहित्य अॅकॅडमीचे फेलो व पद्मभूषण हे सन्मान त्यांना मिळाले. आयुष्याच्या अखेरीला भारतीय ज्ञानपीठाचे पारितोषिकही त्यांना मिळाले. मराठीतल्या लेखकांनी कैकदा त्यांची प्रस्तावना हा आशीर्वाद मानला. एका बाजूने सन्माननीय, आदरणीय, ज्येष्ठ आणि दुसऱ्या बाजूने कृत्रिम, नकली लेखक असा त्यांचा विचार मराठीत होता; पण हे सगळे गृहीत धरले तरी भाऊसाहेब हे एक प्रभावी वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्व होते हें नाकारण्याचे कारण दिसत नाही. भाऊसाहेबांना निरोगी शरीरप्रकृतीचा लाभ कधी झालाच नाही. त्यांची शरीरप्रकृती नेहमीच तोळामासा अशी नाजूक राहिली. त्यांच्यासारख्या प्रकृतीच्या माणसाने आपली पंचाहत्तरी साजरी करणे हेच नवल! पण ती त्यांनी केली. भाऊसाहेबांच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने इंग्रजीत एक अभिनंदन-ग्रंथ काढायचे ठरले. प्राचार्य अ. के. भागवत यांनी हा अभिनंदन–ग्रंथ संपादित केलेला आहे. जवळजवळ पाउणेसहाशे पानांचा हा अभिनंदन–ग्रंथ महाराष्ट्राची विविध अंगांनी ओळख करून देण्यासाठी सिद्ध झालेला आहे.

महाराष्ट्राची सर्वांगीण ओळख महाराष्ट्रेतर वाचकांना करून देण्याबाबत महाराष्ट्रीय माणूस अतिशय कमी पडतो. त्या दृष्टीने भाऊसाहेबांच्या अभिनंदनाच्या निमित्ताने हा एक भरघोस असा प्रयत्न झाला आहे, ही घटना स्वागतार्ह मानली पाहिजे; पण अशा अभिनंदन-ग्रंथाची त्यांच्या हेतूमुळेच काहीशी अडचण झालेली असते. ही अडचण अशा प्रकारच्या कोणत्याही उपक्रमाला टाळता येत नाही. पहिली गोष्ट अशी असते की, पृष्ठसंख्या कितीही जरी घेतली तरी ती अपुरी पडते. सहाशे पानांचा व्याप म्हणजे काही थोडा व्याप नाही; पण एवढा मोठा ग्रंथ संकल्पिला तरी त्या ग्रंथात मराठी साहित्य व वाङ्‌मयाचा इतिहास आपण किती देणार? प्राचीन मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासाला या ग्रंथात जवळजवळ अठ्ठ्याऐंशी पाने देण्यात आली आहेत; पण इतकेही करून जागा अपुरीच पडते. जागा अपुरी पडली म्हणजे विवेचन धावते व स्थूल व्हायला लागते. सहाशे पानांच्या ऐवजी हजार पानांची व्याप्ती जरी झाली तरी त्यामुळे म्हणण्याजोगा फरक पडत नसतो. जीवनाच्या अनेक अंगांची ओळख करून द्यायची राहून जाते. ज्यांची आपण ओळख करून देतो तीही अतिशय त्रोटक आणि संक्षिप्त करून द्यावी लागते. दुसरी अडचण अशी असते की, महाराष्ट्राबाहेरच्या मंडळींना महाराष्ट्राची ओळख करून देतो आहोत हे भान लेखकांच्या मनात सारखे जिवंत असते व त्यामुळे ते फारसा मोकळेपणाने लिहीत नाहीत. सर्वच लेखकांची क्षमता एक असते, असेही नव्हे. त्यामुळे काही लेख अनेक बारकाव्यांनी भरलेले, तर काही लेख अतिशय वरवरचे संकलन करणारे असे होतात. कुणालाही जरी झाले तरी या अडचणीतून बाहेर पडता येतच नाही. या सर्व अडचणी व मर्यादा लक्षात घेऊन विचार केला तर भागवतांनी महाराष्ट्राच्या व्यापक परिचयाच्या दृष्टीने एक खूपच यशस्वी उपक्रम या ग्रंथाने सिद्ध केला आहे असे खात्रीने म्हणता येईल.

अगदी पहिला लेख प्राचार्य भागवतांचा आहे. भाऊसाहेब खांडेकरांची आणि त्यांच्या वाङ्‌मयीन कर्तृत्वाची ओळख करून देण्याची जबाबदारी भागवतांना स्वीकारावी लागली आहे. ही जबाबदारी म्हणजे सोपी गोष्ट नाही. जी व्यक्ती आपण अमृतोत्सव साजरा करण्याइतकी मोठी व महत्त्वाची मानतो तिचे मोठेपण उलगडून कसे दाखवायचे? खांडेकरांचे वाङ्‌मय हळवे, स्वप्नाळू आणि कृत्रिम

**[ Maharashtra – A Profile, Vishnu Sakharam Khandekar Felicitatiou Volume, Edited by Achyut Keshav Bhagwat, Sole Distributors : International Book Service, Pune. Price Rs. 50/–. pp. 36+594. ]**

आहे म्हणून आम्ही या महान लेखकाचा गौरव करतो, असे तर म्हणता येणे शक्य नाही. उलट खांडेकरांचे वाङ्मय दर्जेदार, कलात्मक वाङ्मय असून ते श्रेष्ठ कलावंत आहेत, असे म्हणण्याची भागवतांची तयारी नाही. अशा अवस्थेत खांडेकरांच्या गुणवत्तेविषयी स्वतःला कुठे बांधून घ्यायचे नाही आणि अमराठी वाचकांना त्यांच्याविषयी भरपूर आदर वाटेल, ही सोयसुद्धा पहायची, अशी तारेवरची कसरत करणे भागवतांना भागच होते. दरिद्री जनतेविषयी कणव असणे हा निराळा भाग आहे आणि दारिद्र्याचेच कौतुक व *गुणगान करणे* हा निराळा भाग आहे. भागवतांनी अशी नोंद केली आहे की गांधीजींच्या प्रमाणे खांडेकरही दारिद्र्याचे उदात्तीकरण करतात. गांधी दारिद्र्याचे उदात्तीकरण करतात काय? खांडेकर दारिद्र्याचे उदात्तीकरण करतात काय? हा मुद्दा आपण बाजूला ठेवू; पण दारिद्र्याचे उदात्तीकरण हा काही मोठा वाङ्मयीन गुण मानता येणार नाही.

## औपचारिकता...

*भागवत प्रश्न उपस्थित करतात की, खांडेकरांच्या अमाप* लोकप्रियतेचे रहस्य काय? तर उत्तर देताना ते सांगतात, नैतिक, वैराग्यशील असा स्वप्नाळूपणा हे त्यांच्या लोकप्रियतेचे रहस्य आहे. शिव आणि सौंदर्य यांचा समन्वय करण्यामुळे वाचकांना जे सात्त्विक समाधान लाभते त्यात त्यांच्या लोकप्रियतेचे रहस्य आहे. हे प्रश्न उपस्थित करणे आणि त्यांची उत्तरे देणे ही बाब पूर्णपणे औपचारिक आहे. उर्दू साहित्यसमीक्षेत कधीकधी फार मोठ्या गमती दिसतात. समीक्षकाला लेखकाविषयी चांगले बोलायचे असते आणि नेमके कोणत्या मुद्द्यावर त्याच्या वाङ्मयाची स्तुती करावी हे मात्र कळत नाही. मग समीक्षक कधीकधी अत्यंत गंभीरपणे असे नोंदवितो की, सदर लेखक मोठ्या कुलीन घराण्यातील होता. माझा आक्षेप भागवतांच्या लिखाणावर नाही. माझा आक्षेप त्यातील औपचारिकतेवर आहे. वाङ्मय चांगले म्हणणे तुम्हाला शक्य नाही आणि वाईट म्हणण्याची सोय नाही. अशा अडचणीत तुम्ही सापडला म्हणजे जसे लिहावे लागते तसे भागवतांच्या लिखाणाचे स्वरूप आहे. अशा प्रकारच्या अभिनंदन- ग्रंथात शिष्टाचारपालन म्हणून असे काही लिखाण करावेच लागत असते. त्याला सर्वांचाच नाइलाज आहे.

अशाच प्रकारचा एक लेख या ग्रंथात मेजर जनरल परांजपे यांचा आहे. त्यांनी मराठ्यांच्या आणि महाराष्ट्राच्या लष्करी परंपरेविषयी लेख लिहिलेला आहे. *हिंदुस्थानात सर्वच प्रांतांत कुणी ना कुणी* तरी राजे होऊन गेले. जे राजे होते त्यांच्याजवळ लष्कर असेच. त्यांना लढावेही लागत होते. या युद्धात कधी जय तर कधी पराजय होतच असत. यापेक्षा महाराष्ट्राचा लांबरुंद इतिहास निराळा नाही. इ. स. १६४५ म्हणजे शिवाजीमहाराजांचा उदय ते इ. स. १७४५ म्हणजे स्थूलमानाने पहिल्या बाजीरावांचा मृत्यू. हा एक शतकाचा उज्ज्वल कालखंड जर सोडला तर महाराष्ट्राच्या उण्यापुऱ्या दीड हजार वर्षांच्या इतिहासात आपल्या लष्करी तेजाने सर्व भारताला प्रभावित करण्याचा वारसा किती चमकदार आहे, याबाबत फार सांगण्याची गरज नाही. राजस्थान आणि पंजाब यांना महाराष्ट्राने लष्करी परंपरेबाबत फार शिकवावे अशी परिस्थिती नाही; पण महाराष्ट्रीय मनाला *आपल्या देदीप्यमान एका शतकाने* असे भारून टाकलेले आहे की, आपण लष्करी विद्येत कुणी तरी फारच मोठे व अलौकिक आहोत अशी महाराष्ट्रीयांची समजूत झाली आहे. इंग्रजी राजवटीत त्यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रीय सेना लढली हाही आपण आपल्या लष्करी गौरवाचा भाग मानतो आणि त्या दृष्टीने सांगण्याजोगे फारसे नसले तरी सुद्धा काही विवेचन आपण करतो. महाराष्ट्राच्या लष्करी परंपरा मुद्दाम सांगाव्यात असा काळ शंभर वर्षांचा आहे, ही गोष्ट आपण स्वतःशी स्वतःचा विचार करताना गृहीत धरून चालले पाहिजे.

प्राचीन महाराष्ट्रीय इतिहासाचा आलेख देताना अशी कोणतीही दडपणे नसतात. डॉ. देवांनी आणि प्रा. सदाशिवराव आठवल्यांनी थोडक्यात पण अतिशय रेखीवपणे महाराष्ट्राचा इतिहास सांगितलेला आहे. उपलब्ध असणारी माहिती रेखीवपणे लोकांच्या समोर ठेवायची एवढेच काम या लेखकांना करायचे होते. ते करताना सुद्धा जागोजाग अतिशय मार्मिकपणे या लेखकांनी आपली मते नोंदविलेली आहेत. ही मते सर्वांनाच पटतील, आवडतील असे नाही; पण ती त्या लेखकांची मते आहेत. ती त्यांनी अतिशय स्पष्टपणे मांडली आहेत. विशेषतः देव यांनी उत्खननांच्या आधारे इतिहासपूर्वकालीन महाराष्ट्राचा जो थोडक्यात आढावा घेतला आहे तो पहाण्याजोगा आहे. वर्तमान राजकारणाचा कोणताही ताण मनावर येऊ न देता सदाशिवराव आठवले यांनी महाराष्ट्रातील मुस्लीम राजवटीविषयीची मते थोडक्यात पण स्पष्टपणे दिलेली आहेत. महाराष्ट्राचा सर्व प्राचीन इतिहास मराठ्यांच्या राजवटीविषयी पुरेसे ममत्व आणि अभिमान ठेवून पण कोणताही अतिरेक न करता या लेखकांनी इतिहास आपल्यासमोर ठेवलेला आहे.

## मिश्किल आणि चटकदार

त्या मानाने गंगाधर गाडगिळांचा हा लेख अधिक मिश्किल व चटकदार आहे. महाराष्ट्रीयांची *स्वभाववैशिष्ट्ये याविषयी* ते लिहीत आहेत. मराठीत फारसे मोठे नादमाधुर्य नाही असे जाता जाता त्यांनी मत देऊन टाकले आहे. विवेचाच्या ओघात गंगाधर गाडगीळ म्हणतात, देशातील चार राजकीय नेते कर्तृत्वाच्या दृष्टीने भव्य असतील, पण शिवाजीमहाराज आणि लोकमान्य टिळक यांच्यात जो कठोर वास्तववाद होता तो इतर नेत्यांमध्ये दिसत नाही. वास्तववाद हे मराठी भूमीचे वैशिष्ट्यच आहे. शिवाजी आणि टिळक हे दोन नेते वास्तववादी होते हे खरेच आहे; पण देशातील इतर थोर नेते स्वप्नाळू होते, *वास्तववादी नव्हते हे तितकेसे खरे नाही आणि महाराष्ट्राची* भूमी जितकी वास्तवादासाठी प्रसिद्ध आहे तितकीच वास्तवाचे भान सुटलेल्या स्वप्नाळू आदर्शवादासाठीही प्रसिद्ध आहे. स्वप्नांच्या मागे लागून आयुष्य ओवाळून फेकणे ही प्रथा महाराष्ट्रात कमी नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर आणि आचार्य विनोबा भावे हे अगदी भिन्न स्वप्नांनी भारावलेले दोन्ही थोर नेते महाराष्ट्रीय आहेत. वास्तववाद ही कुठल्या एका भूमीची मालकी नसते. वास्तववाद आणि व्यवहारवाद, वास्तववाद आणि तडजोडी यांच्यातील पडदे फार झिरझिरीत असतात. तरी सुद्धा *स्थूलमानाने महाराष्ट्रातील नेतृत्व वास्तववादी* असते, हे गाडगिळांचे म्हणणे खरेच आहे.

सामान्यपणे महाराष्ट्राची परंपरा वैराग्यवादी आहे. रसिकता आणि सौंदर्यलोलुपवृत्ती महाराष्ट्रात कमी आहे; पण महाराष्ट्रात

विनोदबुद्धी भरपूर आहे आणि त्याला आत्मपरीक्षणाची कठोर सवयही आहे. गाडगिळांनी जाता जाता एका मजेदार सत्याकडे आपले लक्ष वेधलेले आहे. मला वाटते या प्रश्नाचा अधिक तपशिलाने व चौरस विचार व्हायला पाहिजे. महाराष्ट्राच्या समूहजीवनात विनोदाचा नेहमीच प्रभावी वापर होत असला पाहिजे. उपहास आणि उपरोध रामदासांच्या वाङ्मयात भरपूर आहे. एकनाथ आणि तुकारामांच्या वाङ्मयात उपहास आणि उपरोध तर आहेच, पण त्याशिवाय खोडकरपणा, मिस्किलपणा, परिहास यांचाही वापर विपुल प्रमाणात आहे. लोकनाटयात विनोदाचे प्रमाण भरपूर राहिले. तुरळक प्रमाणात पण उपहास, उपरोध करणाऱ्या लावण्याही आहेत. परमार्थाच्या प्रेरणेने भारावलेले प्राचीन मराठी वाङ्मय विनोदाला फारसा वाव देत नाही; पण महाराष्ट्रातील लोकजीवनात विनोदाचे विविध प्रकार नेहमीच प्रभावी राहत आले असले पाहिजे. फारशी विलासप्रियता नाही, फारसा भाबडेपणा व भावुकता नाही, पण फटकळपणा व चिकित्सा भरपूर आहे असे महाराष्ट्राचे समूहमन आहे. या समूहमनात विनोदाच्या व्यवहाराला नेहमीच एक प्रभावी स्थान राहात आले असले पाहिजे ही गोष्ट उघड आहे. शिवाजीसारखा माणूस सुद्धा मध्येच आपल्या विरोधी सरदारांचे वर्णन 'पेंडीचे गुरु' म्हणून करतो. भाऊसाहेबांच्या बखरीचे लेखक धास्तावलेल्या फौजेचे वर्णन करताना 'रांडेने हुसकले तर बारा कोस पळणार' असे उपरोधाने लिहून जातो. चक्रधरस्वामी सुद्धा थट्टेखोरपणा करतातच. या सगळ्या घटनांचा अधिक चौकसपणे विचार व्हायला पाहिजे. समर्थ रामदासस्वामी 'टवाळा आवडे विनोद' असे म्हणून गेले आणि प्राचीन मराठी वाङ्मयात विनोद फारसा दिसत नाही इतक्यावरच आपण जाऊ नये. आपण समूहजीवनातील विनोदाच्या स्थानांचा अधिक बारकाईने विचार करायला हवा, असे मला वाटते. गाडगिळांनी जाता जाता अभ्यासाला एक चांगला विषय सुचवून दिला आहे.

### माहितीपर....

तीन प्रकरणांमध्ये वि. रा. करंदीकर, गो. म. कुलकर्णी आणि बेडेकर व केळकर यांनी मराठी वाङमयाचा परिचय करून दिला आहे. हा परिचय करून देताना महाराष्ट्र साहित्यपरिषदेची वाङ्मयेतिहासाची योजना सर्वांच्या समोर आहे. या योजनेतील दोन दोन कालखंड एकेका लेखकाने हाताळले आहेत. उदाहरणार्थ परिषदेची योजना इ. स. १८०० ते १८७४ असा एक कालखंड मानते आणि त्यापूर्वीचा १६५० ते १८०० असाही एक कालखंड मानते. या लेखकांनी १६५० ते १८७० असा एक कालखंड गृहीत धरला म्हणजे परिषद-इतिहासाचे दोन कालखंड या आढाव्याच्या एका कालखंडात समाविष्ट झाले. अशा प्रकारे शक्यतो कालविभाजन स्वीकारून मराठी वाङ्मयाची तिघांनी ओळख करून दिली आहे. के. नारायण काळे यांनी मराठी नाटकांच्याविषयी आणि अरुण खोपकरांनी मराठी सिनेमांच्याविषयी माहिती दिलेली आहे. हे सगळे लेख स्थूलमानाने सर्वमान्य माहिती शक्य तितक्या थोडक्यात एकत्र करणारे आणि कोणत्याही ठिकाणी फारशा विवादास्पद प्रश्नांच्याकडे शक्यतो न वळणारे असे आहेत. एका लेखात महाराष्ट्रियनांनी केलेला प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाच्या अभ्यासाचा आढावा घेतलेला आहे. महाराष्ट्रीय मंडळींनी इतिहासाच्या अभ्यासात उल्लेखनीय भर घातलेली आहे हे कुणीच अमान्य करणार नाही; पण मला स्वतःला असे वाटते की, महाराष्ट्रीय अभ्यासकाच्या इतिहाससंशोधनात दोन जागा फार कच्च्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे महाराष्ट्रीय इतिहासाच्या अभ्यासकांनी युरोपियनांनी उपलब्ध करून दिलेला पुरावा आणि फारसी साधनांमधून उपलब्ध असणारा पुरावा यांचा मराठी साधनांमध्ये असणाऱ्या पुराव्याशी समन्वय घालण्याचा प्रयत्न फार थोडा केला आहे. असा समन्वय घातला न गेला म्हणजे इतिहासाच्या विवेचनात फार मोठ्या उणीवा राहतात. एकूण मराठ्यांचे इतिहास-अभ्यासक फारसीच्या अभ्यासात कच्चेच आहेत. जी फारसी साधने इंग्रजी भाषांतरात उपलब्ध असतील त्यांच्यावर या अभ्यासकांची अर्धवट भिस्त असते. ग. ह. खरे आणि सेतु माधवराव पगडी यांचे कार्य या दृष्टीने महत्त्वाचे आहे. विशेषतः सेतुमाधवरावांचा सर्व साधने म्हणजे इंग्लिश फॅक्टरी रेकॉर्डस, फारसी साधने मराठी साधने एकत्रित करून पहाण्याचा उपक्रम याचे फारसे महत्त्व आपल्या मंडळींना अजून जाणवत नाही. इ. स. १७०७ ते इ. स. १८०० हा जो पेशवाईचा कालखंड, या कालखंडाविषयी विवेचनात्मक प्रबंधरचना मराठीत आहे तरी किती याची मोजदाद व्हायला पाहिजे. अजून पहिल्या बाजीरावाचे सुद्धा विवेचनात्मक प्रबंध म्हणून म्हणता येईल असे चरित्र नाही.

दुसरी गोष्ट अशी की, आमच्या अभ्यासकांनी बौद्ध व जैनधर्म यांच्या चिकित्सक अभ्यासाकडे आणि त्या धर्मांच्या वाङमयाच्या चिकित्सक अभ्यासाकडे म्हणावे तितके लक्ष दिलेले नाही. अपवाद म्हणून जी नावे आपण दाखवू ती अपवाद म्हणूनच पाहिली पाहिजेत. हिंदू धर्माच्या बाबतीत सुद्धा आपण फार मोठी चिकित्सकता दाखवितो असे नाही. म. म. काण्यांचा धर्मशास्त्राचा इतिहास जरी घेतला तरी तो उपलब्ध माहितीचे जास्तीत जास्त तपशिलाने संकलन करण्यावर जसा भर देतो तसा विवेचन आणि मीमांसा करण्यावर भर देत नाही. स्वतःला बुद्धिप्रधान म्हणविणाऱ्या मंडळींनी चिकित्सेच्या बाबतीत फारशी आस्था दाखवू नये ही गोष्ट आश्चर्यकारक आहे.

### चमत्कारिक पण सत्य वस्तुस्थिती

क्षिती मोहन मुखर्जी यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक रचनेविषयी लिहिलेला लेख अगदी जुजबी असा आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक रचनेचा महाराष्ट्रातील सर्व सामाजिक आणि राजकीय आंदोलनांशी काही अनुबंध ते दाखवितील अशी आशा होती; पण त्या बाबतीत त्यांनी फारशी काही माहिती दिलेली नाही. खरे म्हणजे महाराष्ट्रातील सार्वजनिक सभेसारखे कार्य किंवा सत्यशोधक मंडळाचे कार्य, बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य या सर्वांचाच समाजरचना व अर्थरचना यांच्याशी घनिष्ठ संबंध आहे. यापेक्षा रिचर्ड टकर यांचा लेख जास्त माहितीपूर्ण आहे. अजूनही साहेबमंडळी आमच्या जीवनाचा अभ्यास आमच्यापेक्षा खूपच व्यवस्थितपणे करू शकतात असे दिसते. अठराव्या शतकाच्या मध्यावरचा मुंबई विभाग अशासारखा विषय घेऊन इंग्रज, मराठे, मोगल, पोर्तुगीज यांच्या गुंतागुंतीच्या संबंधाचे एखादे चित्र उभे करणे असो, की एखादा छोटासा बावीस-पंचवीस वर्षांचा काळ घेऊन त्यात

व्यापार आणि राजकारण यांचा परस्परांशी संबंध कोणता हे सांगणें असो, एका शिस्तीत ही साहेबमंडळी अभ्यास करीत असतात. १८१८ ला पेशवाई बुडाली. या पेशवाईच्या समाप्तीच्या अगदी जवळ असणाऱ्या तेरा वर्षांच्या कालखंडात म्हणजे इ. स. १८१७ ते १८३० या एलफिन्स्टनच्या कालखंडात समाजरचनेत एका विशिष्ट धोरणामुळे बदल कसकसा झाला, याचाही अभ्यास एकाने केलेला आहे, आमच्या आधुनिक राजकारणातील वेगवेगळ्या नेत्यांचे अभ्यास, राजकीय चळवळींचे अभ्यास, मजुरांच्या चळवळींचे अभ्यास असे नानाविध पद्धतींचे अभ्यास पाश्चिमात्यांनी आपल्याविषयी केलेले आहेत. अजूनही आपले आधुनिक जीवन सुव्यवस्थितपणे समजावून सांगण्याचे काम पाश्चिमात्यांनाच चांगले जमावे ही गोष्ट चमत्कारिक असली तरी खरी आहे. आपण एकदा स्वतःला असा प्रश्न विचारायला पाहिजे की, महाराष्ट्रातील ब्राह्मणेतरांच्या चळवळीचा कितीसा तपशीलवार अभ्यास एखाद्या महाराष्ट्रीय माणसाने केलेला आहे ?

मालतीबाई बेडेकरांनी एका प्रकरणात स्त्रियांच्या प्रगतीचा आलेख घेतलेला आहे. पन्नालाल सुराणांनी महाराष्ट्रातील डाव्या चळवळींचा एक आढावा घेतलेला आहे. अशा प्रकारे महाराष्ट्राचे इतिहास व साहित्य, राजकारण व अर्थकारण असे सर्वांगीण दर्शन घडविण्याचा या ग्रंथात मोठा भरीव प्रयत्न झालेला आहे. अशा प्रयत्नात समाजजीवनाची अनेक अंगे निसटून जातात. तशी ती निसटलेली आहेत; पण त्याला इलाज नसतो. समाजजीवनाच्या अजून कोणकोणत्या अंगांवर लेख हवे होते ? असा प्रश्न उपस्थित करून अजून दोन-चार विषयांची यादी देणे मुळीच कठीण नाही; पण त्यामुळे जे विविधांगी दर्शन या गौरवग्रंथात एकत्र आले आहे त्यांचे मोल कमी होत नाही. अजून काय काय हवे होते हे सांगणे सोपे आहे; पण त्यामुळे जे एकत्र झाले आहे त्याचे मोल कमी होत नाही आणि संपादकाच्या साक्षेपास व परिश्रमास धन्यवाद दिल्याशिवाय रहावत नाही. आता शेवटी एका लेखाविषयी काही प्रतिक्रिया थोडक्यात नोंदविणे भाग आहे. तो लेख म्हणजे पन्नालाल सुराणा यांचा डाव्या चळवळींची माहिती देणारा लेख होय.

### डाव्या चळवळीचा आढावा

महाराष्ट्रातील काय अगर कोणत्याही प्रांतातील काय डाव्या चळवळींचा आढावा घेणे हे तसे थोडेसे कष्टाचेच काम आहे. जर आपण डाव्या चळवळी म्हणून समाजवादी ध्येयाला वचनबद्ध असलेल्या गटांचा विचार करू लागलो आणि समाजवादी पक्ष व समाजवाद्यांचे विविध गट, कम्युनिस्ट पक्ष आणि त्याचे विविध गट यांच्यापुरता विचार करू लागलो तर एक अपुरेपणा सारखा या विवेचनात जाणवतो तो म्हणजे दलितांच्या चळवळी डाव्या चळवळींपासून वेगळ्या ठेवाव्या लागतात. सुराणांना हे जाणवले म्हणून त्यांनी डाव्या चळवळींचा विचार करताना सामाजिक क्रांतीला वाहिलेल्या महात्मा फुल्यांचा चळवळीपासून विचार केलेला आहे. समाजपरिवर्तनाच्या आंदोलनाचाही विचार आपण डाव्या चळवळीत घेऊ लागलो म्हणजे नवनव्या अडचणी निर्माण होतात. उजव्या आर्थिक विचारसरणीचे नानाविध धागेदोरे या सगळ्या विवेचनात डाव्या चळवळीचा भाग म्हणून येऊन जातात.

परंपरागत समाजरचना आमूलाग्र बदलून तिची नव्या पायावर फेररचना करणे हे महत्त्वाचेच काम आहे आणि ते सुटे करता येणार नाही. विषमतेवर आधारलेली समाजरचना आर्थिक क्षेत्रात जतन करून सामाजिक क्षेत्रात मात्र समता आणता येणार नाही. डाव्यांच्या सर्व चळवळींची महत्त्वाची उणीव याच्या उलट दिशेने सुरू होते. परंपरागत समाजरचनेमधून चालत आलेले ममत्वबंध उद्‌ध्वस्त करण्याचा सातत्याने आग्रही प्रयत्न केल्याशिवाय समाजवादाची चळवळ ही फारशी पुढे रेटली जाऊ शकत नाही, या जाणिवेने आमची डावी चळवळ नेहमीच दुबळी आणि कच्ची राहिलेली आहे. समाजपरिवर्तनाच्या चळवळी भाषेत समाजपरिवर्तनाच्या राहतात आणि पाहता पाहता परंपरागत समाजरचनेशी मागच्या दाराने एकरूप होऊन जातात. विषम समाजरचनेचे सर्व दुर्ग उध्वस्त करणारे आंदोलन झपाट्याने ब्राह्मणेतरांचे आंदोलन होते व काही वर्षांत हे आंदोलन ब्राह्मणांच्या विरुद्ध मराठ्यांचा उठाव असे रूप घेते. मराठा जमीनदार व बागाइतदार यांच्या नेतृत्वाखाली मराठा शेतमजूर मोठ्या उत्साहाने गोळा होऊ लागतो. म्हणजे मराठा जातीची अस्मिता आणि तिच्याबरोबर असणारा परंपरावाद एकीकडे व समतेची भाषा दुसरीकडे यांचा पाहता पाहता संगम होऊन जातो. दलितांच्या चळवळीची शोकांतिका हीच आहे. सर्व दलितजाती तर ती एकत्र आणू शकलीच नाही; पण असलेली रिपब्लिकन समाजाची संघटना अनेक गटांत विभाजित होण्यात महारसमाजातील पोटजातींचा हातभार किती आहे याचा शोध घेतला तर तिथेही परंपरावाद आणि समता यांची विचित्र सांगड बसलेली आढळते. परंपरावादी समाजरचनेला छेद देऊन ग्रामीण व शहरी दरिद्र्यांना एकत्र आणण्यात डाव्या चळवळीला अपयश आले. याची काही मीमांसा पन्नालाल सुराणा करतील अशी अपेक्षा होती; पण त्यांनी ती टाळलेली आहे.

लोकशाही मार्गाने समाजपरिवर्तन करू इच्छिणाऱ्या समाजवाद्यांना बहुसंख्य मतदार खेड्यात राहतो, तिथे आपले बळ अतिशय कमी आहे, या अडचणीला उत्तर शोधण्याची गरज भासत नाही. जमीनदार आणि बागाइतदार यांनी राजकर्ते म्हणून मिरवावे आणि त्यांची राजवट पुरोगामी आहे अशी घोषणा करून मार्क्सवाद्यांच्या एका गटाने ती राजवट सावरून धरण्यासाठी झटावे असे विसंवाद तर आपल्या डाव्या चळवळीत दिसतच आले; पण आता जनता पक्षाच्या रूपाने पुन्हा सामाजिक प्रश्नांवर बोटचेपी भूमिका घेऊन आपण समाजवाद त्वरेने आणू शकू अशा भ्रमात वावरणारे समाजवादी दिसू लागलेले आहेत. आमची डावी चळवळ दलितांच्यामध्ये दुबळी, शेतमजुरात दुबळी, ग्रामीण भागात दुबळी अशी तर असतेच; पण वैचारिक भूमिकेतही ती सारखी फाटाफुटी व तडजोड यांनी दुबळी होताना दिसते, याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे असे मला वाटते. परप्रांतीयांच्या समोर आपल्याच दुबळेपणाची तपशिलाने चिकित्सा करायची कशाला, या जाणिवेतून बहुधा सुराणांनी हा अप्रिय विषय चर्चायचे टाळलेले दिसते.

□

# आमचे ग्रंथालय

## Coma

( A Novel of Medical Malpractice ) By Robin Cook, ( Pages 306, Macmillan Co. of India Ltd, for Pan Books Rs. 12.50 )

---

वेश्याव्यवसायला "ध ओल्डेस्ट प्रोफेशन" म्हणतात. तसेच डॉक्टरांचा व्यवसाय म्हणजे "नोबलेस्ट प्रोफेशन" म्हणायला हरकत नाही; पण या जमान्यात "नोबलेस्ट प्रोफेशन" ला तडे गेले आहेत, कीड लागली आहे. वेश्यासुद्धा कदाचित नीतिमूल्ये पाळीत असतील, पण डॉक्टरी व्यवसायाला जे बाजरी स्वरूप आले आहे, त्यात जो खादाडपणा शिरला आहे, जो मगरुरी भिनली आहे त्याला तोड नाही! पेशंटला काय झाले आहे ते समजावून न सांगणे, खोट्या शस्त्रक्रिया करणे पेशंटला काय कळतंय अशी भूमिका घेणे, पेशंटला "इनव्हेस्टिगेशन"च्या खड्ड्यात ढकलून देणे वगैरे अनेक प्रकार येथे घडत असतात.

प्रस्तुत पुस्तकात तर चक्क पेशंटला मुद्दाम नेहमीसाठी बेशुद्ध करून किडणी, कॉर्निआ वगैरे त्याच्या शरीरातून काढून ते भरमसाठ किमतीत विकण्यात येतात असे लिहिले आहे. हे पुस्तक एका डोळ्यांच्या डॉक्टरांनी लिहिले आहे. त्यामुळे ते अत्यंत वाचनीय झाले आहे. ते इतके परिपूर्ण वाटते की, आपल्याला आर्थर हॅलीची आठवण येते. आमच्या वाचनालयात डॉक्टर–मेंबर्स पुष्कळ आहेत. त्या सर्वांना तर ते आवडलेच, पण इतर वाचकांनाही त्यात पुष्कळ रस वाटला. या पुस्तकाविषयी आम्ही आणखीन लिहीत आहोच, परंतु त्याआधी आपल्या भारतात सुद्धा वैद्यकीय व्यवसायाला कोणत्या स्वरूपाचा बाजारीपणा आला आहे त्याचे एक ताजे उदाहरण बघू.

स्त्रियांनी संतती होऊ नये यासाठी एक ऑपरेशन केले जाते. त्याला "टयूबेक्टॉमी" किंवा "सॅलपिन्जेक्टॉमी" असे म्हणतात. यात "फॅलॉपियन" टयूब्स कापल्या जातात व त्यामुळे स्त्रीबीज व पुबीज यांचा समागम टयूबमध्ये होत नाही व कापल्याच्या अलिकडेच स्त्रीबीजाचा निचरा होतो. काही कारणास्तव या "टयूबेक्टोमी" च्या ऑपरेशन केलेल्या स्त्रियांना परत मूल हवे असले तर टयूबॉप्लॅस्टीचे ऑपरेशन करायला लागते. म्हणजे प्लॅस्टिकने त्या टयूब्ज परत जोडल्या जातात व काही दिवसांनी प्लॅस्टिक काढून टाकण्यात येते. या ऑपरेशनमुळे साधारण १० ते १५% स्त्रियांना परत मुले होऊ शकतात.

टयूबॉप्लॅस्टीच्या ऑपरेशनमध्ये "Laparascope" ची आवश्यकता अजिबात नसते. लॅपारॅस्कोप म्हणजे पोटात पहाण्याचे यंत्र. काही डॉक्टर्स अलीकडे असे मिरवायला लागले आहेत की, या लॅपारॅस्कॉपमुळे हे ऑपरेशन फारच सुलभ व यशस्वी होते. वास्तविक लॅपारॅस्कॉप व टयूबॉप्लॅस्टी याचा काडीचाही संबंध नसतो. पण मोठमोठी नावे देऊन व प्रतिष्ठित व्यक्तीकडून उद्घाटन करवून घेऊन सामान्य लोकांना भुरळ घातली जाते व या ऑपरेशनसाठी भरमसाठ व अवाजवी फी आकारली जाते. स्कूटर किंवा गाडी बिघडली की, काही मॅकॅनिक जसे आपल्याला फसवितात, तसेच काही डॉक्टर्सही आम्हाला वाटते की, जवळजवळ २५ टक्के डॉक्टर्स लोकांची निव्वळ फसवणूक करीत असतात. टयूबॅक्टॉमीची ऑपरेशन दोन प्रकारची असतात. वर एक प्रकार सांगितलाच आहे (टयूब्स कापणे). दुसरा प्रकार म्हणजे टयूब्स बांधून ठेवणे. या प्रकारात मूल परत होण्याची शक्यता थोडी जास्त आहे. परत मूल होण्याची शक्यता एकूण १५ ते २०% च असते, पण खोटी प्रसिद्धी करून अलीकडे ही शक्यता ५०% दाखविण्यात येते.

"कॉमा" ही एक अत्यंत वेगळी व आपणास विचार करायला लावणारी कादंबरी आहे. या कादंबरीची नायिका आहे सुसान व्हीलर. अमेरिकेतील एका मोठ्या हॉस्पिटलचा चीफ असतो स्टार्क. हा खलनायक तो तरण्याताठ्या व्यक्तींना ऑक्सिजन पाईपमधून कार्बन मोनॉक्साइड देतो. माणसाच्या मेंदूला ३ ते ५ मिनिटे ऑक्सिजन मिळाला नाही, तर मेंदू परत जिवंत होऊ शकत नाही. ऑक्सिजनच्या अभावी शरीर अगदी नीळसर होते. परंतु ऑक्सिजनमध्ये ठराविक प्रमाणात कार्बन मोनॉक्साइड ठराविक वेळेपर्यंत दिल्यास पेशंट निळा होत नाही. "कॉमा" या पुस्तकात बॉस्टॉन मेमोरियल हॉस्पिटलमध्ये काही किरकोळ तक्रारीसाठी आलेल्या पेशंटना अशा तऱ्हेने कार्बन मोनॉक्साइड देऊन "कॉमाटॉझ" ( Comatose ) केले जातात. कार्बन मोनॉक्साइड इतका पद्धतशीर दिला जातो की, मेंदू निर्जीव होतो, पण हृदयाचे स्पंदन मात्र चालू राहते. इतर अनेक उपकरणांनी हे स्पंदन चालू ठेवले जाते. कारण त्या बेशुद्ध अवस्थेतील पेशंटच्या अवयवाचे कलम करायचे असते. जेव्हा जास्तीत जास्त किमत मिळेल तेव्हा त्या पेशंटचे हार्ट व किडनी वगैरे काढून घेण्यात येते.

मेंदूला सर्वांत अधिक आवश्यकता ग्लुकोज व ऑक्सिजनची असते. कार्बन मोनॉक्साइड दिल्यामुळे शरीरात कार्बोक्झिन हेमोग्लोबिन तयार होते व पेशंट किंचित लालसर दिसू लागतो. पोस्ट मॉर्टेममध्ये मृत्यूचे कारण आढळत नाही. पेशंटच्या नातेवाइकांना असे सांगण्यात येते की, कधीकधी भूल देताना काही पेशंटस् मृत्यू पावतात. दु:खाने बधिर झालेले नातेवाईक काही शंका घेत नाहीत.

ऑपरेशनरूममध्ये पेशंटला कार्बन मोनॉक्साइड देऊन कायमचे 'बेशुद्ध' केले जाते तर बॉस्टॉन मेमोरियलच्या वॉर्डमध्ये 'सक्सिनीकल कॉलिन' देऊन त्यांना कोमॅटोझ केले जाते. या औषधामुळे सर्व स्नायू बधिर होतात. फुप्फुसांची क्रियाही बंद पडते. सक्सिनील कॉलिनचे एक वैशिष्टय म्हणजे ते शरीरात 'मेटॅबॉलाईझ' होऊन जाते. पोस्ट मार्टेममध्ये त्याचा कोणताच मागमूस आढळत नाही.

या 'बेशुद्ध' ( comatose ) पेशंटसना मग जॅफर्सन इन्स्टिटयूटमध्ये ठेवले जाते. जॅफर्सन इन्स्टिटयूट म्हणजे एक गणकयंत्रांनी चालवलेली संस्थाच. दरवाजे आपोआप उघडतात. प्रश्नाची उत्तरे T. V. वर येतात. सर्व अगदी यांत्रिक. ही एवढी मोठी संस्था


मोफत ! मोफत !! मोफत !!!

**पांढरे डाग**

नीलकमल बुटीने ३० वर्षांपासून पांढऱ्या डागाच्या रोग्यांना पूर्णपणे लाभ देऊन जगात प्रसिद्धी मिळविली आहे. आपणही एक लावायचे पॅकिट मोफत मागवून लाभ प्राप्त करा. केवळ १ महिन्यातच पूर्णपणे फायदा.

जवाहर चिकित्सा केंद्र
पो. कतरीसराय (गया)

फक्त ३ ते ४ डॉक्टर्स चालवीत असतात. 'कॉमा 'मधे असलेले पेशंटस् तसेच झोपून राहिले तर त्यांना 'बेड-सोर्स' (कातडी सोलून निघणे) होतात. या कारणामुळे जेफर्सनमध्ये या पेशंटस्ना तारेवर लटकवून ठेवलेले असते. पातळ तार पेशंटच्या लांब हाडामधून आरपार नेऊन सीलिंगला टांगून ठेवलेली असते. कुणी नातेवाईक आले तर पेशंटला तिकडून हालवून नातेवाइकाकडे नेले जाते! (अगदी अलीकडे 'बेड-सोअर्स' होऊ नये म्हणून मुंबईत काही ठिकाणी 'वॉटर-बेडस' आले आहेत. नावाप्रमाणेच या गाद्यांत पाण्याचा प्रवाह चालू असतो. त्यामुळे पेशंट थोड्या थोड्या वेळाने या कुशीवरून त्या कुशीवर आपोआप फिरतो!)

आपल्या मित्राचा शोध लावण्यासाठी सुसान या जेफर्सन इन्स्टिट्यूटमध्ये येते. T. V. कॅमेऱ्यांनी तिची हालचाल टिपू नये म्हणून रडार चुकविणाऱ्या कमी उंचीवरून उडणाऱ्या विमानासारखी ती हालचाल करते! सुसानकडे या संस्थेचे झेरॉक्स मॅप्स असतात म्हणून ती काही डॉक्टर्सना पेशंटचे अवयव कलम करण्यासाठी 'चोरताना' बघते!

सुरुवातीसच सुसानला शंका येते की, बोस्टॉन मेमॉरियलमध्ये किरकोळ तक्रारी-साठी येणाऱ्या पेशंटसचे फालतू संशोधन केले जाते. टिश्यु-मॅचिंग, टिश्यु-टायपिंग याची आवश्यकता मुख्यत्वेकरून कलम करण्यासाठी असते. कोणतीही परकी वस्तू आपल्या शरी-रात शिरली की, आपल्या पेशी त्याचा जोरात विरोध करतात. ती वस्तू नाकारतात. (Rejection) कलम अयशस्वी होण्याचे हेच एक मुख्य कारण आहे. काही कलमे मात्र यशस्वी होतात. उदाहरणार्थ किडनीचे कलम हृदयाच्या कलमापेक्षा जास्त यशस्वी होते. कारण हृदयाला स्पंदन करावे लागते. किडनीला नाही. डोळ्याच्या कॉर्नियाचे कलम किडनीपेक्षाही जास्त यशस्वी होते. कॉर्नियाचे जवळ ब्लड व्हेसल्स नसतात म्हणून.

ज्याला किडनीची आवश्यकता असते त्याचे टिश्यु-मॅचिंग अवयव 'देणाऱ्याशी' केले जाते. 'कॉमा 'मध्ये या अवयवाची चोरी करणाऱ्या डॉक्टर्सना प्रचंड पैसा मिळत असे. जेवढे टिश्यु मॅचिंग जास्त तेवढी अवयवाची किंमत जास्त! आम्हाला असे वाटते की, काही दिवसांनी रक्ताचा जसा व्यापार चालतो तसा अवयवांचाही चालेल! 'कॉमा 'मध्ये लिहिलेल्या घटनाही खरोखरच घडायला लागतील!

स्टेटसमध्ये ज्यांना कलमाची आवश्यकता असते ते लोक शनिवार-रविवार आला की, आनंदित होतात! वीक-एण्ड आला की, बरेच लोक अपघातात मरतात. आता आप-ल्याला हवे असलेले अवयव मिळतील या अपेक्षेने हे लोक सुखावतात. याला Holiday Syndrome म्हणतात!

—डॉ. प्रदीप पटवर्धन, सर्जन
(सदस्य—आरोग्य दक्षता मंडळ)

एकंदरीत सर्वांनी वाचावे असे हे 'बेस्ट-सेलर' आहे.

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी


**SOME NEW TITLES RECEIVED**

| | | |
|---|---|---|
| 1 | **Cricket in Our Blood** ( Autobiography ) By Ian Chappell | Pounds 3·95 |
| 2 | **The Projection of the Astral Body** (Similar to Lobsang Rampa) By S. Muldoon and Hereward Carrington | Rs. 30/- |
| 3 | **Mysterious Visitors** ( Cosmology / *Exobiology* ) By Brinsley Le Poer Trench | |
| 4 | **Target Amin** ( The plot to assassinate President Amin-Fiction ) James Konrad | |
| 5 | **Please Your Honour** ( The statement of Godse in the Court ) By Gopal Godse | |
| 6 | **Rosebud** ( a novel of adventure and suspense written by Hemingway's grand-daughter ) By Joan Hemingway & P. Bonnecarrere. | Dollars 6·95 |
| 7 | **Elvis : What Happened ?** ( The inside story of the fomous singer who distributed Codillacs like candies ) Steve Dunleavy | Rs. 17·75 |
| 8 | **Sai-Baba, Man of Miracles** ( Mysticism ) Howard Murphet | Rs. 6·50 |
| 9 | **Portrait of Bombay's Underworld** ( Read about Bombays' prostitutes & Smugglers etc. ) Balkrishna | Rs. 4·00 |
| 10 | **Coma** ( Best-Seller- Medical novel ) Robin Cook | Rs. 12·50 |
| 11 | **The Huges Papers** ( Inside story of one of the richest man of U. S. A. ) Elaine Davenport | Rs. 17·75 |
| 12 | **Ice Trap Ferror** (Thriller) Nick Corner | Rs. 17·75 |
| 13 | **Blood And Money** ( Best-seller- A true story of passion, Murder, Revenge ) Thomas Thompson | Rs. 20·75 |
| 14 | **Adolf Hitler** (Best seller- Biogrophy) John Toland | Rs. 27·75 |
| 15 | **In Search of Myths & Monsters** (Evidence of othe r wordly beings) Alan Landsburg | Rs. 19·00 |

* *Long-term subscribers get plenty of rebate.*
* Instead of buying books at prohibitive prices, be our member ! — Dollars 6·9ç

A " PHOENIX " MEMBER IS BETTER INFORMED.

**PHOENIX LIBRARY**
727, Opp. Sadashiv Post, Pune 411 030

वेगळ्या वळणाने जाणारा

# त्रुफोचा सॉफ्ट स्कीन

अशोक प्रभाकर डांगे

दोन राकट पंजांची अस्वस्थ चाळवाचाळव पडद्यावर सुरू झाली. त्यातच अधून-मधून पाच नाजूक बोटांची गुंतागुंत जाणवत गेली. काळधाशार पडद्यावर गोरीपान युरोपियन त्वचा अर्थवाही स्पर्शांनी बोलत राहिली. ह्याच भावनागर्भ पार्श्वभूमीवर देखणी अक्षरं दिमाखदारपणे उमटत विरत गेली. वेगळेपणानं ते सारं वातावरण तेव्हाच भारून टाकलं. स्वाभाविक होतं. जगप्रसिद्ध फ्रेंच चित्रपटदिग्दर्शक त्रुफोच्या चित्रपटाला सुरुवात झाली होती. 'सॉफ्ट स्कीन' ह्या शीर्षकावरल्या शब्दांचा अर्थ शोधायचा होता आणि सुरुवातीलाच जाणवला तो एक अस्वस्थ, अगम्य आणि अधुरा स्पर्श! त्या राकट, केसाळ, निबर पंजांचा धनी निश्चितच एखादा पुरुष असावा. तोही सुखवस्तू. मध्यम वयाचा. त्याच्या हातात चमकणारी अंगठी म्हणजे तो नक्कीच विवाहित आहे. दुसरी नाजूक, लांबसर बोटं एखाद्या स्त्रीची आहेत. ती कलावंत असावी. कदाचित नसावी; पण त्या बोटांचा डौलच तिच्या सौंदर्याची जाण करून देतोय. तो हातांची चुळबुळ करतोय म्हणजे निश्चितच अस्वस्थ झालाय. मनातून धुमसतोय. अनुभवातून दुखावलाय; पण तिच्या हालचाली मात्र संथ, हळुवारपणे होतायत. स्वाभाविकच ती शांत आहे. कुठे तरी बेफिकीर आहे. स्वतःच्याच अस्तित्वात, सुखात रमून गेलीय. आपल्या मनातल्या-सारखंच असतं आणि घडतंही. त्रुफोचा हा नायक एक प्रख्यात फ्रेंच समीक्षक आहे. साहित्याचा जाणकार आहे. अनेक पुस्तकं त्याचं नाव अभिमानानं मिरवतायत. पाश्चिमात्य लेखकाला लाभणारी अमाप कीर्ती आणि अफाट पैसा त्यालाही लाभलाय. नव्हे त्या प्रसिद्धीची जणू झिंगच त्याला चढलीय. व्याख्यान, समारंभ या ना त्या निमित्तानं त्याचा युरोपभर संचार होतोय. दूरदर्शनाच्या लक्षावधी प्रेक्षकांनाही त्याचं तरतरीत, उत्साही, अवखळ व्यक्तिमत्त्व परिचयाचं झालंय, त्यामुळेच पिरे लॅशने ह्या विख्यात समीक्षकाचे प्रशंसक साऱ्या युरोपभर नव्हे त्यापलीकडेही पसरलयेत.

त्रुफोच्या ह्या नायकाकडे कर्तृत्व आहे, कला आहे, त्यातून मिळणारं वैभव आहे, मानसन्मान आहेत. लौकिक अर्थाने तो चांगला संसारी आहे. आपल्या पत्नीशी, फ्रँकाशी, त्यानं चांगला पंधरा वर्षं संसार केलाय. त्याला सबिना नावाची दहा–बारा वर्षांची एक गोंडस मुलगीही आहे; पण हे सारं असूनही तो अस्वस्थच आहे; अतृप्त आहे. तसा तो उतारवयाकडे झुकलाय. त्याचं वय तर त्याच्या देखण्या चेहऱ्यावर देखील स्वच्छ वाचता येतंय. कदाचित अशा अपुऱ्या वयात जाणवणारं मानसिक एकाकीपण त्याला आजकाल प्रकर्षानं जाणवतंय आणि ह्या एकाकीपणाभोवती त्रुफोनं एक प्रभावी चित्रपटकथा उभारलीय. 'द सॉफ्ट स्कीन' नावानं चित्रपटाच्या सुरुवातीलाच पिरे पोर्तुगालच्या प्रवासाला निघालाय. लिस्बन शहरात त्याचं एक व्याख्यान आयोजित केलंय. त्याचा हा प्रवास दोनच दिवसांचा असला तरी त्यानंच त्याच्या जीवनात प्रचंड उलथापालथ घडवून आणलीय. विमानप्रवासातच त्याचा निकोलशी परिचय घडलाय. निकोल एक हवाईसुंदरी आहे. हा व्यवसाय तिनं जाणीवपूर्वक पत्करलाय. ती व्यक्तिमत्त्वानं आकर्षक आहे. तिनं पिरे लॅशने ह्या प्रख्यात लेखकाला ओळखलं. विमानातून उतरताना त्याच्याबरोबर आपला फोटोही काढवून घेतलाय आणि त्या प्रख्यात लेखकाच्या आगमनाचा तोच फोटो वृत्तपत्रांनी आवर्जून छापलाय.

निकोल पिरेच्याच हॉटेलात उतरलीय. तो फोन करून तिला गाठायला पहातोय. ती नाकारतेय. मग त्यांची माफी मागतेय. निकोलच्या उमद्या, आकर्षक व्यक्तिमत्त्वानं पिरे झपाटलाय आणि प्रेमाच्या प्राथमिक खेळानंतर ती दोघं एकत्र आलीयत; पण पिरे म्हणजे प्रसिद्धी, जनसमुदाय, गर्दी, गडबड, समारंभ! हे सारं आटपून पिरे पॅरिसला परततोय. तिच्या व्यक्तिमत्त्वानं तो भारावलाय. तिनं न चुकता आपला फोन-नंबर त्याच्या माचिसमध्ये नकळत लिहून ठेवलाय.

घरी आल्यापास्नं पिरे बेचैन आहे. ही बेचैनी कुणाला सांगता येण्यासारखी नाहीयेय, निकोलसाठी त्याचं प्रौढ मन झुरतंय. तिचा पत्ता न विचारल्यानं ते हुरहुरतंय आणि अखेर अचानकपणे माचिसमध्ये फोननंबर सापडल्यानं तेच मन आश्चर्य आणि आनंदानं विलक्षण सुखावलंय.

पिरेच्या एकाकीपणाची कोंडी फुटलीय. त्याच्या भावना नवथरपणे तरारतायत. तो निकोलला फोनवर भेटतोय. दोन फ्लाइट-मधल्या दिवसात तिला प्रत्यक्ष गाठतोय. हिंडणं, फिरणं, खाणं-पिणं चालू आहे. तिच्या बुद्धीची चमक त्याला जाणवलीय. उतार-वयातल्या ह्या प्रेमानं तो पुरता पालटलाय. घरात राहुला कुरबुरतोय. क्षुल्लक गोष्टी-वरनं चिडचिडतोय. फ्रँकाशी हमरीतुमरीवर येतोय. मुलीकडे दुर्लक्ष करतोय. इतकंच काय आपल्या लिखाणाचीही हेळसांड कर-तोय. अर्थात ह्या साऱ्याला कारण आहे निकोल!

थोडक्याच दिवसांत निकोल आणि पिरे खूपच जवळ आलेयत, पण त्या जवळ येण्या-लाही मर्यादा पडल्यात. निकोलची घरमाल-कीण तिच्या आई-वडिलांच्या नात्यातली आहे. त्यामुळे तिच्या घरी जाऊन राहणं, तिचा सहवास उपभोगणं पिरेला अशक्य होऊन बसलंय. ह्या प्रेमाची अपरिहार्य परिणती म्हणून मिळणारं सुख, शारीरिक सुख, पिरेलाही हवं आहे आणि समोरचा तो घास त्याच्या तोंडी पडणं अशक्य झालंय!

मग ह्यातनं पिरेच पर्याय शोधतो. लौकरच रिएम ह्या जरा दूरच्या गावी त्याला एका कार्यक्रमाला हजर रहायचंय. खरं तर त्याची पत्नी फ्रँकाच 'कुठे तरी जाऊ या!' म्हणून त्याच्या बरेच दिवस मागं लागलीय; पण पिरे तिचा आग्रह टाळतो आणि आता मात्र

निकोलला घेऊनच रिएमला दोन दिवस रहायला जातो. त्या निमित्तानं त्याला तिचा सहवास हवा आहे. निकोल आणि पिरे रिएमला हॉटेलात उतरतात. पिरेला एका चित्रपटसमारंभाला हजर रहायचंय. तिला सोडून तो तिथे हजर होतोही आणि मग प्रसिद्ध लेखकाच्या वाटचाला येणाऱ्या स्वागत, सह्या, मेजवानी, भाषण ह्या साऱ्यांतून पार पडतो देखील! ह्या साऱ्याच समारंभात त्याच्या मनाची कुतरओढ चाललीय. कारण आपल्या प्रतिष्ठेसाठी तो निकोलला चारचौघांत आणू शकत नाही आणि तो आपल्याला जाणीवपूर्वक टाळतोय हे ओळखल्यानं तीही अस्वस्थ झालीय. अखेर चित्रपटानंतरचा स्वागतसमारंभ आणि त्याच्याबरोबर त्याच्या गाडीनं पॅरिसला येऊ इच्छिणारा त्याचा मित्र ह्या साऱ्यांच्या तावडीतून पिरे पळ काढतो. हॉटेल गाठतो. त्यानं विश्वासघात केल्याच्या विचारानं रडत बसलेल्या निकोलला घेऊन रात्रीच हॉटेल सोडतोय आणि सरळ पॅरिसचा रस्ता धरतोय!

निकोल आणि पिरे एका छोटया गावातल्या बंगलीवजा हॉटेलात जाऊन रहातात. तिच्या सहवासात रहायचा त्याचा आत्तापर्यंतचा प्रयत्न फसलाय. इथे थोडासा एकांत त्यांना मिळालाय. तेवढ्यात पिरे पॅरिसला फोन करतो. फ्रँका विचारते 'कुठून बोलताय?' पिरे ठोकून देतो 'रिएन 'मधनं. फ्रँका चवताळते. पिरेचं बिंग फुटलंय, पिरे रिएनमधनं बाहेर पडल्याची बातमी तिला आधीच लागलीय. पिरे उध्वस्त होतो. त्रुफोच्या नायकाची फारच कोंडी झालीय. प्रेयसी आणि पत्नी ह्या विख्यात त्रिकोणात तो सापडलाय. निकोलबरोबर मजा मारायची त्याची ऊर्मी मावळलीय. तो आणि निकोल सरळ पॅरिसला परतलेयत.

भावनांची गुंतागुंत वाढत्येय. मनं दुरावलीयंत. पिरे अपरात्री घरी येताच फ्रँका भांडायला उठलीय. 'कोणत्या सटवीला घेऊन गेला होतात?' पिरे ते नाकारतो; पण त्याच्याही शब्दांत त्राण नाहीयेय. परिणामी नवरा-बायकोचं प्रचंड भांडण! संसारातला साराच गाळ वर येतोय. पिरेही मनातून चवताळलाय. फ्रँकाच्या डिवचण्यानं मुरगळलाय. म्हणूनच अखेर त्याच्यापासून वेगळं व्हायचा आपला निर्णय फ्रँका त्याला सांगते; तेव्हा तोही अधिकच इरेला पेटतो. त्या क्षणीच दूर व्हायचं ठरवतो. भरलेली बॅग उचलतो. घराबाहेर पडतो. फ्रँकाला हे अनपेक्षित. ती बावचळते. त्याची मनधरणी करायला जाते. तो बधत नाही. त्याला निकोल हवी असते.

आता आपल्या आयुष्याची कोंडी फोडायची संधी पिरेपुढे चालून येते. तो आपल्याच ऑफिसात झोपायला लागतो. निकोलशी भेटीगाठी चालूच असतात. एकदा तिला अधिरेपणानं आपला निर्णय कळवायला जातो, तर ती ते सारंच सहजपणे घेते. इकडे फ्रँकानं घटस्फोटाची तयारी केलेली. पिरेचं सामानही भरून ठेवते. ते कुठे पोचवायचे तेवढंच तिला ठाऊक नसतं. कारण पिरेच्या प्रेयसीचा थांगपत्ताच तिला ठाऊक नसतो. पिरे नवआयुष्य जगायचं ठरवितो. आपण विकत घेत असलेल्या फ्लॅटचं बांधकाम तो निकोलला दाखवायला नेतो. आणि इथेच त्रुफोच्या चित्रपटाला निराळंच वळण मिळतं. पिरे निकोलवर जीव टाकीत असतो. तिच्यासाठी तो आपलं घरदार, बायको, मुलगी सोडून आलेला. त्याचं तिच्यावर, तिच्या मोहक व्यक्तिमत्त्वावर प्रेम जडलेलं; पण ती मात्र थंडच असते. असे अनेक पुरुष तिनं आधीच पाहिलेले व पचवलेलेही. लग्नाची बांधिलकी निकोलला नको असते आणि तिचं व्यवहारी मन जाणण्यात हा विख्यात लेखक, समीक्षक अपुरा पडतो. पिरेची स्वप्नं कोलमडून पडतात. आशा उध्वस्त होतात. त्याची लग्नाची मागणी निकोल सरळ नाकारून टाकते.

त्रुफोचा हा नायक उध्वस्त होतो. तो नवी वाट शोधू पहातो; पण तो मार्गच त्याला बंद होतो. आयुष्याच्या उत्तरार्धात तो पत्नी गमावतो. प्रेमामागे धावतो आणि चांगलाच फसतो! पिरेची ही अगतिक फरफट त्रुफो प्रभावीपणे चित्रित करतो. पिरेपुढे आता पर्यायच नसतो. मुलीचं प्रेम असतंच. ते तर तो कधीच सोडू शकत नसतो. त्याचा पुढचा निर्णय आता अपरिहार्य असतो. फ्रँकाशी तडजोड करायचं तो निश्चित करतो. परतीचा तो मार्ग तेवढाच त्याला उपलब्ध असतो.

त्रुफोचा चित्रपट इथेही एक वेगळं वळण घेतो. नेहमीपेक्षा वेगळ्या पंथानं जातो. पिरेच्या प्रेमप्रकरणानं चवताळलेल्या फ्रँकाच्या हाती, पिरे आणि निकोलचे फोटो लागतात. ती चवताळते. वाघिणीसारखी क्रुद्ध होते. आपल्याला फसविणाऱ्या पिरेचा तिला संताप येतो. ह्या विश्वासघातकी नवऱ्यावर सूड उगविण्यासाठी ती बंदूक घेऊनच घराबाहेर पडते. एका हॉटेलात पिरे जेवण घेत असतो. नुकताच त्यानं फ्रँकाला फोन केलेला, ती नसल्यानं पुन्हा संपर्क साधून तिच्याशी जमवून घेण्याच्या विचारात बसलेला. मनातनं जरा सुखावलेला, पुन्हा संसार करण्याच्या स्वप्नात रंगलेला. तेवढ्यात चवताळलेली फ्रँका त्याच्या पुढ्यात येऊन ठाकते. त्याचे आणि निकोलचे फोटो त्याच्या तोंडावर फेकते. तो स्तंभित झालेला आणि अचानक ती कोटात दडविलेली रायफल बाहेर काढते आणि सरळ पिरेवर गोळ्या झाडते!

त्रुफोचा चित्रपट इथेच संपतो. त्यातलं प्रेम नेहमीचंच असलं तरी त्याची परिणती नेहमीपेक्षा फारच वेगळी आहे. प्रेमाच्या कात्रीत सापडलेल्या एका कर्तृत्ववान पुरुषाचा असा शेवट अत्यंत शोकदायी ठरतो. ही पिरेची कथा आहे. *त्याचबरोबर* निकोल आणि फ्रँका यांची देखील. ही प्रेमकथा असलीच तरीही ती शोकान्तच आहे आणि म्हणूनच तिचा शेवटही मनाला सुन्नता आणतो. संवेदना बधिर करून सोडतो. ह्या साऱ्याच घडामोडीत चूक फ्रँकाची नसते. निकोलची नसते तशीच पिरेची तर नसतेच नसते! त्रुफोच्या 'सॉफ्ट स्कीन'चा अर्थ अजूनही सापडलेला नसतो. तो सापडणारही नसतो. एका प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या पुरुषावर तितक्याच सामान्य व्यक्तिमत्त्वाच्या दोन स्त्रियांनी अपरिहार्यपणे केलेला अन्याय मात्र आपल्या मनात कुठे तरी निश्चितच रेंगाळत रहातो. □

चित्रपट : दी सॉफ्ट स्कीन.
दिग्दर्शक : फ्रन्कॉइस त्रुफॉ.
देश : फ्रान्स.

---

## कम्युनिस्ट चळवळ

पृष्ठ ४ वरून

पश्चिम युरोपातील कम्युनिस्टांनीही नवीन मार्ग चोखाळला आहे. कामगारवर्गाची सर्वाधिकारशाही हा कम्युनिस्टांचा सिद्धांत ते मानीत नाहीत व संसदीय लोकशाहीतील अनेक पक्षांचे अस्तित्व त्यांना मान्य आहे व या मार्गाने समाजवाद आणता येईल यावर त्यांचा विश्वास आहे. इटलीत ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षाचे सरकार आज कम्युनिस्टांच्या पाठिंब्यामुळे टिकून आहे असे काही घडेल याची कल्पनाही पूर्वी करता आली असती का?

कम्युनिझम आणि लोकशाही या तत्त्वप्रणाली कितीही परस्परविरोधी वाटल्या तरी त्यांचा समन्वय ही आजच्या जगाची गरज आहे. दोन्ही बाजूंच्या राष्ट्रांनी आपली एकांगी भूमिका सोडून अशा समन्वयाच्या दिशेने पावले टाकण्यातच जगाची प्रगती आहे. □

चित्रपट परीक्षण

# गंगा की सौगंध (द ?)

## नव्या गणपतीकडून जुनेच महाभारत

**सदानंद बोरसे**

चंबळेच्या खोऱ्यातील मोहोरसिंगांच्या उद्धाराचा सर्वोदयींनी जितक्या वेळा प्रयत्न केला त्याच्या साडेअठरा पट हिंदी चित्रपट दरोडेखोरी या विषयावर निघाले. या सगळ्या चित्रपटांचे साचेही ठरलेले. गावातील एक 'भोलाभाला' तरुण, त्याच्यावर गावातील दुर्जनांकडून होणारे अत्याचार, मग तो तरुण दरोडेखोर होणार आणि त्या दुर्जनांना धडे शिकविणार, असे पुरेसे धडे शिकवून झाले की, हा सज्जन दरोडेखोर भारतीय घटनेचा मान राखून दंडविधानाच्या अमुक-अमुक कलमानुसार शिक्षा भोगण्याची तयारी दाखवतो; पण आपला उदार, कृपाळू कायदा त्या दरोडेखोराच्या मोकळ्या वेळात केलेल्या सत्कृत्यांची बूज राखून त्याला निर्दोष सोडतो, निदान मामुली शिक्षा करतो. पार 'गंगा जमना' आणि 'मुझे जीने दो'पासून कालपरवाच्या 'हत्यारा'पर्यंत ही जी सज्जन, बेबस दरोडेखोरांची अखंड, ज्वलंत परंपरा चित्रपटसृष्टीला लाभली आहे, त्यातच निर्माता–दिग्दर्शक सुलतान अहमद यांनी पाजळलेला आणखी एक दिवा म्हणजे 'गंगा की सौगंध.'

या चित्रपटाची कथा तयार होताना घडलेली एक खरीखुरी दंतकथा कानी आली. कथालेखक संतोष व्यासजींनी पूर्वापार चालत आलेले सगळे साचे एकत्र केले आणि त्यातून कोणत्या साच्यातून आपला गणपती नवा रंग देऊन काढायचा, याचा विचार करायला लागले. कसे कोण जाणे; पण ते सगळेच साचे फुटले आणि मग एकाचे डोके, दुसऱ्याची सोंड, तिसऱ्याचे हात असे सगळे एकत्र करून व्यासजींनी एक नवा गणपती हे दरोडेखोरीचे जुनेच महाभारत लिहिण्यासाठी तयार केला; त्यामुळेच हिंदीतील सर्व सज्जन व बेबस दरोडेखोरांची व्यक्तिमत्त्वे व आयुष्ये या चित्रपटात अमिताभ बच्चन अर्थात जीवाजवळ एकवटली आहेत. फरक इतकाच की, चंबळेच्या खोऱ्यातून आता भारतीय दरोडेखोर गंगेच्या परिसरात उतरला आहे.

ही फार वेळा वापरल्याने भाव कमी झालेली दमडीची कोंबडी हातात घेतल्यानंतर तिला पुरेशी चव आणण्यासाठी लाखभर रुपयांचा मसाला 'गंगा की सौगंध'मध्ये वापरला आहे. हा मसाला गोळा करताना अक्षरशः 'रामभक्त हनुमान'पासून '007 जेम्स बाँड'पर्यंत कोणालाही मोकळे म्हणून सोडलेले नाही. एक बलात्कार, एक खून, एक मुजरा डान्स, एक शक्तिप्रदर्शनाचा + पिळवणुकीचा प्रसंग, एक हनुमान–उडी (जमिनीवरून किल्ल्याच्या तटावर), एक विमान, काही घोडे, काही गुंड, काही बंदुका, काही हातबाँब आणि एक पाठलाग + विमान व घोड्यावरील द्वंद्व एवढी भर चित्रपटात टाकायचीच, असा संकल्प सोडूनच दिग्दर्शकाने चित्रपटाला हात घातला असावा. शिवाय प्रेम या हिंदी चित्रपटांच्या स्थायीभावाचे दिग्दर्शकाने प्राणपणाने रक्षण केले आहे. इतकेच नव्हे तर कित्येक व्यापक रूपे एकत्र गोळा करून ठेवली आहेत. तुम्हाला काय हवे? नायक-नायिकेचे प्रेम? चला, जीवा अन् धनिया, दोन गाणी म्हणून जमेल तेवढे बागडून टाका. आता काय? गावातल्या बांधवांबद्दलचे प्रेम? अरे काळू, (हा गावातील अस्पृश्य. शिवाय गांधीवादी, तत्त्वनिष्ठ, अन्यायाविरुद्ध लढणारा वगैरे म्हणजे आपला प्राण.) तु एक धीरगंभीर गाणं म्हणून टाक. अहो गीतकार अंजान. आणि संगीतकार कल्याणजी–आनंदजी याला सूट होईल असं एखादं गाणं पाहिजे. हो, लगेच या प्रेमाच्या जोडीला अस्पृश्यतेचा प्रश्न लढा वगैरे सामाजिक संदर्भ द्या, म्हणजे जरा वजन येईल चित्रपटाला. आता काय राहिलं? मातृभक्ती हा, तर जीवा, तुझ्या आधीच्या मृत्यूमुळे तू दरोडेखोर बनतोस दरोडेखोर बनायचं, भोळेपणा सोडून द्यायचा, म्हणजे काय करायचं? डोक्याची शेंडी कापून टाकायची, म्हणजे एकदा जीवाचा अमिताभ झाला की पब्लिक खूष. आई आपलं आयुष्य मुलाला देते व त्यामुळे मुलगा वाचतो आणि ती मरते– हे झकास झालं; म्हणजे एकाच प्रसंगात पुत्रप्रेम आणि देवीभक्ती (की लगेच दुर्गामातेची प्रार्थना.) आता शेवटी एकदा 'सर्व धर्म समे कृत्वा' करून टाकलं की, सुटलो, मग काळू आणि खानसाहेबांची दोस्ती, 'अल्ला तेरो नाम' आणि 'भर दो झोली मेरी या मुहम्मद'ची उसनवारी, होळी व ईद आणि 'मानो तो मैं गंगा माँ हूँ' या गाण्यात एक 'हरि ॐ' आणि एक 'अल्ला हु अकबर.' आता कसा एक सामाजिक संगीतमय, संघर्षमय क्रांतिकारक चित्रपट निर्माण केल्याचं समाधानच समाधान वाटतंय, असा सगळा दिग्दर्शकसाहेबांचा दृष्टिकोन असावा.

चित्रपटात हिंदीतील सुपरस्टारपासून ते एक्स्ट्रॉपर्यंत मोठी थोरली भरती आहे. अमिताभ, रेखा, प्राण, अमजदपासून सुरू होणारी रांग पार तिवारी, मॅकमोहनपर्यंत जाते. अमिताभला धोतर-कुडत्यात पाहणे व एक गावंढळ तरुण म्हणून सहन करणे म्हणजे शिक्षाच आहे. हा क्लेशकारक अनुभव त्याने यापूर्वी 'अदालत' मध्ये दिला होता; पण 'अदालत' मध्ये नंतरची त्याची अभिनयाची बाजू भक्कम होती. या चित्रपटात त्याने फक्त सुपरमॅनला लाजविणारी साहसी कृत्ये केली आहेत. जर अशीच कामे केली तर अमिताभचा राजेश खन्ना होण्यास वेळ लागणार नाही. रेखाने अधूनमधून उघडी पाठ दाखविण्याव्यतिरिक्त काहीच केलेले नाही. प्राणच्या अभिनयातही दर्जेदारपणापेक्षाही सराइतपणाचाच भाग जास्त. बाकी अमजदसकट सर्व जणांची कामे अत्यंत सामान्य, प्रभावहीन. अर्थात हा दोष सर्वस्वी कथेतील त्या त्या व्यक्तिरेखांच्या चित्रणाकडे जातो.

या चित्रपटाचे वजहत मिर्झांनी लिहिलेले संवाद हा एक असलाच तापदायक प्रकार आहे. एकही पात्र साधेसुधे मानुषी बोल बोलायला तयारच नाही. प्रत्येकजण 'चाचा, तू भी सच्चा मैं भी सच्चा; लेकिन सच्चाई किसी दूसरेके पास कैद है। जब तक मैं उसे छुडाकर न लाऊँ, हम दोनों के बीच की ये दीवार नहीं टूटेगी।' या भाषेत बोलणार.

जर हे संवाद थोडेसे शुद्ध करून लिहिले, तर 'चित्तौड का राणा' किंवा अशाच एखाद्या ऐतिहासिक चित्रपटाचे संवादच वाचतील सर्व पात्रे ही पल्लेदार वाक्ये ऐतिहासिकतेच्या अभिनिवेशातच फेकीत असतात.

चित्रपटाचे संगीत म्हणजे केवळ आनंदी-आनंद आणि कल्याणीकल्याण आहे. मध्ये एकदा अनाथाश्रमात घेतलेले 'हम दोनों' मधील 'अल्ला तेरा नाम' हे गीत या पार्श्वभूमीवर विलक्षण सुरेल आणि सुखद धक्का देणारे वाटते.

या गीतावरून आणि अनाथाश्रमावरून आठवण झाली. ज्याप्रमाणे संघर्षासाठी अश्मयुगापासून बॉंबयुगापर्यंत सगळ्याचा दिग्दर्शकाने वापर केला आहे, त्याचप्रमाणे सामाजिकता दाखविण्यासाठी गांधी, नेहरू, शास्त्रींपासून गावच्या हरिजनांपर्यंत सार्‍यांना विकासयोजनांच्या कामाला लावले आहे— मग या विकास-योजनांमध्ये अनाथाश्रम आहे, रस्ता तयार करणे आहे, एक नवी वसाहत बांधणे आहे, थोडक्यात भारतात विकासच विकास चालू आहे.

जाता-जाता शेवटी एकाच गोष्टीचा उल्लेख—

'गंगा की सौगंध' असे चित्रपटाचे नाव असताना बाहेर जाहिरातींमध्ये मात्र सौगंधच्या ऐवजी सगळीकडे 'सौगंद' छापले आहे. अरे, नाही नीट चांगला चित्रपट तरी निदान जाहिरातदारांनी जाहिरात तरी व्याकरणशुद्ध द्यावी, म्हणजे चित्रपटाला जाण्यापूर्वीच तिटकारा वाटत नाही. फार तर जाऊन आल्यानंतर पस्तावा येईल, पण त्यापूर्वीच तिकिटांच्या पैशांनी प्रेक्षकांचा खिसा सोडलेला असतो. □

# 'ग्रामायन' मेळावा

## १ व २ एप्रिल १९७८

ग्रामीण भागात स्वयंस्फूर्तीने विकासाचे कार्य करणारे कार्यकर्ते आणि स्वयंसेवी संस्था यांचा मेळावा ग्रामायन १ व २ एप्रिल ( शनिवार, रविवार ) रोजी पुणे येथे आयोजित केला आहे.

यापूर्वी ग्रामायनने जुलै ७४ व ऑगस्ट ७५ मध्ये आयोजित केलेल्या अशा मेळाव्यांत अनुक्रमे रोजगार हमी योजना व आदिवासी उपयोजना हे चर्चेचे प्रमुख विषय होते. या मेळाव्यात या दोन्ही योजनांची आजपर्यंत झालेली प्रगती, कार्यकर्त्यांना आलले अनुभव व अडचणी व त्या आधारे या योजनांच्या कार्यवाहीत सुचवावेसे वाटणारे बदल यासंबंधी प्रामुख्याने चर्चा होईल व त्यानुसार जरूर त्या कार्यक्रमाची आखणी केली जाईल. या दोन महत्त्वाच्या योजनांबाबत योग्य ते लोकमत तयार करणे व शासनापुढे आपले म्हणणे ठामपणे मांडणे यासाठी कार्यकर्त्यांनी खोलवर विचारविनिमय करणे आवश्यक आहे.

वरील विषयांशिवाय मेळाव्यात ग्रामीण विकासाशी संबंधित अन्यही काही विषयांवर विचारविनिमय होईल. त्यामध्ये ग्रामीण विकास कार्यकर्त्यांचे संघटन, समन्वय व त्या दृष्टीने ग्रामायनचे कार्य हाही एक महत्त्वाचा विषय असेल. मेळाव्याचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

**शनिवार, १ एप्रिल :**

१) दुपारी ३ ते सायं. ७ : पहिले चर्चासत्र.
विषय : आदिवासी विकास उपयोजना.

२) रात्री ८–३० ते १०–३० : प्रकल्प परिचय.
या वेळी मेळाव्यास आलेले कार्यकर्ते आपापल्या कार्याची थोडक्यात माहिती देतील.



**रविवार, २ एप्रिल :**

१) सकाळी ९ ते १ : दुसरे चर्चासत्र.
विषय : रोजगार हमी योजना

२) दुपारी ३ ते ५ : तिसरे चर्चासत्र.
विषय : ग्रामीण विकास कार्यकर्त्यांचे संघटन व विविध संस्थांच्या कार्यामधील समन्वय.